साप्ताहिक

# माणूस

८ मार्च ८६/२ रूपये

# पंजाब... पुन्हा मूळ पदावर

कथा-
शरियत
के हुक्मपर

साप्ताहिक
# माणूस
वर्ष : पंचविसावे
अंक : एकेचाळिसावा
८ मार्च १९८६
किंमत : दोन रुपये
संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
मेघा राजहंस
वार्षिक वर्गणी
साठ रुपये
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
: पत्ता :
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०
दूरध्वनी : ४४३४५९
मुखपृष्ठ—श्याम देशपांडे

मुस्लिम महिला विधेयक

# हा कसला आलाय सेक्युलरवाद ?

श्री. ग. मा.

संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर सी. डी. देशमुख यांनी राजीनामा दिला होता. मुस्लिम महिला संरक्षण विधेयकाच्या प्रश्नावरून अरिफ महमद खान यांनी दिलेला राजिनामा असाच दीर्घकाळ लोकांच्या स्मरणात राहील. अरिफ खान यांनीच लोकसभेत पूर्वी भाषण करून शहाबानो प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचे जोरदार समर्थन केलेले होते. आता हा निर्णय रद्दबातल करणाऱ्या नव्या मुस्लिम महिला संरक्षण विधेयकाला मान्यता देणे म्हणजे भयानकच विसंगती ठरली असती. अरिफ खान यांना आपलेच शब्द गिळावे लागले असते. शिवाय हे नवे विधेयक तयार होत असताना त्यांचा सल्लाही विचारला गेला नाही. त्यांनाच नाही, मंत्रिमंडळाच्या बहुसंख्य सदस्यांना या विधेयकाचा पत्ताही लागू दिला गेला नाही. पंजाब, आसाम करार जसे गुप्ततेने तयार केले गेले तसेच हेही विधेयक एकदम तयार स्वरूपात पुढे आले व घाईघाईने लोकसभेत मांडलेही गेले. मंत्रिमंडळाच्या सामुदायिक जबाबदारीचे तत्त्व राजीव गांधींनी केव्हाच खुंटीवर टांगून ठेवले आहे. मंत्री फक्त नामधारीच उरले आहेत. प्रश्नाशी संबंधित अशा २–४ व्यक्ती गुप्तपणे वाटाघाटी करतात, निर्णय घेतात आणि इतरांप्रमाणेच मंत्रिमंडळालाही हे घेतलेले निर्णय ऐकवले जातात. राजकारण लोकाभिमुखतेकडून एकाभिमुखतेकडे चालले आहे, याचे हे एक ढळढळीत उदाहरण आहे. जेथे मंत्रिमंडळाची ही अवस्था आहे तेथे विरोधकांना विश्वासात घेण्याचा प्रश्नच नाही. जादूगार जसा हॅटमधून ससा काढतो व लोकांच्या टाळ्या मिळवतो तसा राजीव गांधींचा एकूण कार्यभाव दिसतो पण हे नजरबंदीचे तंत्र काही वेळा अंगलटही येते. पंजाब करार या तंत्राप्रमाणे घाईघाईने केला; पण चंदीगडचे हस्तांतरण अद्याप करता आलेले नाही. म्हणजे शेवटी घोळ व्हायचा तो झालाच; फक्त तो आधी की नंतर एवढाच फरक पडला. घाईघाईने करार केल्यामुळे त्यात अनेक त्रुटी राहून गेल्या. अनेक बाबींचे स्पष्टीकरण नीट झाले नाही. हरियाना नाराज, राजस्थान नाराज; आणि पंजाब प्रश्न सुटला असे जे मानले गेले तेही चुकीचे ठरले. असेच काही या नव्या संकल्पित मुस्लिम महिला संरक्षण विधेयकाबाबतही न होवो म्हणजे मिळवली.

हे विधेयक नेमके काय आहे याचा अद्याप फारसा कोणाला पत्ताच नाही. हे विधेयक लोकसभेत मांडले गेल्यावर कॉंग्रेस पक्षातीलच अनेकांनी त्यावर टीकेची झोड उठवली; पण राजीव गांधींनी पक्षाच्या बैठकीत आवश्यक ती स्पष्टीकरणे केल्यावर सगळी टीका शमली व हे विधेयक कोणत्या स्वरूपात केव्हा मांडायचे याबाबतचे सर्व अधि-

कार राजीव गांधीकडे पक्षाने देऊनही टाकले. म्हणजे अगोदरची टीका, नंतरची मान्यता हे पेल्यातले वादळच ठरले. या पक्षबैठकीत अशी कोणती स्पष्टीकरणे राजीव गांधींनी केली की ज्यामुळे एकदम सगळ्यांचे समाधान झाले, अगोदरचा विरोध मावळला व या विधेयकाला सर्वांनी मान्यता देऊन टाकली? स्पष्टीकरणे लागावीत याचा अर्थ मूळ विधेयकातच घोटाळे असणार. शहाबानो प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे मुस्लिम महिलेला थोडाफार न्याय, दिलासा मिळणार होता. पण राजीव गांधींना हा न्याय, हा दिलासा फार अपुरा व वेळ खाणारा वाटला. ठीक आहे. तो वेळेवर व अधिक पूर्ण स्वरूपात मिळण्याची काही तरतूद राजीव गांधींना करावयाची असल्यास कोणीच त्यांना आडकाठी करणार नाही; पण यासाठी मुस्लिम महिलाना घटनेच्या १२५ व्या कलमातून वगळण्याचे, हिंदू व मुस्लिम स्त्री यांच्यात भेदभाव करण्याचे काय कारण आहे? घटस्फोटित मुस्लिम महिलेला घटस्फोट देणाऱ्या तिच्या पतीकडूनच प्रथम पोटगी मागण्याचा, मिळवण्याचा हक्क असला पाहिजे, जसा तो आज अन्यधर्मीय महिलांना घटनेने दिलेला आहे. जर काही अपवादात्मक परिस्थितीमुळे घटस्फोट देणाऱ्या पतीला हे शक्य होत नसेल तर या घटस्फोटित महिलेची व्यवस्था नातेवाईकांनी करावी; नातेवाईकही अशी व्यवस्था करू शकत नसतील तर सामाजिक संस्थानी हा भार उचलावा हे माणुसकीला धरून आहे; पण नवरा सुटता कामा नये. नवऱ्यावरची जबाबदारी फक्त पहिल्या २–३ महिन्यांपुरतीच मर्यादित करणे म्हणजे घटस्फोटित मुस्लिम महिलेला वाऱ्यावर सोडून देण्यासारखे आहे. नातेवाईक जबाबदारी टाळू शकतात, टोलवाटोलवी होऊ शकते. मुस्लिम समाजाच्या ज्या काही धार्मिक–सामाजिक संस्था आहेत त्यांच्याजवळ कर्मचाऱ्याचे पगार देण्यासाठीही आजच पुरेसा पैसा नाही; या सस्था मुस्लिम महिलेला काय मदत करणार, कपाळ? मग ही मुस्लिम महिला जाणार कोणाकडे? तिला वणवणच करावी लागणार. म्हणून शहाबानो प्रकरण महत्त्वाचे ठरते. तिला न्याय्य पोटगी देणे ही जबाबदारी मुख्यत: तिला तलाक देणाऱ्या नवऱ्याची आहे, हे, या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे स्पष्ट झाले व हिंदू घटस्फोटिता व मुस्लिम घटस्फोटिता या दोघींना एकाच समान पातळीवर आणले गेले. आता यापेक्षा राजीव गांधींचे विधेयक मुस्लिम महिलेला अधिक काही देऊ पहात असेल, हिंदू व मुस्लिम महिलेतील भेदभाव कमी करणार असेल तर त्याचे स्वागतच होईल. पण दिसते आहे ते असे की, जे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे दिले गेले आहे तेही काढून घेतले जात आहे. त्यामुळे आज तरी राजीव गांधी शरियतवादी मुस्लिमाच्या दडपणाला बळी पडून, सुधारणेचे पडलेले पुढचे पाऊल मागेच घेत आहेत असे म्हणणे भाग पडत आहे. सकल्पित विधेयकाबाबत जी स्पष्टीकरणे राजीव गांधींनी काँग्रेसपक्षाच्या बैठकीत केली व ज्यामुळे अगोदर या विधेयकावर टीका करणाऱ्याचे मतपरिवर्तन होऊन त्यांनी आपला विरोध मागे घेतला व सर्वजण राजीव गांधींच्या विधेयकाला पाठिंबा देते झाले, ती स्पष्टीकरणे नेमकी कोणती आहेत हे अद्याप बाहेर आलेले नाही. परंतु ती समाधानकारक नसण्याची शक्यताच अधिक आहे. घाईघाईने आणलेल्या पक्षांतर विधेयकातील धोके आता स्पष्ट होऊ लागलेले आहेत. पंजाब कराराची वाताहत सुरूच आहे. संकल्पित मुस्लिम महिला संरक्षण विधेयकाचा अनुभव वेगळा येईल असे मानायला कोणता आधार आहे? म्हणूनच विधेयकाला बाहेरून, जनतेतून विरोध उभा करणे आवश्यक आहे. ¤

आपले राज्यकर्ते वरचेवर असा कचखाऊपणा का करतात? काँग्रेसप्रणीत सेक्युलरवादाचा हा परिणाम आहे. राज्यकर्तेच नाहीत, आपल्याकडील विचारवंतावरसुद्धा या चुकीच्या सेक्युलरवादाचा पगडा बराच आहे. तो प्रथम कमी केला पाहिजे– घालवला पाहिजे. मूळ युरोपात सेक्युलरवादाचा अर्थ सीझरचे सीझरला द्या, देवाचे देवाला, एवढाच होता. ऐहिक क्षेत्र राजसत्तेकडे व पारलौकिक क्षेत्रापुरता चर्चचा अधिकार, अशी विभागणी सेक्युलरवादाला अभिप्रेत होती. पण आपल्याकडे मुस्लिम, ख्रिश्चन अनुनयवाद या धर्मात हस्तक्षेप न करणे असा सेक्युलरवादाचा अर्थ होऊन बसलेला आहे. परवा (दि. २७ फेब्रुवारी) लोकसभेत भाषण करताना तर राजीवसाहेबांनी आणखीनच पुढची–खालची पायरी गाठली आहे. राजीवजी म्हणतात– 'India's basic strength lay in its secular policy'– ठिकच आहे हे. पण secular policy म्हणजे काय? राजीवजींच्या म्हणण्याप्रमाणे – 'Secularism is not allowing any minority or religious group to feel that it is being suppressed.' (Times of India –Feb 28, 1986) कुठल्याही अल्पसंख्य धार्मिक गटाला आपण दडपले जात

आहोत असे वाटता कामा नये; असे वाटले तर सेक्युलॅरिझम सपला ! आता मुळात मुसलमान आपल्याकडे अल्पसंख्य असले तरी त्यांची राजकीय ताकद सख्येच्या प्रमाणापेक्षा खूप अधिक आहे, ऐतिहासिक प्रवाहामुळे हे घडले आहे, हे आपण लक्षात घेणार आहोत की नाही ? काश्मिरात हिंदू अल्पसख्य आहेत. तेथे ते केवळ दडपले जात आहेत एवढेच नाही, तर तेथून हाकललेही जात आहेत. त्यांच्या मालमत्तेवर, धार्मिक स्थानावर हल्ले चढवले जात आहेत; तेव्हा त्यांना कोणता दिलासा आजवर राजीवसाहेबांनी दिला ? आणि वाटण्या न वाटण्याच्या भावनिक पातळीवरच सेक्युलॅरिझमचे अस्तित्व अवलबून राहणार असेल तर बहुसंख्याकांनाही वाटणे न वाटणे असू शकते. अल्पसंख्याकांना संरक्षण ही सेक्युलॅरिझमची राजीव गाधीप्रणीत नवीन व्याख्या जुन्या कॉंग्रेसप्रणीत सर्वधर्म समभावी व्याख्येइतकीच किंवा त्याहूनही अधिक भोंगळ आहे. मूळ सेक्युलरवादाच्या आशयापासून या दोन्ही व्याख्या शतयोजने दूर आहेत. मूळ सेक्युलरवाद धर्माला मर्यादित करतो. हा कॉंग्रेसछाप भ्रष्ट सेक्युलरवाद आक्रमक धर्मभावनेला खतपाणी घालतो, तिच्यापुढे शरणागती पत्करतो. सेक्युलॅरिझम म्हणजे सर्वधर्मसमभाव नाही आणि राजीव गाधी म्हणतात त्याप्रमाणे अल्पसख्यधर्मशरणताभाव तर नाहीच नाही. सगळे धर्म सारखे असते तर धर्माधर्मात हजारो वर्षे युद्धे का पेटली असती ? सेक्युलॅरिझम म्हणजे धर्मविरोध किंवा निधर्मवादही नाही. रशिया, चीनमधील कम्युनिस्ट राजवटींना हे विशेषण लागू पडते. स्टॅलिनने मुसलमानांची धार्मिक न्यायालये, पाठशाळा बंद करून टाकल्या होत्या. मक्केला जायचीही बंदी होती. मशिदीचे रूपांतर क्लब्स आणि चित्रपटगृहात करण्यात आले होते. (Faith and Power - The Politics of Islam. Edward Mortimer; 1982 edition; Page 382) पुढे ही धार कमी झाली. तरी पण निधार्मिकता टिकून राहिली. आपल्याकडील सेक्युलॅरिझम धर्माबद्दल विवेक बाळगणारा हवा. जो धर्मातला चागला भाग आहे, आधुनिकतेशी सुसंगत आहे तो राहायला काहीच हरकत नाही. पण प्रगतीला, सामाजिक बंधुभावाला अडथळा आणणाऱ्या धार्मिक रूढीत शासन हस्तक्षेप करणार नाही, असा सेक्युलॅरिझमचा अर्थ करायचा असेल,तर शासन सेक्युलर नसून धार्मिक आहे, असेच म्हटले पाहिजे. ऑपरेशन ब्लू स्टारमुळे शिखांच्या धर्मभावना दुखावणार हे स्पष्ट दिसत होते. तरी आपले सैन्य सुवर्णमंदिरात गेलेच, सैन्याला जाणे भागच पडले. शहाबानो प्रकरणात तर असा काही रक्त सांडण्याचा, जीवनमरणाचा प्रश्न नव्हता—नाही. साधा मुस्लिम स्त्रीला न्याय मिळवून देण्याचा हा प्रश्न आहे— जो न्याय हिंदू स्त्रीला आज उपलब्ध आहे. तरी केवढी खळखळ सुरू आहे ! समान नागरी कायदा हा लांबचा टप्पा आहे. या वेगाने तो एकविसाव्या शतकात तरी गाठला जाणार आहे की नाही, याची शंकाच आहे. पण सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिलाच होता, एक पाउल पुढे पडलेच होते. ते मागे घेण्याची काय गरज होती ? ते घेतले जात आहे याचे कारण, कॉंग्रेसच्या मूळ राष्ट्रविचारात, कॉंग्रेसछाप सेक्युलर ध्येयधोरणातच काही तरी गफलत आहे. कसोटीची वेळ आली की हा सेक्युलरवाद हातपाय गाळतो. आपल्याला कणखर सेक्युलरवाद हवा; जो अल्पसंख्य—बहुसख्य असा भेदभाव न ठेवता सर्वांनाच एका मापाने न्याय देईल, समानतेची वागणूक देईल. सर्व धर्मांचा योग्य तो आदर ठेवील, त्यातील चांगल्या भागाचे जतन करण्याला मोकळीक देईल; पण आधुनिक, समानतापूर्ण समाजनिर्मितीच्या आड येणाऱ्या कोणत्याही धर्मातल्या कोणत्याही दुष्ट व अन्यायकारक रूढी मोडून काढण्यास कचरणार नाही. राजीव गाधींनी केलेली सेक्युलॅरिझमची व्याख्या एकोणिसाव्या, अठराव्या शतकातदेखील टिकणारी नाही. एकविसाव्या शतकाची तर बातच सोडा. □

## मुंबापुरी

### □ कृष्णमूर्तींबद्दल चार ओळी

जिद्दू कृष्णमूर्ती गेले. कृष्णमूर्तींना ऐकण्याचा योग आला होता. जे. जे. कलामहाविद्यालयाच्या प्रागणात. त्याच साहित्यही वाचलय. त्याच्याविषयी चार ओळी लिहाव्यात अस अगत्यानं वाटत

आपल्याकडे साधू—सत, महत—महात्म्याचा भारी सुकाळ. पुन्हा, ही बुवाबाजी फक्त 'स्पिरिच्युअल' प्रातात आहे अस नव्हे. सगळीकडे असे भोदू पसरलेत. आपण तशी मुळी चोख व्यवस्थाच करून ठेवलीय.

प्रत्येक विचाराचा एक कप्पाबद संप्रदाय. प्रत्येक सप्रदायाचा एक महत. आदिम सत्याच 'पेटट' आपल्यापाशीच आहे या कैफात हा महत जगणार. त्याचीच पोपटपंची करणारे त्याचे भगतगण आणि शिष्य याचा गोतावळा. प्रत्येक क्षेत्रात ही वैचारिक राडेबाजी चालू आहे. गुण गाईन आवडी या गोड नावाखाली

गेल्या दहा—बारा वर्षात 'मिडीया बूम'च्या नावाखाली जी नवी 'इन्स्टट—कॉफी—टाईप' पत्रकारिता आली आहे तिने या राडेबाजीला छान झिलई चढवली. वर्तमानपत्राच्या रकान्यांच्या कुबड्या घेऊन किती क्षुल्लक माणसं

वर्तमानपत्रानी मोठी केली. धारदार मूल्यांकनाच साधन म्हणून वर्तमानपत्राकडे पाहिलं जात. किमानपक्षी, तशी अपेक्षा असते. पण पेपरवाल्यानी शेंदूर फासून रातोरात दगडांचे देव केले व्यक्तिस्तोमाला भरपूर खतपाणी घातलं. त्यासाठी, एक नवी झिलईदार परिभाषा निश्चित केली. आपण सगळे खूप 'व्हेग' बोलतो 'व्हेग' लिहितो. 'व्हेग' जगतो. आपणसगळे कसल्याशा दाट धुक्यात राहतो आणि हे आपल्याला खूप आवडतं. म्हणूनच प्रक्षोभाचा स्वर ज्याच्या कुंचल्यातून केव्हाच हरवून गेलाय, त्या हुसेनच्या निष्प्राण चित्रकृतीविषयी हल्ली कोणीच बोलत नाही. चर्चा होते त्याच्या अनवाणी पायांची, पाढऱ्या झुलपांची त्याच्या आयुष्यात आलेल्या बायाची.

गेल्या वर्षी दिल्लीत डिसेंबरमध्ये झालेल्या सेक्सॉलॉजी कॉंग्रेसमध्ये बोलताना पंडित रविशंकर म्हणाले की, 'व्हेन आय प्ले सितार, आय फिल आय अॅम मेकिंग लव टू सितार.' केवढ भकस वाक्य. पण टाळ्या पडल्या. भारत जोडो यात्रेविषयी बाबा आमटे म्हणतात की ते प्रकाशाचा तुकडा शोधायला निघालेत. कसला कपाळाचा प्रकाशाचा तुकडा. इतक 'व्हेग' तेव्हाच बोलावसं वाटतं जेव्हा सागण्यासारख फारस नसतं.

बाबाची यात्रा मुबईला येण्यापूर्वी प्रकाश मोहाडीकर, एकनाथ ठाकूर प्रभृतीनी मुबई मराठी पत्रकार सघात वार्ताहर परिषद घेतली त्याला काही धनिक–वनिक बाळेही हजर होती. यासबधी एका कार्यकर्ता–मित्राला विचारलं तर तो अपॉलजेटिकली म्हणाला की, एवढी मोठी यात्रा योजायची म्हणजे धनिकाचा पाठिंबा हवाच. जयप्रकाश, विनोबा, महात्मा गाधी नाही का बजाज–बिर्लांच्या जवळ होते ?

असेल पण नौआखलीच्या यात्रेवर असताना महात्माजीनी ठायीठायी हार–तुरे अन् सत्कार सोहळे करवून घेतले नाहीत. त्याच्या सन्मानार्थ स्वागत-गाणी वगैरे फालतू 'व्हेग' कार्यक्रम झाले नाहीत. बाबाची यात्रा म्हणजे एक प्रचड, भोगळ सोपस्कार वाटला. एक रिच्युअल आणि ही रिच्युअल्सची परपरा आपल्याकडे तशी प्राचीन आहे. व्यक्तीस्तोमा इतकीच.

सगळयानी भेटून बाबाना शुभेच्छा दिल्या. म्हणजे गमत अशी की ज्या शक्ती अलगतेला हेतूपुरस्सर खतपाणी घालतायेत त्याच शक्ती भारत–जोडोला शुभेच्छा देणार. हे म्हणजे सुरेश भटाच्या प्रक्षोभक गजलांना रा. सु. गवई आणि शरद पवारानी दाद देण्यासारख आहे

या पार्श्वभूमीवर कृष्णमूर्तींच मोठेपण पटतं. प्रत्येकाने आपापले सवाल आपापल्या परीने सोडवावेत. गुरू असलाच तर तो फक्त सवाल विचारण्यापुरता. उत्तराचं मोहोळ शिष्यानेच उठवायचं, त्यातले नवे प्रश्न शोधायचे.

पडित भीमसेन जोशीनी एके ठिकाणी म्हटलय की खरा गुरू तो, जो शिष्याला मोकळया आकाशात स्वतत्र भरारी मारण्याचं सामर्थ्य देतो अन् खरा शिष्य गुरूबाजीच्या 'इटलेक्च्युअल हेझ' मध्ये न गुरफटता नव्या वाटा शोधतो. गुरू 'फेड–आऊट' होतो.

कृष्णमूर्ती असेच फेड–आऊट झाले. उरलेत ते फक्त काही अस्वस्थ करणारे प्रश्न.

## □ जॉर्ज आणि राजकारण

जोवर मुबई नावाचं सात बेटाच शहर या भूतलावर साखसूरत आहे तोवर ज्यॉर्ज फर्नांडिस आणि त्यांच्या 'बंद' ला मरण नाही.

परवाचा फर्नांडिससाहेबांचा बद चागला दणदणीत पार पडला. या मुबंवर राज्य कुणाचं असं जर कुणी विचारल तर आम्ही फर्नांडिसजीच नाव घेऊ. आता ही हुकमत औट घटकेचीच ठरते हा भाग वेगळा.

फर्नांडिस कितीही 'बद' यशस्वी करोत, निवडणुकीत मात्र अद्याप त्याच्या हाताला यश लागत नाहीये. बाका, मुझफ्फरपूर, बगळूर असा तिरंगी प्रवास करून झाला पण ज्यॉर्जबाबू काही लोकसभेत जाण्याची लाईन दिसत नाही. आता प्रेक्षकांच्या गॅलरीतून थेट सभागृहात उडी–बिडी जर घेतली तरच काय तो प्रवेश होईल. तात्पुरता का होईना!

लोकाच काही औरच असतं. दादर ठेशनाच्या रूळावर आडवं पडायला त्यांना ज्यॉर्ज हवा. आरोळया ठोकायला, बसेस–गाड्या थाबवायला त्याना ज्यॉर्ज हवा. पण लोकसभेत मात्र नको. थोडीशी तरी कृतज्ञता हवी की नको माणसात ?

*लोकाच्या या संधीसाधू प्रवृत्तीला कंटाळून* अनेक चागली माणस राजकारणातून उठून गेली. उदाहरणार्थ, राजनारायण. ते साप्रत हिंदी सिनेमात गुरू नानकाच काम करताहेत. हिंदू–शीख संबध सुधारण्यासाठी. जगजीवनराम, चरणसिंग असून–नसून सारखेच. वसतदादा राज्यपाल झालेत. बाबासाहेब भोसले आत्मकथन लिहिताहेत.

आता उरलीयेत ती माणसं म्हणजे कम्प्युटर सस्कृतीतली. त्याना लोकांची कदर नाही. म्हणून उठसूठ भाववाढ काय होते, धाडी काय पडतात.

ज्याच्या घरी आयकरखात्याच्या धाडी पडल्या अशा उद्योगपतीनी एक पक्ष काढायचा ठरवलाय म्हणतात त्याना फक्त नेता हवाय. सिच्युएशन वेकट. अर्जदार आहे का कोणी ?

## □ हेमामालिनी ती हेमामालिनीच !

हेमामालिनीने परवा सार्वजनिक साफसफाई केली. त्याचे फोटो बघून आम्हाला मूठभर मास चढलं. एवढी नामांकित कलाकार. गाठीला पैसा–अडका अलोट. इतकं असूनही चक्क सार्वजनिक रस्त्याची झाडलोट करते

अगात झोकदार सलवार–खमीस. पायात पाढऱ्या, उच टाचेच्या सॅण्डल. डोळयाला उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून खास चष्मा. केस खाद्यावर मोकळे सोडलेले. हातात झाडू. चेहऱ्यावर सत्त्वशील सेवाभावी एक्सप्रेशन... आम्ही धन्य झालो. शप्पथ.

आता एक बरीक खरं की हातात झाडू दिला तरी हेमामालिनी ही हेमामालिनीच दिसणार. 'मीरा' नावाच्या संतपटातसुद्धा हेमामालिनी मीराबाई दिसली का ? नाही. हेमामालिनीच दिसली. तोच तर या बयेचा खास गुण आहे. कोणत्याही सिनेमात पहा. ही आपली हेमामालिनीच वाटते. आमच्या अरुण जोगळेकराचंही असच आहे. कोणत्याही नाटकात पहा. जोगळेकर हे जोगळेकरच वाटणार. कधी म्हातारे जोगळेकर तर कधी प्रौढ जोगळेकर. बट जोगळेकर इज ऑलवेज अ जोगळेकर. त्याला त्या सई परांजपे तरी

बापड्या काय करणार ?

आता हेमामालिनी खुद्द आपल्या घरी केरवारे, झाडलोट करते किंवा नाही हे समजायला तस कठिणच आहे. ती धर्मेन्द्रची आवडती बायको म्हणजे सडा-शिपड, दळण काडण वगैरे कामाचा भोगवटा या बाईच्या नशिबी नसावा. तरीही त्यानी अंधेरीचा हमरस्ता जाहिरपणे झाडून काढावा याच विशेष कौतुक वाटतं

नाही तर आमच्या बायका सहा बाय आठची खोली झाडायची म्हटल की त्याना जणू काय कपाळशूळ होतो. नसता त्रागा काय करतील. झाडूच काय आपटतील. पण मग आपल्या घरातल्या आयाबहिणी म्हणजे हेमामालिनी नव्हत काही हेमामालिनी ही हेमामालिनीच. अँण्ड ऑलवेज अ हेमामालिनी -हातात केरसूणी दिली तरी.

—विष्णू जयदेव

# पुणे वार्ता

### □ पथनाटयांची अभिनव स्पर्धा

*स्पर्धा आणि स्पर्धक याचा पुण्यात तुटवडा* नाही निदान सास्कृतिक स्वरूपाच्या स्पर्धाना तरी मरण नाही याचाच अनुभव आल्पेन दौफ फिल्म्स् इन्कार्पोरेट या सस्थेने आयोजिलेल्या पथनाटय स्पर्धेतही आला. थोडया थोडक्या नव्हे तर ३२ सघानी या स्पर्धेत भाग घेऊन पुणेरी रस्ते गाजवले.

प्रोसिनियम आर्चच्या चौकटीतून नाटक केव्हाच बाहेर पडले आणि पथनाटयाच्या माध्यमातून ते चक्क रस्त्यावरही आले. गेल्या काही वर्षात पथनाटयाचा प्रभाव वाढताना आढळतो आहे. विविध सामाजिक आणि राजकीय समस्याकडे जनतेचे लक्ष वेधण्याचे ते प्रभावी माध्यम बनले आहे या बरोबरच ते चागले विकसितही होते आहे. या पार्श्वभूमीवर ही पुण्यातली पहिली वहिली पथनाटय स्पर्धा. तिला मिळालेला हा जबरदस्त प्रतिसाद पहाता या माध्यमाची लोकप्रियता लक्षात येते. दि २४, २५ आणि २६ फेब्रुवारीला पुण्यातील विविध ठिकाणी पथनाटये सादर झाली. परीक्षकानी ती प्रेक्षकामध्ये उपस्थित राहून पाहिली

अर्थात सगळीच पथनाटये काही पहाता आली नाहीत. पण एकूणच या नाटकाचा सूर विविध सामाजिक समस्याच्याकडे होता. हुडाबळी, बेकारी, भ्रष्टाचार, व्यसनाधिनता, दुष्काळ, नारी अत्याचार, झोपडपट्टयाचे प्रश्न आदी विषयावर प्रसंग सादर केले गेले. हुडा प्रश्नावर मात्र बराच भर आढळला.

रस्त्यावर अचानक ढोलके वाजू लागते किंवा गोंगाट ऐकू येतो. दहा-बारा तरुण गोळा होतात. काही घोषणा होतात. कधी कधी कोरसमध्ये गाणे सुरू होते आणि जाणारा येणारा थबकतो. गर्दी वाढू लागते. आपोआप एक रिंगण तयार होते आणि सादर होते पथनाटय हा अनुभव असख्य पुणेकरानी या तीन दिवसात घेतला.काही सघानी या पथनाटयात छोटे मोठे नेपथ्यही आणले रंगभूषा आणि वेषभूषेचाही वापर केला. 'इन्साफ' या हिंदी पथनाटयात न्यायालयाचे कठडे लावण्यात आले तर 'चिऊताई चिऊताई दार उघड' मध्ये विविध आकाराचे रगीबेरंगी ठोकळे वापरण्यात आले भोपाळ दुर्घटनेच्या सदर्भात झालेल्या पथनाटयात कवटयाचा परिणामकारक वापर करण्यात आला

पथनाटयात पात्राचे आवाज लोकापर्यंत पोहोचणे महत्त्वाचे असते. या संदर्भात काही सघ आवाजाच्या बाबतीत कमी पडले आणि विषयाची निवड चागली असूनही प्रभावीपणे माडू शकले नाहीत. 'इन्साफ' या पथनाटयाच्या बाबतीत हा अनुभव प्रकर्षाने जाणवला. तर भोपाळचा विषय चागला कोरस आणि न्हिदम याच्यामुळे चागला उचलला गेला मुलगी झाली हो! दुल्हा बिकता है! चिऊताई चिऊताई दार उघड, अभिजात रंगभूमीने सादर केलेली दोन पथनाटये ही आणखी काही उल्लेखनीय पथनाटये!

या स्पर्धेमधून मोठया सख्येने युवकांनी भाग घेतला हे विषयही त्यानीच लिहिलेले-माडलेले आणि निवडलेले त्याची सामाजिक प्रश्नाबद्दलची आस्था या माध्यमातून प्रकट झाली हेच या स्पर्धेचे मोठे यश म्हणावे लागेल

### □ अनुराधा पाटील-ग्रँड स्लॅम

'मराठवाडयात कै. नरहर कुरुदकर पारितोषिक पटकावल्यानतर पुण्यात अनुराधा पाटील याच्या 'तरीही' काव्यसंग्रहाने कविश्रेष्ठ कुसुमाग्रज पारितोषिक पटकावून ग्रँड स्लॅमच्या दिशेने पाऊल टाकले आहे,' अशा शब्दात वसंत बापटानी अनुराधा पाटलाचा या पारितोषिकाच्या निमित्ताने गौरव केला. कॉन्टिनेन्टल प्रकाशनाच्या अनतराव कुलकर्णी यांनी पुरस्कृत केलेल्या आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने देण्यात येणाऱ्या या पारितोषिकाच्या पहिल्या मानकरी मराठवाडयातील उगवत्या कवयित्री अनुराधा पाटील ठरल्या ! अनुराधा पोतदार, गो. म कुलकर्णी आणि अनिरुद्ध कुलकर्णी या परीक्षक मंडळाने त्याच्या 'तरीही' या काव्यसग्रहाची एकमुखाने निवड केली. कुसुमाग्रजाच्या ७५ व्या वाढदिवशी हा पारितोषिक वितरण सोहळा म सा. प. च्या पटवर्धन सभागृहात वसत बापट याच्या अध्यक्षतेखाली पार पडला

'कविश्रेष्ठ कुसुमाग्रजाच्या नावाने असलेला हा सन्मान परीक्षकापैकी कोणीही मराठवाडयातला नसताना त्या भागातील एका उगवत्या कवयित्रीला मिळतो तो केवळ गुणवत्तेच्या निकषावरच. तेव्हा नवोदिताबद्दल कोणाच्या मनात अढी आहे आणि त्याची उपेक्षा होते आहे हा गैरसमज नवोदितानी काढून टाकावा त्याची उपेक्षा कोणीही करत नाही ' असे वसत बापट नवोदिताना उद्देशून म्हणाले.

कविवर्य वसत बापटाचे अध्यक्षीय भाषण मिश्किल आणि खेळकर झाले. या प्रसगी केवळ गोड गोड न बोलता त्यानी संग्रहातील काही उणीवावरही भाष्य केले आणि या अनुषगाने नव्या कवीच्या चक्रावर्तावरही थोडी फार चर्चा केली. ही नवी कविता खेळकर नाही-निर्भर नाही. कविश्रेष्ठ कुसुमाग्रजाच्या कवितेसारखी ओठावर नाचणारी नाही असे मत त्यानी व्यक्त केले. वेगवेगळे जीवनानुभव कवितेतून व्यक्त व्हावेत ही अपेक्षा त्यानी सागितली

त्याआधी अनुराधा पोतदारानी परीक्षकाच्या वतीने विवेचन केले हा कवितासग्रह निवडताना त्यांनी लागलेल्या काही चागल्या कविता सग्रहाचा त्यानी उल्लेख केला 'तरीही या काव्यसग्रहातील कविता एक आगळे वेगळे भावजीवन व्यक्त करते आशयगर्भ अशा ह्या कविता म्हणजे एका कवयित्रीच्या मनाचे

अखड स्पदन आहे. सौ. अनुराधा पाटील यांनी या प्रसगी आपल्या काही कविता सादर केल्या. सर्वच वक्त्यांनी कुसुमाग्रजाचा गौरव करताना त्याना वाढदिवसानिमित्ताने शुभेच्छा दिल्या

—मनोहर सोनवणे

## कान्होजी आंग्रे—प्रकाशन

सोमवार दि. २४ फेब्रु. ८६ ला सध्याकाळी पुण्याच्या बालगधर्व रगमदिरात सन पब्लिकेशन्सचे श्री म. ना. जोशी यानी एक शानदार समारभ आयोजित केला होता. एखाद्या आवडत्या लेखकाच्या नाटकाला उत्सुकतेने गर्दी करावी त्याप्रमाणे श्रोत्यांनी या कार्यक्रमाला गर्दी केली होती पुस्तक प्रकाशनसमारभाला इतकी गर्दी ही नवलाईच पण श्री. मनोहर माळगावकराना पहाण्याचा, त्याच भाषण ऐकण्याचा दुर्मिळ योग आणि ज्याचा कधीच कटाळा येत नाही असे पु. ल. हे दोघेही एकत्र समोर येणार असल्यामुळे श्रोत्यांमध्ये उत्साहाच वातावरण होत.

कर्नल मनोहर माळगावकरानी २५–३० वर्षापूर्वी इग्रजीत 'कान्होजी आग्रे' ही ऐतिहासिक चरित्रपर कादबरी लिहिली. या कादबरीच्या पु. ल नी. केलेल्या मराठी अनुवादाचा हा प्रकाशन समारभ होता. प्रकाशन होत, लोकसभेचे माजी खासदार, कान्होजी आग्रे याचे वशज सरदार आंग्रे याच्या हस्ते !

पसायदानाच्या मधुर स्वरानी कार्यक्रमाला सुरुवात झाली. श्री जयत जोशी यांनी प्रकाशकाच निवेदन वाचून दाखवलं. सन पब्लिकेशन्सच हे १०५ वे पुस्तक असल्याच सागितलं. समारभाला साजेशा अशा मोजक्या नीटस निवेदनानतर प्रकाशकानी अनुक्रमे सरदार आग्रे, मनोहर माळगावकर, पु. ल देशपाडे, कल्पना मुद्रणालयाचे श्री. लाटकर, चित्रकार कर्नल दिनकर कैरकर याचा यथोचित सत्कार केला.

सत्काराच्या कार्यक्रमानतर सरदार आग्रे यांनी पुस्तकाचे प्रकाशन केले आणि आपले भाषण वाचून दाखविण्यास प्रारंभ केला. त्याचे उच्चार, वाचनपद्धती पुणेकर श्रोत्यांना खटकणारी होती. त्याना मराठीची सवय नसावी हे स्पष्ट कळत होत. पण थोड्या वेळानतर मात्र भाषण ठाकठीक वाचलं गेलं. त्यानी माडलेले विचार मननीय होते. आजच इतिहास लेखन विकृत स्वरूपाचं आहे. नव्या पिढीशी चकवाचकवी चालू आहे याची खत त्यानी व्यक्त केली. ऐतिहासिक सत्याशी कधीच प्रतारणा करता कामा नये हे स्पष्टपणे सागितल. राजकारणी लोकाना इतिहासाच ज्ञान असणं ही अत्यावश्यक बाब आहे हे मत व्यक्त केल. भारतीयाची एक चूकही निदर्शनाला आणून दिली की आपण आपल्या इतिहासाचं जगाला दर्शन घडविण्यात सदैव मागे राहिलो, उलट पाश्चात्यानी त्यांच्या लहान-सहान लोकाचाही गौरव केला. त्याना लोकापुढे आणलं. आपण मात्र आपल्या कर्तृत्ववान माणसाची बूज राखली नाही. कान्होजी आग्रे हे शिवाजीच्या दरबारातील एक रत्न होतं. त्याचा वशज असल्याबद्दलचा अभिमान त्यांनी व्यक्त केला.

सरदार आंग्रे याच्यानंतर ज्याच्याबद्दल विशेष उत्सुकता होती ते मनोहर माळगावकर बोलायला उभे राहिले त्याच्या इंग्रजी मराठी मिश्रित भाषणाने खर सागायच तर निराशाच केली. प्रसगानुरूप थोडं आणि इतर गप्पा, विनोद यावर भर असं त्याच्या भाषणाच स्वरूप होतं पु. ल. नी माझ्या पुस्तकाचा अनुवाद करून मला हेमिग्वे, टागोर याच्या रागेत बसवल आहे असा त्यानी गमतीने उल्लेख केला आणि पु. ल च्या मराठीचा माझ्यावर प्रभाव पडला असा त्यांचा गौरव केला. इग्रजी कादंबरी लिहिताना ज्यानी मोलाची मदत केली त्या श्री. के आपटे याचा माळगावकरानी कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला

पु ल. नी माळगावकरांची काही विधान गमतीने टोलवून विनोदाचा शिडकावा केला. माझी भूमिका ही दुय्यम स्वरूपाची कशी आहे तेही हशा–टाळ्याच्या गजरात खुलवून सागितल त्यानतर त्यानी कादबरीतल एक प्रकरण वाचून दाखवल. पु. ल. च वाचन म्हणूनच हा प्रकार सुसह्य होता नाहीतर ही कल्पना फारशी श्रोत्याना आवडणारी होती असं वाटत नाही. त्या प्रकरणाच्या सुरुवातीच काव्य वाचताना बहार आली. त्या ओळी अशा होत्या—

नावाडी गड्याना तांडेल कसा—
अस्सा अस्सा मिळावा
वाटे, हुकुम खुषीनं पाळावा ।।
वादळासारखा उसळावा
अन् पावसासारखा कोमळावा
मोकळे भाळ अन् हात उदार
सुरेइतकाच सूरहि प्यार
डोलकाठीवर पहिला स्वार
अन् सखीच्या महाली हिंमतबाज
रंगात येऊन खुलावा ।।
अस्सा ताडेल मिळावा.

कार्यक्रमाची फलश्रुती म्हणायची तर पु. ल. नी केलेलं या ओळीच वाचन. नतर सर्वांचे आभार मानून त्यानी भाषण सपवलं आणि प्रकाशकाच्या वतीने आधीच आभार मानलेले असल्याने कार्यक्रम आटोपशीरपणे संपला.

— मेधा सिधये

## सांस्कृतिक नागपूर

### □ शरियत आणि मोगल राज्यकर्ते

महाराष्ट्रात सध्यासुद्धा साहित्य आणि सशोधन क्षेत्रात कुळकर्ण्यांची इतकी गर्दी आहे की त्याची मोजदाद करणे कठीण आहे साहित्यात व. दि., द. भि., भीमराव, विनायक, वा म, गो. म., नारायण, श्री. मा. कुलकर्णी इत्यादींची नावे सहज जाता जाता आठवतात तर पुष्कळसे कुलकर्णी इतिहास संशोधनात आढळतात अ रा, ए. एम, प्र. न. आणि असे कित्येक कुलकर्णी सशोधनाच्या क्षेत्रात मुसाफिरी करताना आढळतात. त्यापैकी पुण्याचे एक कुलकर्णी— डेक्कन रिसर्च इन्स्टिटयूटमधील मराठा इतिहासाचे माजी प्रमुख आणि भारत इतिहास संशोधन मडळाचे सध्याचे कार्यवाह,डॉ. गो त्र्यं. कुलकर्णी विदर्भ सशोधन मडळाच्या आमत्रणावरून खरे व्याख्यानमाला गुफण्याकरिता येथे आले आणि पहाता पहाता त्यानी आपल्या अभ्यासू वृत्तीने आणि नवीन सशोधनाने येथल्या जाणत्या लोकाची मने जिकून घेतली. व्याख्यानाला उभे राहिल्यानंतर हा गृहस्थ

इतका खोल पाण्यातला असेल असे कोणाला वाटलेही नसेल परंतु हळूहळू पर्शियन कागद पत्राच्या अभ्यासातून त्यानी एकेक मौक्तिके दाखविण्याला ज्यावेळी प्रारभ केला त्यावेळी श्रोते एकदम जागृत होऊन बसले आणि पलिकडे तर सर्व सभाच त्यात रगून गेली. त्यानी प्रचलित समजुतीना धक्का देणाऱ्या ज्या गोष्टी सागितल्या त्या पुढीलप्रमाणे–

१) भारतातील मुसलमान शासकाची वागणूक नेहमीच कुराण आणि शरियत याच्याविरुद्ध राहिली आणि ती तत्कालीन मुसलमान समाजाने सहन केली.

२) रार्मासह आणि शिवाजी महाराज याचे संबध विशेष मित्रत्वाचे नव्हते रामसिग आणि जयसिग ह्याना मोगल बादशहाकडून स्वतःचा स्वार्थ साधावयाचा होता शिवाजीच्या भवितव्याबद्दल त्याना विशेष आस्था नव्हती. शिवाजी महाराजाचा जीव वाचला तो केवळ बेगम साहिबामुळे. जयसिगाच्या स्वभावाचे आकलन शिवाजी महाराजाना झाले नाही' ही शिवाजीच्या जीवनातील पहिली आणि शेवटची चूक होती.

३) मराठ्यानी औरगजेबाशी जे पचवीस वर्षे युद्ध केले त्याला 'मराठ्याचे स्वातत्र्य–युद्ध' का म्हणावयाचे ते मला कळत नाही. मराठ्याचे राज्य त्यावेळी शिल्लक होते त्यामुळे तो दोन राज्यामधला संघर्ष होता. राजारामाने ज्यावेळी 'हे राज्य तुमचे आहे, त्याचे रक्षण तुम्ही करा,' असे सागितले त्यावेळी ह्या सघर्षाचे रूपातर लोकसघर्षात झाले. व्याख्यानाच्या प्रारभी कुलकर्णी, ते व्याख्यानाकरिता कोणती आधारभूत साधने घेतलेली आहेत ते सागत. त्यामुळे नाणे कसे खणखणीत वाजे ! ब्रेव्हो कुलकर्णी ! !

### □ पुसदची इतिहास परिषद

त्यानतर लगेचच म्हणजे फेब्रुवारीच्या २२ आणि २३ तारखाना पुसदला नागपूर विद्यापीठ इतिहास परिषदेचे १८ वे समेलन भरले. त्याला अध्यक्ष होते डॉ. शरद कोलारकर आणि प्रमुख पाहुणे होते पुन्हा तेच– डॉ. गो. त्र्य. कुलकर्णी. ग्रामीण क्षेत्रातील इतिहास प्राध्यापकामध्ये इतिहास शिकविण्याबद्दल उत्साह निर्माण व्हावा आणि सशोधनाबद्दल आस्था निर्माण व्हावी ह्याकरिता ही परिषद स्थापन झाली आणि पहाता पहाता ह्या सस्थेने बाळसे धरले. अध्यक्षपदावरून बोलताना डॉ. कोलारकर यानी आत्तापर्यंत परिषदेने काय मिळविले याचा जमाखर्च मांडला आणि इतिहास अध्यापन, अध्ययन आणि सशोधन क्षेत्रात विदर्भातील परिस्थिती निश्चितच समाधानकारक आहे असा आवर्जून निर्वाळा दिला डॉ. कुलकर्णी यानी उद्घाटनपर भाषणात खानदेश आणि खानदेशच्या इतिहासावर विशेष भर दिला. खानदेश आणि विदर्भाचा काय सबध असे वाटून प्रतिनिधी एकमेकाकडे पाहू लागले. त्यावेळी पश्चिम महाराष्ट्राने केलेल्या आक्रमणामुळे विदर्भाची आणि खानदेशची परिस्थिती एकच झालेली आहे. विदर्भाने तर उत्तरेकडून आणि दक्षिणेकडून दोन्ही बाजूनी थपडा खाल्लेल्या आहेत. तरी ह्या दोन्ही प्रदेशानी आपली वेगळी सस्कृती कायम टिकविली आहे ह्या दोन्ही प्रदेशाचा वारसा आणि समस्या एकच असल्याने अभ्यासकानी असा दृष्टिकोन घेऊन अभ्यास केला पाहिजे असे डॉक्टरसाहेबानी बजाविले त्यावेळी प्रतिनिधीचे चेहेरे उजळून गेले होते. त्यानतर 'इंडियन नॅशनल कॉंग्रेसची शताब्दी' यावर परिसवाद होऊन परिसवादाचे अध्यक्ष डॉ. देवपुजारी यानी १९४७ मध्येच कॉंग्रेसचे विसर्जन होणे आवश्यक होते असे मत माडले.

इतिहास परिषदेचे हे १८ वे समेलन अ. भा मराठी नाट्य समेलनानतर लागलीच भरलेले होते. परतु तरी पुसदच्या कार्यकर्त्यांचा उत्साह ओसडून वहात होता त्याचे सर्व श्रेय डॉ. हिराणी, प्राचार्य जोहरी आणि प्राध्यापक निकम याना नाटकाइतकीच पुसदच्या लोकाना इतिहासाची आवड आहे हीच गोष्ट त्यावरून दिसून आली

–शरश्चंद्र

## सांस्कृतिक डोंबिवली

### □ वृद्धयुवा कवी . इनामदार

डोंबिवलीच्या सास्कृतिक जीवनात ज्या साहित्यिक सस्था कार्यरत आहेत त्यापैकी 'साहित्यसभा, डोंबिवली' आणि 'काव्यरसिक मंडळ, डोंबिवली' ह्या दोन मातब्बर सस्था आहेत. इतरत्र सस्था जीवनात जे दिसते तेच इथेही असावे असे वाटते. सभासद आणि म्हणून पदाधिकारी अनेक असले, तरी मूठभर डोकी आणि हातच (अर्थात पायही) काम करीत असतात. सौ. विनीता ऐनापुरे ह्या साहित्यसभेच्या अध्यक्ष झाल्यापासून त्यानीच अनेक वर्षे हे पद साभाळावे असे सभासदाना आणि श्रोत्याना वाटते आहे– सभेने अनेक उपक्रम यशस्वीरीत्या पार पाडले. डोंबिवली नागरी सहकारी बँकेकडून अनुदान मिळवण्यात आणि ते योग्य कारणासाठी वापरण्यात त्याना यश मिळाले आहे साहित्य सभा आणि काव्यरसिक मडळ ह्या दोन सस्था वेगळ्या असल्या तरी त्याचे अनेक सभासद व कार्यकर्ते समानच आहेत. त्या शिवाय ज्या लहान मोठ्या काम करणाऱ्या आणि केवळ नावापुरत्या किंवा एखाद्या व्यक्तीच्या अहकारातून जन्मलेल्या ज्या साहित्य विषयक कार्य करणाऱ्या सस्था आहेत त्यानी एकत्र येऊन मोठ्या प्रमाणावर कामे का करू नयेत ? अनेक भरीव आणि स्थायी स्वरूपाची कामे ह्या नगरीत होणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ वसत ऋतूनील दहा-पधरा दिवस चालणारी–सातत्याने–व्याख्यानमाला कार्यक्रमासाठी, बाहेरच्या साहित्यिकाना निवास करता येईल अशी मोठी, सोयीनी युक्त अशी वास्तू, खुले बदिस्त नाट्यगृह, वातानुकूलीन सभागृह असे प्रकल्प हातात घेता येतील. ह्या गावातील राजकीय पक्षाना ह्या गोष्टीचे सोयरसुतक नसणे अगदी साहजिक आहे.

श्री हरी रामचद्र इनामदार हे जुने डोंबिवलीकर वयाची सत्तरी उलटलेला हा वृद्धयुवा, काव्यरसिक मंडळाचा आणि साहित्य सभेचा क्रियाशील सभासद आहे त्याच्या 'गौतमबुद्ध आणि इतर कविता' ह्या काव्यसंग्रहाचा प्रकाशन समारंभ साहित्य सभेने आयोजित केला

श्री. इनामदार ह्यानी आपल्या ह्या सग्रहाचे प्रकाशन आपल्यासारख्याच चिरतरुण असणाऱ्या, जन्याट जुना आणि नव्यात नवा असणाऱ्या प्रा माधव मनोहर ह्याच्या हस्ते व्हावे अशी इच्छा प्रकट केली दादर ते डोंबिवली हा लोकलचा प्रवास झेपत

पृष्ठ ३० वर

# आपण असे जगतो

### □ असूया आणि संताप

जुनी पिढी आणि नवी पिढी याच्यामधील फरक दर्शविणारी एक गोष्ट असते. ती म्हणजे असूयेच्या बाबतीतला त्याचा दृष्टिकोन. *जेव्हा कारण नसताना असूया वा द्वेष* केला जातो तेव्हा ती गोष्ट निद्यच समजली जाते; पण तसेच काही कारण असेल तर असूया व संताप समर्थनीय म्हणण्याची पूर्वापार प्रथा आहे अथेल्लोने डेस्डिमोनाचा खून केला ही गोष्ट अयोग्य, कारण का तर डेस्डिमोना ही निष्कपट होती; पण जर खरोखरच तिचा परपुरुषाशी संबंध असता, तर मात्र अथेल्लोचे हे कृत्य त्याच्या अंमलदारी अधिकाराला शोभेसे व योग्य ठरले असते.आजही बायको पातिव्रत्यापासून ढळली असेल, तर तिच्यावर शारीरिक प्रहार करणाऱ्याकडे लोक काहीसे सहानुभूतीनेच पहातात.

अशा असूयेपोटी फारच मोठमोठ्या हिंसक घटना घडतात असे दिसते. अगदी डोक्यात खून चढावा एवढा हा संताप कशामुळे जन्म पावतो ? तर त्यामागे आपले काही हक्क पायदळी तुडवले गेल्याची भावना असते. आता जर माणसाची आपल्या हक्काविषयीची कल्पनाच काही अशी बदलली, तर साहजिकच असूयेपोटी निर्माण होणाऱ्या संतापाची तीव्रता कमी झाल्याशिवाय व्हाणार नाही. याचा अर्थ एखाद्या सामाजिक परिस्थितीतला माणूस हा फक्त बराचसा दुखावला जाईल.

तेव्हा असूया आणि संतापापोटी होणारा हिंसाचार कमी करण्याचा एकच मार्ग दिसतो, तो म्हणजे सामाजिक परिस्थितीत बदल घडवणे जर एखाद्या माणसाने आपल्याला पैशाच्या व्यवहारात ठकवले तर आपल्याला अतिशय संताप येतोच; पण आपण न्याय मिळवण्यासाठी त्या बेरिम माणसाला न्यायालयात न्यावे, अशी अपेक्षा असते. त्यावर खासगी सूड अपेक्षित नसतो. जो समाज सुसंस्कृत आहे त्या समाजात खासगी अन्यायाचे निवारण खासगीरीत्या हिंसाचार करून कुणी करावे, हे सर्वस्वी संस्कृतीविसंगत ठरेल.

आपण हे मान्य करू की, ज्यामुळे असूया निर्माण होईल, अशा गोष्टीला थाराच द्यायचा नाही हे केव्हाही चांगलेच; परंतु तरीही पुष्कळांकडून असे काही घडत रहाणारच की, जे असूयेला जन्म देईल आणि जर असूया निर्माण होणे ही सामाजिकदृष्ट्या गौरवाचीच बाब असेल तर मग ज्यामुळे निकटच्या संबंधितांच्या मनात असूया निर्माण होऊ शकेल, अशा गोष्टी चोरून केल्या जातील आणि दोन माणसातली अगदी निकटची नाती ही परस्पर फसवणुकीचे आगरच होईल. प्रत्येक पुरुषाला याची जाणीव असते की, असे काही विवाहबाह्य नाजूक संबंध क्वचित प्रसंगी निर्माण होऊ शकतात, परंतु त्यामुळे लगेच वैवाहिक जीवन उध्वस्त करण्याची त्याची इच्छा नसते. मात्र हीच गोष्ट आपल्या पत्नीच्या बाबतीत मान्य करायला त्याची तयारी नसते. प्रत्येकजण लैंगिकतेच्या दोन भिन्न प्रकारच्या मानसिक अवस्था जवळ बाळगून असतो एक त्याला स्वत:ला लागू असणारी व दुसरी पत्नीला . या दोन्ही परस्पर इतक्या भिन्न असतात की, त्याचे काहीही संबंध दिसत नाही. स्वत बद्दल तो जी अवस्था मान्य करतो ती वास्तवाला व सत्य परिस्थितीला धरून असते; पण पत्नीच्या बाबतीत ती सत्याला धरून नसते आणि सत्याला धरून नसणाऱ्या कोठल्याही गोष्टीचा दीर्घकाळ विश्वास ठेवून अती कोणाचे भले होत नाही.

आपली पत्नी ही आपल्यापेक्षा सद्‌गुणी व पवित्र आहे, अशी जर बालबाल खात्री नसेल तर अनेक नवऱ्यांना आयुष्य असहनीय होईल असे म्हटले जाते. अर्थात हेदेखील सामाजिक अपेक्षा व रूढी यावर अवलंबून रहाणार. आपल्या जेव्हा अगदी प्रथमच हे ध्यानात येते की, आपले अगदी जवळचे मानलेले मित्र हे आपल्यामागे आपली यथेच्छ थट्टा करतात, तेव्हा आपला राग अनावर होतो; पण थोडा विचार करता लक्षात येते की, आपणही अनेकदा मित्राच्या बाबतीत हेच करीत आलो आहोत आणि आपल्यातले हास्यास्पद दोष मात्र कुणी उगाळू नयेत, अशी अपेक्षा व्यर्थ आहे. हाच नियम संताप अनावर करणाऱ्या असूयेसारख्या अधिक गंभीर बाबींना लागू आहे.

### □ म्हाताऱ्यांनी आणलेले संकट !

नुकतीच बातमी आली की रशियाचा शहेनशहा गोर्बाचेव यांनी ७८ वर्षाच्या एका लष्करी प्रमुखाला निवृत्त केले व त्याचे जागी तरुण माणूस नेमला. या तरुण माणसाचे वय ६५ आहे !

अगदी पहाता पहाता चालू काळातील एक मोठेच संकट आपल्यावर कोसळू पहात आहे वैद्यकीय क्षेत्रातील नव्यानव्या शोधामुळे माणसाची आयुष्यमर्यादा खूपच वाढली असली, तरी माणसाच्या कर्तबगारीच्या वयोमर्यादेत वाढ झालेली नाही. गेल्या साठ वर्षांत–लोकसंख्या वाढीवर भारतात तरी फारसा परिणाम नसला तरी, मरणाऱ्यांची संख्या कमीकमी होत चालली आहे. लोकसंख्या रोखण्याचे प्रयत्न सुरू आहेत, मात्र माणसे मरणार नाहीत याची अधिक अधिक काळजी वैद्यकशास्त्र घेत आहे.

या दुर्दैवी बदलाचे परिणाम आता दिसू लागले आहेत. पुष्कळ देशातील मंत्र्याचे सर्वसामान्य वय ७० आहे ! एकेकाळी ही सर्व मंडळी धडाडीची व सामाजिक–राजकीय निर्णय घेण्याची क्षमता असलेली असणार. आपल्या अभ्यासपूर्व मताला घट्ट चिकटून त्यानुसार वागणारी असणार. पण आता त्यांची स्थिती कशी असेल ? शारीरिक अक्षमता कुणाला चुकत नाही स्नायूच फक्त घट्ट होत नाहीत तर वृद्धाच्या सवयी ठरून जातात. प्रत्येक दिवशी ठराविक चक्रातून जाण्यावरच त्याची भक्ती जडते ठरल्यावेळी दाढी करणे, ठरल्यावेळी औषध घेणे, अनेक वेळा सांगून झालेले आयुष्यातील प्रसंगच पुन: पुन: इतरांना सांगत रहाणे, हे त्याचे सर्वस्व होते. बौद्धिक पातळीवर तो याबाबतीत ठाम असतो की बदल सतत झाला पाहिजे, कारण आयुष्यभराची ती चर्पटपंजरी त्याला मुखोद्‌गत असते. परंतु प्रत्यक्षात कसलाही बदल

त्याला सहन होत नाही. यामुळेच वयोवृद्ध सुधारणावादी हा अशा एका खिन्न परिस्थितीत असतो की, जोपर्यंत त्याच्याच्याने काहीही परिणामकारक होत नाही तोपर्यंत तो सुखी असतो. आतापर्यंत ज्या गोष्टी केल्या त्या करायच्या थांबणे त्याला शक्यच नसते—यातच प्रगती होण्यासाठी बदलाची वार्षिक तरफदारी अंतर्भूत असते—मात्र प्रत्यक्षात काहीही बदल त्याला मानवणारा नसतो. तो एक ठाम स्थितीवादी झालेला असतो. परिणामी वैद्यकशास्त्रातील प्रत्येक नव्या सुविधेबरोबर अधिक अधिक स्थितीवादी व परिवर्तनविरोधी वृद्धांची संख्या सतत वाढणार, असे होणार आहे. कदाचित आणखी पन्नास-शंभर वर्षांनी बहुतेक लोकांनी पाऊणशे वयमान पार केलेले असेल. कुरकुर करणारी तोंडातल्या तोंडात बोलणारी, वार्धक्याच्या वेडसरपणाचा परिणाम झालेली, तरीही श्रीमंती, मानमरातब असल्याने प्रबळ दरबारी अशी ही मंडळी असणार. साठी ओलांडलेली तरुण मंडळी निराश मनाने त्यांच्या जागा घेण्याची वाट पहात असणार !

अशा जगात मग कसलीही प्रगती अशक्यच. मग यावर उपाय काय ? स्विफ्ट या आंग्ल लेखकाने हा धोका पूर्वीच ओळखला होता. त्याने सुचवून ठेवले आहे की, एखादा माणूस ८० वर्षांचा झाला आणि तो मरण्याचे चिन्ह नाही हे स्पष्ट झाले की त्याचा मताधिकार काढून घेण्यात यावा व त्याचा इस्टेटीवरचा हक्क रद्द करावा ! ही फारच मोलाची सूचना होती. पण एकदा सर्व सत्तास्थानावर पाऊणशे वयमान ओलांडलेल्या मंडळींचीच वर्णी असल्यावर ही सूचना स्वीकारली जाण्याची शक्यता दिसत नाही. दुसरा उपाय म्हणजे सर्व डॉक्टर मंडळींनी ८० वर्षांवरील मंडळींना धमकी द्यावी की, 'त्यांनो जर अधिकार सोडला नाही तर त्यांच्यावर कोणीही डॉक्टर वैद्यकीय उपचार करणार नाही—!' मरणाची भीती घातली तर कदाचित हे वृद्ध अधिकारत्यागाला तयार होतील.

किंवा असे केले तर ? सर्व वृद्धांना अंदमान किंवा लखदीपसारख्या बेटांवर ठेवण्यात यावे. त्याना आवश्यक त्या सर्व सुविधा द्याव्या तिथे त्यांच्या हातात जी वर्तमानपत्रे द्यायची त्यावर मात्र मुख्य बंधन हे असावे की, जग हे झपाट्याने विनाशाकडे जात आहे, काहीही सुधारणा होण्याची शक्यता दिसत नाही आहे, अशाच प्रकारच्या बातम्या त्या वृत्तपत्रात असाव्या म्हणजे रोज सकाळी चहा पिताना ही मंडळी जेव्हा वर्तमानपत्र चाळतील तेव्हा त्यांना अनिवार सुख वाटेल व वैद्यकीय शास्त्रातील प्रगतीचे हे दुर्दैवी बळी आपले अखेरचे दिवस सुखात काढतील. जगाला त्यांचा त्रास नाही आणि साठीतल्या तरुणांना त्यांच्या मरणाची वाट पहावी लागणार नाही.

—वि. ग. कानिटकर

---

## वेशीबाहेरचे एक पान

---

**वे**शीबाहेर म्हारानी रेड्याला वढून टाकलं. ते पुन: गावात आले. भोसल्याचं घर गाठलं. भोसल्यानं सूप भरून दाण आणि पाच रुपयाची हिरवी नोट पुढं केली. दाणं आणि पैसं घ्यायला कोणीच उठला नाही.

'रयत, आणि पाच रुपयं द्या.'

'आणि कवातरी बघू.'

'असं काय रोज—रोज घडतंय व्हय.'

तसा भोसले निरुत्तर झाला. खिशातनं आणि पाच रुपये काढून दिलं. सुपातलं दाणं त्यानी तिथच वाटणी करून घेतलं. धोतराच्या सोग्यात बांधले आणि म्हारवाड्याकड निघाले.

चौघांच्या धोतरात दाणं बांधल्यालं बघून सुका म्हारानं वळखलं. तो घारीसारखा घराकडं वळला. सुरी, बारकी कुराड, दोन कामठ्या, दोरी पोत्यात घातली. तो गावाबाहेर निघाला.

दांडगा रेडा सपय झोपला होता. त्यानं रेड्याभोवती चक्कर मारली. मागच्या पायाजवळ थांबला. दोन कामठ्याचा घोडा केला. रेड्याचा मागचा उजवा पाय त्यानं उचलला आणि काठ्याच्या घोड्यावर ठेवला. रगट्यातली सुरी त्यानं बाहेर काढली. रेड्याच्या ढुंगणाकडनं कातडं काढाय लागला. कातड निबार होतं. सुरी पुढं सरकायला दमवत होती.

काम थांबवून भागणार नव्हतं. त्यानं नेटानं काम चालूच ठेवलं. गळ्यापर्यंत येऊन तो थांबला. सोलल्यालं कातड वर उचलून धरायचा आणि दुसऱ्या हातानं कातड्याच्या आत सुरी खुपसून कर्र-कर्र कातडं सोलायचा.

सोलत चाललेला रेडा बघून गावंदरीतली पाच—सहा कुत्री वास घेत आली. कुत्र्याचा जमाव बघून वरची गिधाडं गोल गोल फिरत खाली आली. रेड्यापासनं चार हातावर उभी राहिली. कावळं उतरलं.

सुरी चालवून हात दुखाय लागलं, म्हणून कामात बदल केला. पोत्यातली बारकी कुराड काढून तो शिंगाकडं वळला. शिंगाच्या बुडक्यावर कुराड मारू लागला. डोस्कीकडं 'खाट्' 'खाट्' आवाज यायला लागला तसं गिधाडं रेड्याच्या मागच्या बाजूला लागली. कावळं उतरलं. कुत्री चवताळली. रेड्याची शिंगं काढून त्यान पोत्यात टाकली.

घटकाभर बसला. गिधाडांनी रेड्याचं अंग झाकून टाकलं. कुत्री रेड्यावर तुटून पडली. सुकानं हातात सुरी घेतली कातडं काढाय पुन: जुपी केली. गिधाडं टिचभरबी मागं सरनात. सुकानं सुरीचा हात वर केला की गिधाड उडल्यासारखी करायची. पुन: मांसावर टोच मारायला बसायची, लचकं काढायची. मांसाचा तुकडा लोंबाय लागला की कुत्री जबडा काढून लोंबकळल्याला तुकडा वडायची. सुरीचा हात आडवा करायचं, कुत्री मागं सरायची, गिधाडं जरा उडायची, पुन: बसायची. कुत्री लचका तोडायची. सुकाचा सुरा आडवा व्हायचा. पुन: तेच, तेच पुन:.

सुकाला कायच जमना. कुत्र्यासनी मारायचा. कुत्री मागं सरायची. गिधडं उडल्यासारखी करायची आणि आहे तिथंच बसायची. कुत्रीबी मागं फिरल्यासारखी करायची, तिथंच तोंड लावायची. सुका वैतागला. त्यानं रागानं कुत्र्याच्या पोटातच सुरी खुपसली. तसं कुत्रं केकाटत सुटलं. सुकान पळत जाऊन

सुरी काढून घेतली. तस कुत्री बाजूला झाली. आता गिधडं तुटून पडली. सुकावरच गिधडं बसाय लागली. त्यालाच टोच्या मारू लागली. सुकानं एका गिधाडाची गर्दनच छाटली. गिधाडानी सुकावरच हल्ला केला. सुका दोन्ही हातानं हुसकाय लागला. सुका खवळला. हल्ल्याला न जुमानता टर्रारा कातड काढाय लागला. सगळा रेडा रिकामा झाला. आता गिधाडं, कुत्री, कावळं यानी रेडघाचा कब्जा घेतला.

सुकानं कातड पोत्यात कोबलं. कातड्यावरल्या माशा सुकाभोवती फिरायला लागल्या. पाठीवर पोत घेतलं. वल्या कातड्यानं पोत भिजलं. माशा पोत्यावर बसल्या. त्याची पाठ वल्या पोत्यान भिजत होती. रेडघाची शिंग पोत्यातन बाहेर येऊन, चालताना मानेला घासत होती. जड अगान तो चालला होता.

आपली ही करणी, त्याच्यावर पोटभरणी. त्याला जन्माचा तिटकारा आला होता त्याच मन मेल्याला–सोललेल्या रेडघासारखं झाल होतं. तो चालत होता.

'आरं सुक्या कडला तरी हो की.'

सुका इचारातनं जागा झाला. अवघडल्याली मान वर केली. पुढनं बैलगाडी येत होती. सुका रस्त्याच्या मधन चालला होता. गाडीला वाट दिली गाडी पुढं जात होती. सुकान क्षणभर गाडीकडं वळून बघितलं. गाडीत मेल्याली म्हस होती. म्हसीवर एक पोतं टाकल होत. वल्या कातड्यानं त्याचं अग भिजलं होत. वझ्यान तो वाकला होता. आता दुसर कातड गावतय म्हणून तो पळत होता.

—बापू जाधव
किर्लोस्करवाडी

# भारत बंद : विरोधकांची आगेकूच

१९८५ हे सरलेलं वर्ष राजीव गाधी याचं वर्ष होतं या वर्षात या तरुण पतप्रधानानी अवघ्या देशाला एक मोहिनी घातली होती. मुळातच निवडणुकीत जबरदस्त यश घेऊन त्यानी नव्या (१९८५) वर्षात पदार्पण केले होते आणि भवती असलेले समस्याचे जाळे धडाधड सोडविण्यास सुरुवात केली. पजाब करार, आसाम करार एकेक गोष्टी त्यानी धडाधड करून टाकण्यास प्रारभ केला. 'युगप्रवर्तक' भासणारा अर्थसकल्प आणला आणि वर्षभर घटनाची एकच गर्दी करून टाकली होती.

या त्याच्या मोहिनीपुढे सगळे विरोधक कसे स्तिमित झालेले होते. मुळात त्याची दहा दिशाना दहा तोडे, त्यात सत्तारूढ पक्षाशी मुकाबला करावा, वाद निर्माण करावा, लोकाचे लक्ष खेचावे असा एकही विषय त्यांना मिळत नव्हता. ते ज्याची ज्याची म्हणून ओरड करीत ते राजीवजी करून टाकायचे; त्यांचा चर्चेचा, ओरडीचा मार्गच खुटायचा.

नाही म्हणायला काही घटना गेल्या वर्षीच्या अखेरीस घडल्या. वास्तविक पाहता त्याविरुद्ध आवाज उठविणे या विरोधकाना सहज शक्य होते; पण ते विषय असे होते की तेथे मतपेट्याशी सबंध होता. काहीचा तत्त्वाचा सबध होता नि त्यामुळे सगळे रानच यामुळे पेटविता येईल याची शाश्वती त्याना त्या विषयात वाटत नव्हती.

असे दोन–चार विषय उदाहरणादाखल सहज देता येतील. सर्वात अलिकडचे उदाहरण म्हणजे शाहबानो प्रकरण. वास्तविक सरकारने स्वीकारलेल्या पळपुटेपणाच्या धोरणावर सगळे विरोधक एकत्र येऊ शकले असते पण अल्पसंख्याकांची गठ्ठा मते कोण दुर्लक्षिणार ? मग विरोधकापैकी एखाददुसरा पक्ष त्याबाबत ओरड करायचा. पण एकत्र उठाव होतच नव्हता खुद्द मुस्लिम पुरोगामी लोकानीही त्याबाबत आवाज उठविला; माजी सरन्यायाधीश चद्रचूड यानीही वारवार सागितले तरी विरोधकाना काही सूर गवसला नाही शेवटी सरकारने पळपुटेपणा दाखवित मुस्लिम घटस्फोटित महिला सरक्षण विधेयक ससदेत माडले. त्यावर एका इं कॉं. मत्र्यानेच राजिनामाही सादर केला, पण विरोधकाना हा विषय उचलता आला नव्हता. ते पाळीपाळीने गप्प बसले होते.

पजाब व आसाम करार व त्यांची प्रत्यक्ष अमलबजावणी याबाबतही सरकार अपयशी ठरले विशेषत. पंजाबबाबत तर हे अपयश २६ जानेवारीला पूर्णतः स्पष्ट झाले. पण हाही विषय विरोधकानी एकत्रपणे लावून धरला नाही. त्यामुळे सरकार, जे वेगाने कार्य करते ते पुढे पाठ मागे सपाट करीत चालले हे दाखवून देणे शक्य होते. पण हा विषय मिळूनही विरोधकांची बाधणी होत नव्हती. त्याचा जणू तेजोभगच झाला होता.

पण म्हणतात ना विनाश काले... वगैरे तशी गत झाली विरोधक स्वत हून काही करत नव्हते नि सधी मात्र वारवार येत होती. राजीवजीच्या कारकिर्दीची उतरती कळा स्पष्टच व्हायची होती नि विरोधकाना आणखी एक सधी मिळायचीच होती. आणि ती मिळाली देखील !

अर्थसकल्प जवळ येऊन ठेपलेला. अगदी जेमतेम महिनाही उरलेला नव्हता नि तशात राजीव सरकारला दुर्बुद्धी सुचली नि त्यांनी किमतवाढ जाहीर केली आणि विरोधकाना चागलीच संधी मिळाली.

या संधीचा लाभ उठविण्याचं विरोधकानी ठरविल आणि कोणीही या सधीचा लाभ उठविलाच असता. रासायनिक खते, पेट्रोल, डिझेल, रॉकेल, अन्नधान्य याच्या किमतीत सरकारने वाढ केली या किमतवाढीची झळ देशातील सामान्यापासून श्रीमतापर्यंत सगळ्यानाच पोहोचली त्यामुळे एका क्षणात सर्वांपर्यंत पोहोचता येईल असा विषय विरोधकांना सापडला.

## दिल्लीतले मोर्चे

झाल, विरोधकानी धडाधड कार्यक्रम जाहीर केले. सर्वात प्रथम दिल्लीत महागाई विरोधी मोर्चे निघाले. या मोर्च्यात एक उत्साह होता. विरोधी पक्षनेत्यानी या विषयावर भाष्य केले. जनसामान्यही खवळून उठले. त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. सरकार एकदम गांगरले आजपर्यंत निश्चयी, करारी वाटलेल्या सरकारने गडबडून जाऊन किमतवाढीचे योग्य समर्थन करण्याऐवजी ही किमतवाढ थोडी कमी केली. त्यामुळे तर

विरोधक अधिकच सरसावले. हा विषय खरो-खरच प्रभावी आहे याची त्यांना जाणीव झाली, खात्री पटली.

लगेच सर्व विरोधी पक्षांची बठक झडली. खा. मधु दडवते सारख्यानी या किंमतवाढी-बाबतचा विषय कसा हाताळायचा याबाबत 'टिपण' तयार केले. त्यावरून ठराव केले गेले, आणि महागाई विरोधी मोहीम उघड-ण्यात आली या किंमतवाढीमुळे जनसामा-न्याना जशी झळ पोहोचत होती तशीच झळ वेगळ्या अर्थाने राज्याना पोहोचणार होती. केंद्राने या वस्तूंच्या करात वाढ केली असती तर राज्यांना ४० टक्के भाग मिळाला असता. **पण प्रत्यक्ष किंमत वाढीने राज्यांना 'अंगठा' दाखविण्यात आला होता.** यामुळे केंद्रातील विरोधकाना प्रथम राज्यातील विरोधी पक्ष सरकारानी व नंतर सर्व राज्यातील विरोधी पक्षानी मन पूर्वक पाठिंबा जाहीर केला.

वास्तविक अनेक तज्ज्ञाचे मत होते की, किंमतवाढ ही सध्या अटळ होती. कारण भारतातले अर्थकारण सबसिडीमुळे बरेच धोक्यात आल्याचे त्याचे म्हणणे होते व हेच म्हणणे राजीव गाधीनी या किंमतवाढीच्या आधी माडले होते पण ही किंमतवाढ केव्हा करायची हा निर्णय मात्र त्याचा व त्याच्या सहकाऱ्याचा चुकला त्यांनी अर्थसकल्प तोडा-वर असताना भाववाढ केली. गेली काही वर्षे हा प्रघात चालू आहे. त्यामुळे यावेळी जणू विरोधक याच प्रकाराची वाट पहात होते. राजीव सरकारने ती चूक केलीच नि विरो-धकानी रान उठवायला सुरुवात केली.

इकडे सांगली मतदार सघात इंदिरा कांग्रेसचा बालेकिल्ला पडला. विरोधी जन-ताचा उमेदवार निवडून आला यावेळी वसंतराव दादासारख्या मुत्सद्याने 'ही हार या किंमतवाढीने झाली' असे जाहीर केले. यामुळे तर विरोधी नेत्याच्या मोहिमेला अधिक बळकटी आली. कारण एक प्रकारे ही किंमतवाढ अनिष्ट आहे हे इकडे नेतेच म्हणू लागले. ही त्याच्यादृष्टीने फार मह-त्वाची बाब होती किंमतवाढीनतर इंदिरा कांग्रेस मंत्रीमडळाची जी बैठक झाली तिच्या तही या किंमतवाढीबाबत तक्रार नोदविण्यात आली. त्यामुळेच वर म्हटल्याप्रमाणे या किंमती पुन्हा घटविल्या गेल्या

पण आता विरोधकाना विषय सापडला होता. प्रथम १० पावलं किंमतवाढ करून दोन पावल मागे आणण्याची रीत जुनी होती. त्यामुळे विरोधकाना सगळीच किंमतवाढ रद्द व्हायला हवी होती. त्यानी पुन्हा बैठकी घेतल्या. या बैठकीत पुढचा कार्यक्रम ठर-विण्यात आला.

त्यानुसार २० फेब्रुवारीला विरोधी पक्षानी प्रथम दिल्लीत निदर्शने केली या निदर्शनाना कधी नव्हे एवढा प्रतिसाद मिळाला. १०८ खासदारासह जवळजवळ १० हजार कार्य-कर्त्यांना अटक करण्यात झाली.

नेहमीच्या प्रथेला अनुसरून अर्थसकल्पिय अधिवेशन सुरू होण्यापूर्वी आदल्या दिवशी पंतप्रधान सर्वपक्षीय बैठक घेत असतात. यावेळीही ती झाली; पण या बैठकीला विरो-धक उपस्थित नव्हते. त्यानी किमतवाढीच्या निषेधार्थ बैठकीवर बहिष्कार टाकला होता. आणि या बैठकीत सरकारने म्हणजेच राजीव गाधी यानी भाववाढीचे समर्थन केले देशाच्या दीर्घकालीन हिताच्यादृष्टीने ही भाववाढ करण्यात आल्याचे यात स्पष्ट करण्यात आले.

२० फेब्रुवारीला अधिवेशन सुरू झाले. विरोधकाचे एक शिष्टमडळ १९ तारखेलाच राष्ट्रपतीना भेटले. त्यानी एक निवेदन सादर केले आणि ससदेच्या सयुक्त बैठकीत होणाऱ्या राष्ट्रपतीच्या अभिभाषणावर त्यानी बहि-ष्कार टाकण्याचे ठरविले. हेच त्यानी प्रत्य-क्षातही आणले.

## वातावरण निर्मिती

अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी दोन्ही सभागृहातील विरोधी प्रतिनिधीनी ससद कामकाजावर बहिष्कार टाकला. थोडक्यात काय की, विरोधकानी हळूहळू वातावरण तापवित नेले. सरकारपक्ष विचित्र धोरणानी हे वातावरण तापविण्यास मदत करीत होता. टिव्हीवर त्याच सुमारास ठरलेली जनवाणी रद्द करून विश्वनाथ प्रतापसिंग याना पाचा-रण करण्यात आले यावेळी श्रोत्यानी ओरड केली. व्ही. पो. सिगानी भाववाढीचे समर्थन केले. यामुळे भाववाढ हा विषय सारखा जनतेपुढे राहिला.

फार दिवसांनतर समान भूमिकेवर आलेल्या विरोधकानी भाववाढीबाबत या-पुढची कृती जाहीर केली. २६ फेब्रुवारीला रेल्वे अर्थसकल्पाच्या दिवशी, भारत बदचा पुकारा त्यानी केला. आणि पुन्हा एकदा देशाचे लक्ष वेधले. सरकारतर्फे हा बंद चुकीचा असल्याचे सागण्यात आले. यामुळे उत्पादनावर परिणाम होतो ही ओरड केली.

दरम्यान अर्थसकल्पपूर्व आर्थिक आढावा ससदेला सादर करण्यात आला. त्यात ७ व्या पचवार्षिक योजनेच्या पहिल्या आर्थिक वर्षात भारताने केलेल्या प्रगतीचे गुलाबी चित्र रंग-विण्याचा यत्न झाला. प्रत्यक्षात भाववाढ ५.८ टक्क्याने झाली होती, आयात-निर्यात तुटीबाबत गभीर इशारा देण्यात आला होता. शेती उत्पादन गेल्या 'बपर क्रॉप'च्या तुल-नेत खूपच कमी होणार होते. यामुळे हे गुलाबी चित्र प्रत्यक्षात धोक्याच्या लाल रगाने उठून दिसत होते

अखेरीस १६ फेब्रुवारी उजाडला भारत बदचा दिवस उजाडला सरकारने ठिक-ठिकाणी खबरदारी घेतलेली होती पण या बदला जनतेचा उत्स्फूर्त पाठिंबा लाभ-ल्याने देशात जवळजवळ सगळ्या भागात सगळे व्यवहार जणू थडावले. काही ठिकाणी बसगाड्या चालू होत्या. पण त्यात प्रवासी नव्हते. काही ठिकाणी 'बेस्ट' सारख्या गाड्या बद होत्या. सपूर्ण देशात हा बद अगदी किरकोळ प्रकार वगळता अत्यत शात-तेत पार पडला. आणि यामुळेच या बदला एक वेगळे स्वरूप प्राप्त झाले.

विरोधी पक्षानी पुकारलेला हा बद शात-तेत पार पडल्याने विरोधी नेत्याची प्रभा उजळली देशातील लोकशाही प्रतिमाही पुन्हा एकदा गर्वमान झाली. भाववाढीचा निषेधही झाला नि कोठे हिंसाचारही नाही. यामुळे एक निरोगी आदोलन पार पडले.

पण हे आदोलन स्व. इंदिराजीच्या काळात असेच पार पडले असते का? त्या बाई असत्या तर त्यानी व त्याच्या राज्यातील वजिरानी हा बद उडवण्याचाच प्रयत्न केला असता पण राजीव सरकारने असे धोरण स्वीकारून आपली बाजू आणखी दुबळी करून घेतली नाही. 'बद' हे आदो-लन आहे हे त्यानीही मान्य केलेले दिसले ते दडवण्याचा प्रयत्न न करता त्यातली शक्ती मात्र त्यानी आजमावली एवढे म्हणता येते.

तशात रेल्वे अर्थसकल्प ससदेत आला.

विरोधक त्याबाबत टपलेलेच होते. पण यावेळी मात्र विशेष सधी मिळाली नाही. सरकारने भीतीने म्हणा, किंवा या 'बद'ला योग्य उत्तर द्यायचे म्हणून म्हणा, पण रेल्वे भाड्यात अपेक्षित असलेली भाडेवाढ केली नाही. त्यानतर सरकारनेही बदनतर एक प्यादे पुढे सरकविले.

बाकी काही असो. या महागाईमुळे, भाववाढीमुळे विरोधक एकत्र, एका व्यासपीठावर आले त्यानी एकत्र आदोलन उभे केले. त्याच्या हलाखीच्या अवस्थेत थोडीशी 'जान' आली, त्यात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. राजीव सरकारही चुका करते, मोठ्या चुका करते याची जाणीव झाली, हे या निमित्ताने स्पष्ट झाले. हेही काही कमी नाही. मात्र यानतर विरोधकानी लगेच थड होता कामा नये. कारण हा प्रवास पाच वर्षांचा आहे छोट्या मोठ्या लढाया कोण जिंकतो, कोण हरतो याला महत्त्व नाही, शेवटची लढाई व एकूण युद्ध कोण जिंकतो याला महत्त्व असते याचे भान ठेवून त्यानी आगेकूच कायम ठेवली पाहिजे. जी आगेकूच तशी पजाब, आसाम, कर्नाटक, आध्र आता महाराष्ट्र या राज्यात त्यांनी यापूर्वीच सुरू केली आहे. विरोधक बलिष्ठ झाले, त्यानी लोकशाही मूल्ये जपली तरच शेवटी ही लोकशाही मजबूत होणार आहे नाही तर झटपट बदल करण्यास निघालेले हे तरुण सरकार सामान्य जनतेचे हाल पुसणार नाही हे त्यानी पक्के ध्यानात ठेवले पाहिजे.

—ए. पी.

## पंजाब

# पुन्हा एकदा ऑपरेशन ब्लू स्टार पूर्वीची परिस्थिती

अभय गोखले

पंजाबमध्ये ऑपरेशन ब्लू स्टारपूर्वी जी परिस्थिती होती ती हळूहळू पुर्वस्त होत आहे. याचा दोष एकट्या बर्नाला सरकारला देता येणार नाही. कारण राजीव गाधी व लोंगोवाल याच्यात मागे पजाब समस्येबाबत जो करार झाला, तो चुकीच्या पायावर आधारलेला होता. करारातील प्रत्येक समस्या ही निरनिराळ्या आयोगाकडे सोपवण्यात आली व कोणत्याही गोष्टीवर त्यावेळेस पक्का निर्णय घेण्यात आला नाही. त्या वेळेस घोषित केलेल्या निरनिराळ्या आयोगाच्या कार्यकक्षा निटपणे निश्चित न केल्याने काय गफलत होणार आहे याची पुसटशी कल्पना लोंगोवाल व त्याचे सहकारी यानाही आली असेल परंतु परिस्थितीच्या रेट्याने व भिंद्रनवाले आणि त्याचे सहकारी आपले नेतृत्व (अकालीमधील) अडगळीत फेकून देतील या भीतीने लोंगोवाल व त्याचे सहकारी या करारावर सही करण्यास तयार झाले त्यातही सातही सत्ताधारी पक्षाने आपले दात दाखवले व माजी मुख्यमत्री प्रकाशसिंग बादल याना चर्चेपासून दूर ठेवले याचे दुष्परिणाम आता बर्नाला व त्याचे सहकारी याना भोगावे लागत आहेत. प्रथम करारापासून दूर ठेवण्याने व नतर मुख्यमंत्रीपद किंवा उपमुख्यमत्रीपद न मिळाल्याने चिडलेले बादल आता बर्नाला यांच्याशी कोणत्याही प्रकारचे सहकार्य तर करत नाहीतच परतु आपल्या पक्षविरोधी कारवायानी बर्नाला सरकारला अडचणीत आणत आहेत. बादल याचे बरेचसे सहकारी सयुक्त अकालीदलात आहेत अकालीमधील बादल यांना मिळणारा पाठिंबा वधितल्यास कराराच्या वेळेस त्याना विश्वासात घेतले असते तर त्याचा बराच फायदा झाला असता अजूनही त्याना चुचकारून त्याचा उपयोग करून घेता येईल.

राजीव—लोंगोवाल करारानतर ज्या निवडणुका घेण्यात आल्या त्यामध्ये अकाली दलाचा विजय होऊन बर्नाला सरकार सत्तेवर आले. (अकाली दलाला विजयी करण्यात कॉं. (इंदिराचा) मोठा हात होता ही गोष्ट नाकरण्यात काही अर्थ नाही. या बाबतीत राजीव गाधी याचे दोन हेतू होते. एक म्हणजे अकाली दल सत्तेवर आल्याने आपल्या शीख बाधवाच्या भावना काबूत ठेऊन त्यांना शात करणे कॉंग्रेस (इं.) पेक्षा अकालीदलास सोपे जाणार होते. शिवाय पजाबचा हा प्रश्न केन्द्राची डोकेदुखी होऊ नये, या हेतूने अकालीदलावर तो प्रश्न सोपवून ते बाजूला होऊ पहात होते) परतु सध्याच्या घटनावरून या दोन्हीही गोष्टी साध्य झालेल्या दिसत नाहीत. लोंगोवाल यांची हत्या हा या कराराला लागलेला सर्वात मोठा धक्का समजायला हवा लोंगोवाल याचे व्यक्तिमत्त्व व लोकप्रियता बर्नाला जवळ नाही. सर्वांना बरोबर घेऊन जाण्याची लोंगोवाल याची हातोटीही बर्नालाजवळ नाही. सध्याच्या परिस्थितीत लोंगोवाल याचा मोठा उपयोग पजाबला व पर्यायाने भारताला झाला असता लोंगोवाल आता ह्यात असते तर पजाबमध्ये परिस्थिती इतकी चिघळली नसती

पजाबमध्ये आता अतिरेक्यानी पुन्हा धुमाकूळ घातला असून रोजच्या रोज कित्येक निरपराध लोकाचे बळी जात आहेत. निरनिराळ्या गुन्ह्यांसबधित तुरुगात असलेल्या अखिल भारतीय शीख विद्यार्थी सघटनेच्या बऱ्याच कार्यकर्त्यांना बर्नाला सरकारने उदारपणे सोडून दिल्याने त्यानी धुमाकूळ घातला आहे. या बाबतीत बर्नाला सरकारने एवढे उदार धोरण अवलबावयास नको होते. निदान केन्द्राचा सबुरीचा सल्ला मानावयास हवा होता या गुन्हेगाराना सोडून देण्यामागे बहुसख्य शिखाना खुष करण्याचा इरादा होता तो पण सफल झाला नाही. आणि आता त्याना मोकळे रान मिळाले

आहे. या अतिरेक्याच्या बाबतीत फाजील मवाळ धोरण अवलंबिल्याने आता बर्नाला सरकारने त्यांच्यापुढे अक्षरशः हात टेकले आहेत इतके दिवस हिंदूंची हत्या करणारे हे अतिरेकी आता उदारमतवादी शिखांची हत्या करत आहेत. त्यातूनच हिंदूंच्या हत्येची प्रतिक्रिया म्हणून शिवसेनेसारख्या हिंदूंच्या संघटना प्रबळ होत असून त्या अखिल भारतीय शीख विद्यार्थी संघटनेप्रमाणे बर्नाला सरकारची डोकेदुखी होऊन बसल्या आहेत

अखिल भारतीय शीख विद्यार्थी संघटना व दमदमी टाकसाळच्या मुठभर लोकांनी बर्नाला व त्यांच्या सहकाऱ्यांचा लेचेपणा ओळखला व एक दिवस अकाल तख्ताचा कब्जा घेऊन दोन गुरुद्वारेही आपल्या नियंत्रणाखाली आणली. अर्थात अकाल तख्ताचा कब्जा घेणे त्यांना शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक कमिटीचे अध्यक्ष तोहरा यांच्या धरसोड वृत्तीमुळे शक्य झाले. तोहरा व त्यांचे साथीदार फर्म राहिले असते तर शीख विद्यार्थी संघटना व दमदमी टाकसाळच्या मुठभर गुंडांना सुवर्णमंदिरातील तख्ताचा ताबा घेता आला नसता. या मुठभर अतिरेक्यांनी मग सुवर्णमंदिराच्या पाच प्रमुख धर्मगुरूंना बरखास्त केले, तोहरा अध्यक्ष असलेली शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक समिती बरखास्त केली, राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग व कृषीमंत्री बुटासिंग यांना शीखपंथातून बहिष्कृत केले आणि अकाल तख्तावर खलीस्तानचा झेंडा फडकवला. शीख विद्यार्थी संघटनेच्या व दमदमी टाकसाळच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सरबत खालसामध्ये नुसती वरीलच कृती करण्यात आली नाही तर देशविरोधी भडक भाषणे करण्यात आली. या दोन्ही संघटनांच्या कृती समितीवर अनेक खुनी व दरोडेखोरांची नावे मोठ्या दिमाखाने झळकत आहेत.

## दमदमी टाकसाळ–बर्नाला

दमदमी टाकसाळचे भाई मोखमसिंग व शीख विद्यार्थी संघटनेचे हरीदरसिंग कहलोन हे अकाल तख्ताचा ताबा घेण्यातील नेते समजले जातात. या दोघांनी भिंद्रनवाले यांचे वडील जोगीदरसिंग यांना बाजूला ढकलले असून अतिरेक्यांचे पुढारीपण मिळवले आहे भिंद्रनवाले व शीख विद्यार्थी संघटनेचे नेते भाई अमरीकसिंग यांच्यात जे सहकार्य होते तेच आता भाई मोखमसिंग व हरीदरसिंग कहलोन यांच्यात दिसत आहे. संत भिंद्रनवाले हे पूर्वी दमदमी टाकसाळचे नेतृत्व करत होते व भाई मोखमसिंग त्यांच्या अगदी जवळचे समजले जात. भाई मोखमसिंग यांची अतिरेक्यातील लोकप्रियता व सरबत खालसातील त्यांचा रोल बघितल्यास ते हळूहळू भिंद्रनवाल्यांची जागा घेत आहेत अशी भीती वाटते. या दोघांनी युनायटेड अकाली दलाचे अध्यक्ष बाबा जोगिंदरसिंग, तळवंडी वगैरेंना मवाळ ठरवून त्यांना बाजूला सारले व शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक समिती व तोहरा यांच्या सामर्थ्याचा अंदाज घेत घेत अकाल तख्तावर कब्जा मिळवला या बाबतीत अतिरेक्यांचा धसका घेऊन भीतीने तेथून पळून जाणारा तोहरा व त्यांच्या साथिदारांचे हसेच झाले आहे. आता तर तोहरा यांनी शिरोमणी प्रबंधक समितीच्या अध्यक्षपदाचा राजिनामा बर्नाला जवळ दिला आहे. तो नेहमीप्रमाणे स्टंट आहे किंवा कसे ते नंतर समजेलच शिवाय तो स्वीकारला जातो किंवा नाही ते पहावे लागेल. हरीदरसिंग कहलोन हे शीख विद्यार्थी संघटनेचे नेते भिंद्रनवाल्यांच्या कारकिर्दित विद्यार्थी संघटनेचे उपाध्यक्ष होते. ऑपरेशन ब्लू स्टारच्या कारवाईनंतर शीख विद्यार्थी संघटनेचे जे मोजकेच पदाधिकारी मारले गेले नाहीत किंवा पकडले गेले नाहीत, त्यात कहलोन यांचा नंबर लागतो. त्यामुळेच शीख विद्यार्थी संघटनेवरील बंदी उठवल्यावर कहलोन हे संघटनेचे कन्व्हेनर बनले आज पंजाबात शीख विद्यार्थी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी जे खूनसत्र आरंभले आहे, त्या अतिरेकी गटाचे नेतृत्व कहलोन यांच्याकडे आहे आता या पुढे मोखमसिंग व कहलोन यांचे प्रस्थ बरेच वाढणार आहे मेजर जनरल नहीदरसिंग हे मागे मेजर जनरल शुबेगसिंग यांनी ऑपरेशन ब्लूस्टारच्या वेळेस सुवर्ण मंदिरात जी कामगिरी केली त्या कामगिरीवर आहेत दमदमी टाकसाळ व शीख विद्यार्थी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी अकाल तख्ताचा ताबा घेतल्यावर जे सरबत खालसा आयोजित करण्यात आले, त्यामध्ये मेजर जनरल नरीदरसिंग यांचा सहभाग मोठा होता या दोन्ही अतिरेकी गटांनी जो व्यूहरचना व मोर्चेबांधणी सुवर्णमंदिरात चालवली आहे, तिची सर्व आखणी करण्यात मेजर जनरल नरीदरसिंग यांचा मोठा वाटा आहे बर्नाला सरकारने तांबडतोब या अतिरेक्यांना सुवर्णमंदिर परिसरातून हाकलून लावले नाहीतर ऑपरेशन ब्लूस्टार पूर्वीची परिस्थिती झपाट्याने निर्माण होत आहे. अतिरेक्यांनी मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्रांची जमवाजमव केलेली असून, बर्नाला सरकारच्या बोटचेपेपणाचा फायदा ते उठवत आहेत. रोजच्या रोज खून व दरोडे घालून राजरोसपणे सुवर्णमंदिरात लपून बसणे अतिरेक्यांना शक्य होणार आहे या बाबतीत केंद्र सरकारला परिस्थितीच्या गांभिर्याची पुरेपूर कल्पना आली असली तरी अतिरेक्यांना हुसकावून लावण्याची जबाबदारी बर्नाला सरकारची असल्याने ते परिस्थितीकडे असहाय्यतेने पहात आहेत आणि बर्नाला सरकार तर सुवर्णमंदिरात पोलीस पाठवण्यास तयार नाही. जर पोलीस पाठवून मोठा संघर्ष उडाला तर शीख समाजाची सहानुभूती अतिरेक्यांना मिळून मोखमसिंग व कहलोन यांच्या दमदमी टाकसाळ व शीख विद्यार्थी संघटनेची बाजू मजबूत होईल व आपल्याला राज्य करणे अवघड होऊन बसेल, याची जाणीव बर्नाला सरकारला आहे जर अतिरेक्यांना हुसकावून लावले नाही तर ते आपली बाजू भक्कम करतील त्यांना गुन्हेगारी करणे सोपे जाईल व कायदा आणि सुव्यवस्था पार कोलमडून पुन्हा एकदा ऑपरेशन ब्लूस्टारसारखी कारवाई करण्यावाचून गत्यंतर उरणार नाही, अशा दुहेरी पेचात बर्नाला सरकार सापडले आहे पंजाबमधील रोजचे खूनसत्र पहाता ते आटोक्यात आणण्यासाठी लष्करी राजवट योग्य ठरेल, असे उद्गार मागे मुख्यमंत्री बर्नाला यांनी काढले यावरून त्यांची मनःस्थिती समजते.

## गुरुद्वारा समितीचा विजय

दमदमी टाकसाळ व अखिल भारतीय शीख विद्यार्थी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी अकाल तख्तावर ताबा मिळवून ते पाडवून पुन्हा कारसेवा सुरू केल्यावर त्या पाडापाडीत बरेच सोने हस्तगत केले आहे. त्याचा उपयोग त्यांना मोठ्या प्रमाणावर शस्त्रास्त्रे विकत घेण्यास होऊ शकेल. या सोन्याचा हिशोब शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक समितीने त्यांच्याकडे मागितला आहे; परंतु ते प्रबंधक समितीला या

बाबतीत घूप घालणार नाहीत हे सांगण्यासाठी एखाद्या ज्योतिषाची आवश्यकता नाही. दमदमी टाकसाळ व शीख विद्यार्थी संघटनेच्या सरबत खालसाला आव्हान देण्यासाठी अकाली दल व शिरोमणी गुरुद्वाराप्रबंधक समितीच्या कार्यकर्त्यांनी प्रथम आपले सरबत खालसा अकाली तख्त येथेच आयोजित करण्याचा विचार केला होता. मात्र नंतर संभाव्य संघर्षाला घाबरून त्यांनी सरबत खालसाचे आयोजन आनंदपूरसाहेब येथील केशगढतख्त येथे करण्याचे ठरवले. एक प्रकारे हा दमदमी टाकसाळ व शीख विद्यार्थी संघटना यांचा विजयच मानला पाहिजे. अशा प्रकारे अकाली दल व शिरोमणी गुरुद्वाराप्रबंधक समितीचे लोक आधार घेऊ लागले, तर अतिरेक्यांचे बरेच फावणार आहे. बर्नाला हे या बाबतीत कडक धोरण न अवलंबिण्यास दोन कारणे आहेत. एक तर बर्नाला, तोहरा व बादल या अकाली नेत्यांमध्ये या बाबतीत एकमत नाही. शिवाय सुवर्णमंदिरातील कोणत्याही प्रकारचा संघर्ष त्यांना नको आहे.

अकाली दल व शिरोमणी गुरुद्वाराप्रबंधक समितीने आनंदपूरसाहेब येथील केशगढतख्त येथे सरबत खालसाचे आयोजन केले. त्याला बऱ्याच मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळाल्याचे दिसून आले. मात्र यातील बहुतेक कार्यकर्ते हे उदारमतवादी व संघर्ष नको, असणारे असल्याने अकाल तख्तावर कब्जा करणाऱ्या अतिरेक्यांचा निषेध करण्यातून फारसे फलीत या सरबत खालसातून निघाले नाही. या अतिरेक्यांच्या तावडीतून अकालतख्त मुक्त करण्यासाठी शहीदी जथे पाठवण्याचा निर्णय या सरबत खालसात घेण्यात आला; परंतु हे शहीदी जथे अतिरेक्यांच्या तावडीतून अकालतख्त मुक्त करतील असे सध्याच्या परिस्थितीवरून तरी वाटत नाही. अकाली दल व शिरोमणी गुरुद्वाराप्रबंधक समितीने सरबत खालसाचे ठिकाण बदलल्यावर केशगढतख्त येथील मेळाव्यास आपण हजर राहून या दोन्ही संघटनांच्या नेत्यांना जाब विचारू असे दमदमी टाकसाळवाल्यांनी घोषित केले होते; परंतु ते मेळाव्यास उपस्थित राहिले नाहीत. हा एकप्रकारे अकाली दल व शिरोमणी गुरुद्वाराप्रबंधक समितीच्या लोकांचा विजयच मानावयास हवा. मेळाव्याची संभाव्य मोठी उपस्थिती विचारात घेऊन दमदमी टाकसाळवाले मेळाव्याला हजर राहिले नसले तर त्यांच्या ह्या मनःस्थितीचा फायदा घेऊन अकालीदलाने आपल्या कार्यकर्त्यांना सुवर्णमंदिरात घुसवून तेथील अतिरेक्यांना तावडतोब बाहेर काढणे हितावह आहे. कारण या बाबतीत वेळ घालवल्यास अतिरेकी दिवसेंदिवस आपली बाजू भक्कम करतील व त्यांना हुसकवणे केवळ लष्करासच शक्य होईल.

## राष्ट्रपती राजवटीचा पर्याय

२६ जानेवारीला, करारात ठरल्याप्रमाणे चंदिगडचा ताबा पंजाबला न मिळाल्याने बर्नाला सरकारची बाजू कमकुवत झाली आहे. अबोहर व फाजिल्का या पंजाबातील हिंदी भाषिक प्रदेशाचे भवितव्य ठरवण्यासाठी ज्या मॅथ्यु आयोगाची नेमणूक करण्यात आली होती, त्या आयोगाने सलगतेच्या निकषावर आपली असमर्थता प्रगट केल्याने अबोहर व फाजिल्का हरयाणाला मिळणार नाहीत,हे निश्चित झाले आणि चंदिगडचे हस्तांतर लांबले. ज्या कंडुखेरा गावामुळे सलगतेला बाधा येत आहे, त्या भागाएवढा प्रदेश हरयाणाने पंजाबला देऊन हा प्रश्न सोडवता येईल; परंतु पंजाब त्याला मान्यता देणार नाही. हा प्रश्न २६ जानेवारीला सोडवण्यासाठी मॅथ्यु आयोगाने घाईघाईने या प्रदेशांचा (अबोहर व फाजिल्का) सर्व्हे केला; परंतु ते परिश्रम वाया गेले. त्याचप्रमाणे सतलज, यमुना यांना जोडणारा जो कालवा पंजाबमध्ये खोदण्यात येत आहे, त्याचा फायदा हरयाणाला मिळणार आहे. त्याची प्रगती फारच मंदगतीने होत असल्याने सर्व बाबतीत हरयाणाचा मोठा तोटा होणार आहे. अशा परिस्थितीत हरयाणावर अन्याय झाल्यास पंजाब व आसामप्रमाणे पुढील वर्षी होणाऱ्या निवडणुकीत कॉंग्रेस (इ) ला हरयाणातही सत्ता गमवावी लागेल, याची जाणीव कॉंग्रेस नेत्यांना आहे. त्यामुळेच हरयाणाच्या पदरात काहीतरी पडल्याशिवाय चंदिगडचे हस्तांतर पंजाबला करणे त्यांना जड जात आहे.

तेव्हा पंजाबमधील परिस्थिती ही अशी आहे. रोजच्यारोज खून पडत आहेत; परंतु खुनी पकडले जात नाहियेत. अतिरेकी स्कुटरवरून येऊन कोणाचा तरी मुडदा पाडतात हे रोजचेच चित्र बनले आहे. त्यांना हाताळण्यास पंजाब पोलीसदल असमर्थ आहे. कारण त्या पोलीसदलात काही गुन्हेगार आपली वर्णी लावून घेण्यात यशस्वी झाले आहेत. त्याचबरोबर पंजाब पोलीसदलातील काही जणांची सहानुभूती अतिरेक्यांना आहे, ही गोष्ट आता लपून राहिलेली नाही. त्यामुळेच अतिरेकी दिवसाढवळ्या आपल्या मर्जीप्रमाणे निरपराध माणसांचे खून पाडत आहेत व बिनधास्त दरोडे घालत आहेत. त्यांना अटकाव करण्यास बर्नाला सरकार अपयशी ठरले आहे. केंद्र सरकार सर्व परिस्थितीकडे असहाय्यपणे पहात आहे. या सर्व उपद्रवास कंटाळून बर्नाला सरकारने राजिनामा दिल्यास, राष्ट्रपती राजवट आणल्याशिवाय पर्याय उरणार नाही. आणि मग राजीव–लोंगोवाल करारास अर्थ उरणार नाही. कारण पंजाबमधील परिस्थिती पुन्हा पूर्ववत होत आहे

□


ग्रामीण भागात
डॉक्टर्स नेण्याचा प्रयत्न
भारतात प्रथम
डॉ. आयडांनी केला.
त्यांच्या त्यागमय
जीवनाची कहाणी.

**डॉ. आयडा स्कडर**

सौ. वीणा गवाणकर

बावीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे प्रेरणादायी
चरित्र.

**एक होता कार्व्हर**

सौ. वीणा गवाणकर

तीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

# विरोधकांनी जसा भाववाढीविरुद्ध एकत्रित आवाज उठवला तसाच आता पंजाबमधील दहशतवादाविरुद्ध उठवावा

'झाला, झाला पंजाब करार झाला पजाब प्रश्नावर तोडगा निघाला आता येथला दहशतवाद कायमचा थांबेल!' या घोषणा गेल्या ऑगस्टमध्ये हवेत विरतात न विरतात तोच सत लोगोवाल याचाच खून झाला नि घोषणा फुसकी होती, वाटल होत ते स्वप्न होतं याची जाणीव झाली.

त्यानतर पजाबमध्ये निवडणुका झाल्या. जनतेने निवडून आणलेले अकालीदलाचे सरकार सत्तेवर आले. सुरजितसिंग बर्नाला या सत्तेचे नेते झाले. वाटल आता पजाबात त्याना आपल वाटणारं सरकार आल, तेव्हा आता तरी हा दहशतवाद थाबेल. पण केंद्राची ही आशाही फोल ठरली दहशतवाद दुप्पट वेगाने सुरू झाला

तशात आता पजाब करार पाळण्याची वेळ येऊन ठेपलेली होती पण अशा वेळी किंवा यावेळेपर्यंत केंद्र सरकारला, म्हणजेच इंदिरा कॉंग्रेसला कळून चुकले होते की आपल्या हातून एकेक राज्य गळू लागले आहे नि इकडे हरियाणात हिंदी प्रदेशाबाबत आता ओरड सुरू झाली आहे. मुख्यमंत्री भजनलालानी कालवा पूर्ण कधी करणार ते पजाबने प्रथम स्पष्ट करावे, असे रोखठोक विचारले. एव्हाना विरोधी पक्षानी हा प्रश्न ससदेच्या दारापर्यंत नेला होता. लोकदल याबाबत आघाडीवर होता झाल. यामुळ हरियाणाबाबत पेच निर्माण झाला.

सरकार तरीही घोषणा करीतच होते. २६ जानेवारी १९८६ ला कोणत्याही परिस्थितीत चंदिगडचे हस्तातर होणारच. मॅथ्यू आयोग तिकडे हिंदी भाषिक प्रदेश ठरविण्यात असमर्थ ठरला. सयुक्त कालव्याबाबत पजाब मौन बाळगून होता. त्यामळ २६ जानेवारी आली नि गेली...! प्रश्न, करार तसाच भिजत पडला

यामुळे पजाबात राजकीय तेढ निर्माण झालीच होती. त्यात भर म्हणून पुन्हा एकदा तेथे हिंसाचाराने डोके वर काढले. शिखातील एक जहाल गट मर–सर करीत वर आला. सामान्य लोकाच्या भावनाशी खेळत वा भावनाना आवाहन करीत त्याना आपली सेना उभी केली नि 'भिंद्रानवालें'चा जणू पुनर्जन्म व्हावा या थाटात ही 'दमदमी टाकसाळ' उभा राहिली.

ब्ल्यू–स्टार ऑपरेशननतर बाबा सत सिग याच्या नेतृत्वाखाली शिखाच्याच एका गटाने 'कार सेवे'योगे अकाल तख्त पुन्हा एकदा बाधून काढले होते पण या 'दमदमी' गटाने शस्त्रास्त्राच्या जोरावर सरळ अकाल तख्ताच कबजा घेतला. स्वतःचाच एक सरबत खालसा मेळावा आयोजित केला आणि त्यात घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयात अकाल तख्तची पुन्हा बाधणी करण्याची घोषणा केली.

प्रश्न निर्माण झाला होता आणि चिघळतही होता. आधी ज्या शिखानी आपल्या श्रमानेच 'कार सेवेने' हे तख्त उभे केले ते शीख नव्हते का? जर होते आणि ते खरोखरीच होते तर मग हा पुन्हा खटाटोप कशासाठी? शिखाचे पावित्र्य फक्त या जहाल गटाजवळच आहे का? ती कार सेवा नव्हे तर 'सरकार सेवा' अशी बोब करण्याचे काही कारण हाते का? पण छे! ही धर्मसत्ता हाती असावी म्हणून मग या जहाल–मवाळ गटातील प्रत्येकजण येतो नि टिकली मारून जातो असा प्रकार झाला आहे.

बर हे शातपणे व्हाव का? अर्थात येथील इतिहासाला विचारले तर त्यातून नाही हेच उत्तर मिळते. पजाबात पुन्हा एकदा हिंसाचार सुरू झाला. अकाली दलाने व सत शिरोमणी प्रबधक समितीने याच वेळेस दमदमीचा सरबत खालसा मेळावा रद्द ठरविला, व शीखविरोधी ठरविला आणि १६ फेब्रुवारीला सुवर्णमंदीर परिसरातच सरबत खालसा घेण्याचे जाहीर केले वातावरणात चागलाच तणाव होता दमदमीनेता मोहकमसिंग व मुख्यमत्री व अकाली नेते सुरजितसिंग बर्नाला याच्यात बोलणी झाली पण त्यातून काही निष्पन्न झाले नाही. दोन्ही गटाचा शीख लोक आपल्याच पाठीशी असल्याचा दावा होता

## नवे उपाय

सरबत खालसा होणारच याची घोषणा मधूनमधून होतच होती टाकसाळचे म्हणणे 'अकाल तख्तचा प्रमुख हा सरबत खालसा होऊन त्यात नेमला गेला पाहिजे पण तसा तो नेमण्यात आला नाही त्यात भ्रष्टाचार होता. वैशाखी व दिवाळी असा दोन वेळा एस जी. पीसीचा हिशोब लोकासमार यायला हवा, तो आला नाही. तोहरा, लोगोवाल हे पळपुटे ठरले, खऱ्या गोळ्या आम्ही झेलल्या.'

तणाव वाढतच राहिला. अकाली दल, मुख्यमत्री बर्नाला, शिखाचे पाच ज्येष्ठ गुरू या सर्वांनाच सरबत खालसा शाततापूर्ण मार्गाने व्हावा असे वाटत होते; पण या तणावामुळे शेवटी सरबत खालसाचे ठिकाण बदलून आनदपूर साहेबाला नेण्यात आले.

दरम्यान हिंसाचाराला ऊत आलाच होता नाकोदर येथील गुरुद्वारात पवित्र गुरू ग्रथसाहेबाची काही पाने चुकाने जळाली होती आणि गहजब झाला. तेथे जातीय दगली सुरू झाल्या त्याचा फायदा इतके दिवस निमित्त न सापडलेल्या सयुक्त अकाली दलाच्या बाबा जोगिंदरसिगानी घेतला ते लगेच नाकोदरकडे धावले; अखिल भारतीय शीख विद्यार्थी महासघाचे नेतेही धावले पोलिसानी त्याना अडविले. सघर्ष झाला. चारजण मारले गेले. या सघटना व पोलीस यात परस्परावर आरोप करण्यात आले

इकडे सरबत खालसाचा दिवस जवळ येत होता. दहशतवादी दमलेले नव्हते याच प्रत्यतर मधून मधून येत होते गेल्या १५ दिवसात त्यानी १० जणाना ठार केले. अकाली दलाला अनुकूल असलेला एक विद्यार्थी नेता जतीदरसिग याचा यात पहिला क्रमाक लागला ओंकारसिग हे शिरोमणी प्रबधकचे सरचिटणीस सरबत खालसाशी चर्चा करीत होते. तेव्हाच

त्याच्या सतींदरपालसिंग या १७ वर्षाच्या कोवळ्या मुलाला ठार करण्यात आले. मोलोवाल जाहीद येथे प्रबंधक समितीच्या एका नेत्याला दुपारी दारावर टकटक करून उठवून ठार करण्यात आले. याच्याखेरीज हरी शाह हा इंदिरा कॉंग्रेसचा स्थानिक नेता तसेच फिरोजपूर येथे नक्षत्रसिंग व शेरसिंग यानाही ठार करण्यात आले

दहशतवाद बोकाळत होता. वाढत होता तशात सरबत खालसा मेळावा आनंदपूर साहेब येथे झाला तोही कडेकोट बंदोबस्तात पार पडला. शिखाचे पाच ज्येष्ठ गुरू एकत्र आले. हजारो शीख तेथे जमा झाले. अमृतसरचा 'दमदमी'चा सरबत खालसा त्यानी रद्द करून टाकला तो मेळावा व त्यातले ठराव त्यांनी रद्द करून टाकले. त्याना शीख विरोधी ठरविले. पण सपल, मेळावा सपला. ओरड सपली दमदमीचा आवाज मात्र बंद झाला नाहीच.

दहशतवाद बोकाळत होता. मुख्यमंत्री बर्नाला हताश झाल्यासारखे दिसू लागले. वेळ पडलीच तर लष्कर आणू म्हणू लागले. पण या दमाला भीक न घालता दहशतवादी आगेकूच करीतच आहेत. मधून मधून बँका-बिँका लुटतच आहेत. अगदी परवा परवा त्यानी रेल्वे पोलिसाचे शस्त्रागारच लुटले आणि मग बर्नालांनी अती झाल म्हणत निमलष्करी दले तैनात केली. विशेष गडबड असणाऱ्या भागात दिवसाला दोन वेळा भेट द्यायला त्याना सागण्यात आले.

थोडक्यात नवा हिंसाचार, नवे उपाय आहेत. पण मनाला वाटत हे काही खरे उपाय नव्हेत. आता कठोरपणाची परिसीमा होणे आवश्यक आहे, दहशतवादाविरोधीच्या उपायात बदल होणे आवश्यक आहे बदल कशाप्रकारचे असावेत हे मात्र दहशतवादात कोणते बदल झालेले आहेत त्याचा बारकाईने अभ्यास करूनच ठरवावे लागतील !

दहशतवादी लोकानी गटानी त्याचे पवित्रे बदललेले आहेत हे उघड आहे. दहशतवादात सातत्य ठेवायचे, राज्यात व देशात प्रचंड गोंधळ माजवायचा हे त्याचे धोरण आहे. तशात हा गोंधळ एका अर्थानं शिस्तबद्ध रीतीने आहे आणि तरीही या दहशतवादाच्या नेतृत्वाला स्वत ची अशी ओळख राहिलेली नाही. पूर्वी म्हणजे १९८४ मध्ये दहशतवाद भिंद्रनवालेंच्या रूपाने खदखदत होता. त्यामुळं दहशतवादाची किमान नाडी तरी ठाऊक होती. ब्ल्यू स्टार ऑपरेशनयोगे प्रत्यक्ष हल्ला करता येण शक्य होते

पण आता सगळा गनिमीकावा चालू आहे त्यात एक शिस्त आहे. ही शिस्त आली कोठून याला नुकतेच उत्तरही सापडले शीख युवकाना, पोलीस ज्याच्या शोधात आहेत अशा घाबरलेल्या युवकाना हाताशी धरले जाते. ही दमदमा त्याना आसरा देते. पोलिसाचा जाच होईल या भीतीने हे तरुणही दमदमोकडे जात आहेत. याखेरीज आणखीही एक पर्याय ही भडक माथी स्वीकारत आहेत.

## पाकिस्तान–अमेरिका

आपला शेजारी 'मित्र' पाकिस्तान या भडक माथ्याना आपल्याकडे नेतो आहे. ही पद्धतही अगदी योजनापूर्वक राबविली जाते. सीमेलगतच्या काही भागाजवळ, पण पाकिस्तान हद्दीत काही केंद्रे उभारण्यात आलेली आहेत. तेथे या युवकाना नेले जाते. तेथून त्याची विभागणी करून पाकमधल्या वेगवेगळ्या कारावासात रवानगी केली जाते. ही रवानगी अर्थातच शिक्षेसाठी नसते तर शिक्षण-प्रशिक्षणासाठी असते. अशाना वेगवेगळ्या कारावासात नेऊन तेथे हे प्रशिक्षण दिले जाते. तेथे या भडक माथ्यातून दहशतवादी तयार केला जातो वाटेल तो घोळ घालण्याची 'पात्रता' त्याच्या अंगी आली की मग त्याला पुन्हा सीमेलगतच्या केंद्रात आणले जाते व योग्य संधी मिळताच त्याला भारताच्या शांत वातावरणात सोडले जाते. उद्देश अर्थातच गोंधळ वाढविणे, माजविणे हाच असतो

ही सर्व माहिती पकडलेल्या एका संशयीत दशहतवाद्यानेच सांगितली. जो स्वत. याच ठिकाणी शिक्षण घेऊन परतला होता. तर मग असे दहशतवादी लोक पंजाबात (तूर्त पंजाबातच) पसरतात मन मानेल तसा संधी मिळेल तसा हिंसाचार करतात, लूटालूट करतात, गोंधळ माजवतात. यामुळेच दहशतवादाला तोंड उरलेले नाही. अशी गाऱ्हाणी काही सरकारी मंडळीच मांडतात.

यावर काही उपाय नाही का? उपाय अर्थात आहे, असणारच ! एक तर सरळ मार्गाने पाकिस्तानला अधिक जोरकस स्वरूपात तंबी देणे आवश्यक आहे. याचे आणखी एक कारण असे की, इस्लामाबादच्याच 'जंग' या वृत्तपत्राने पाकिस्तानने अफगाणच्या नावाखाली २१ पैकी १८ डिव्हिजन सैन्य भारतालगतच्या सीमेवर उभे केलेले आहे त्याचाच परिणाम अमेरिका त्यांना सैन्य मागे घेण्याची तंबी देत आहे या सबंधावर भारताने लगेच भर द्यायला पाहिजे. अमेरिका पाक संबधात मुळात साधर्म्य काही नाही. पण आर्थिक सबंधापायीच ही अमेरिका इतके दिवस काही बोलत नाही. पण सध्या लोकशाहीने आवाज उठवला तर अमेरिकेचेही काही चालत नाही, ही वस्तुस्थिती सिद्ध झाली आहे फिलोपाईन्समध्ये फर्डिनाड मार्कोसला अमेरिकेने पाठिंबा दिला होता हा २० वर्षे सत्ता उपभोगलेला अध्यक्ष खरं तर निवडणुकीत चारी मुंड्या चीत झाला होता, पण अमेरिका त्याला पदच्युत हो म्हणून सांगत नव्हती. नवी महिला अध्यक्षा ॲक्विनो, अमेरिकेला विनवण्या करीत होती की, मी जिंकलेय हस्तक्षेप करा. सत्तांतर घडवून आणा. पण धोरणी अमेरिका चिडीचूप होती. पण शेवटी ॲक्विनोने न्यायालयाच्या सहाय्याने शपथविधी घडवून आणला आणि मग मार्कोसला आपण उथळ पाण्यात आल्याचे लक्षात आले तेथुन त्याने विणवण्या केल्या. मला पळू द्या म्हटले नि त्यानंतर त्याला अमेरिकेने पदच्यूत हो म्हटले. वा ! काय पण लोकशाहीची बूज

तर थोडक्यात काय की पाकचा जोर अमेरिकेच्या जोरावर आहे पण पाकमध्येच लोकशाही तत्त्व ज्वलंत केले, तर ती लोकशाही शक्ती मार्कोसप्रमाणे या लष्करी शाहीला (नावालाच लोकशाही) फेकून देईल नि अमेरिकेला हात चोळत बसावे लागेल. या भांडवलशाही देशाला सगळीकडे युद्ध अनागोंदी हवी आहे कारण त्याशिवाय ती स्वत: जगू शकत नाही. आणि हीच अमेरिका पाकवर येत्या भविष्यकाळात दबाव आणून भारत सीमेवरील पाक सैन्य कमी करण्यासाठी पाकला बळावेल, असे वृत्त इस्लामाबादच्याच वृत्तपत्रानी म्हटले आहे. याचा लाभ भारताने उठविला पाहिजे. हा

दबाव कसा आणला जाईल हे पाहिले पाहिजे. पाकची आर्थिक स्थिती सध्या अत्यंत नाजूक आहे याचे भान ठेवून, मर्मावर बोट ठेवून पहायला काय हरकत आहे ?

### प्रश्न आपलाही

दुसरा उपाय म्हणजे आता या दहशतवादाविरुद्ध आघाडी तयार करणे आवश्यक आहे. दहशतवादी दिवसाढवळ्या चारचौघात येतात, बाँब स्फोट करतात, गोळ्या घालतात, लगेच निघून जातात. यात ते निरपराधांचा बळी घेतच आहेत मग अशा वेळी इतरांनी वध्याची भूमिका घेण्यात आजचे मरण उद्यावर ढकलण्यासारखे आहे पेक्षा आजच एक होऊन उठणे आवश्यक आहे. काय आणखी चार-चौघाना मरावे लागेल. पण उद्या मरणारे वाचतील आणि सरकारला कधीही पकडता न येणारे दहशतवादी लोक पकडले जातील

पण पंजाबात हे जमावे कसे ? हा एक प्रश्न आहेच. याचे कारण दहशतवादी सामान्याच्या भावनांशी खेळत आहेत, त्याना ललकारत आहेत. त्यांच्या मनात प्रथम या दहशतवादाविरुद्ध चीड निर्माण करणे आवश्यक आहे ही माणसे सगळी स्थैर्याच्या विरुद्ध आहेत, माथेफिरू आहेत हे पटविणे आवश्यक आहे तेव्हाच सामान्य माणूस त्याविरुद्ध उभा राहील

सरकार काय करते हे सध्या दिसते आहेच. ते गांगरलेले आहे तेव्हा इतर राज्यातील लोकांनीही हातावर हात ठेवून आपल्या राज्यात तर ते नाही म्हणून बसून भागणार नाही. हा देश आपला आहे, हे ठासून सांगण्याची वेळ आली आहे. इतर राज्यातल्या लोकांनी याकडे दुर्लक्ष केले तर हा प्रश्न उद्या त्यांच्या दारापर्यंत यायला वेळ लागणार नाही त्यामुळेच विरोधकांनी जसा भाववाढीविरुद्ध एकत्रितरित्या आवाज उठविला, तसाच आवाज पंजाब घटनांबाबत उठविणे आवश्यक आहे एकदा चारही दिशांतून हा आवाज उठला म्हणजे हा दहशतवाद काय चीज आहे ? तो होत्याचा नव्हता करणे ही शक्य गोष्ट आहे.

पंजाबातला हा दहशतवाद हा आता खूप झाला. देशातल्या प्रत्येकाने तो आता आपला प्रश्न मानला पाहिजे लोकशाही टिकवायची असेल, भावी पिढीला स्वातंत्र्यातच राहू द्यायची इच्छा असेल, तर हा दहशतवाद आताच 'ठेचला ' पाहिजे यासाठी मी कोणत्या पक्षाचा, हे महत्त्वाचे नाही. मी भारताचा नागरीक नि भारत माझा देश हे गरजणे आवश्यक आहे. मात्र ही गर्जना रोज शाळेत म्हणणाऱ्या प्रतिज्ञेप्रमाणे केवळ शाब्दिक नको. त्याला आता कृतीची जोड हवी !

—अनिल शिंदे

---

# विचार, भावना चित्रित करणारी किर्लिअन फोटोग्राफी

प्रा. व. वि. अकोलकर

---


भक्तजनांनी काढलेल्या साधुसंताच्या व सद्‌गुरूंच्या चित्रामध्ये त्यांचे शरीर, विशेषतः मस्तक प्रभावलयांकित असल्याचे आपण पहातो. प्रत्येक व्यक्तीच्या भोवती काही एक प्रकाशावरण असते, अशीही एक समजूत आहे सामान्य माणसाच्या दृष्टीस ते प्रकाशवलय दिसत नाही. काही जण मात्र असे सांगतात की त्यांना ते दिसते. ह्या समजुतीत तसेच ह्या दृक्-प्रत्यक्षामध्ये तथ्यांश असेल काय ? ह्या प्रश्नाचे उत्तर गेल्या १०० वर्षांत करण्यात आलेल्या प्रयोगामुळे होकारार्थी मिळू लागले आहे.

परमाणूच्या बनलेल्या प्रत्येक वस्तूभोवती तेजोमंडल (aura) असते, असे बॅरन रायकेनबाक यांनी १८९७ मध्ये म्हटले होते (Revue Scientifique) घन पदार्थांपासून देखील उर्जालहरी ( Vibrations ) बाहेर पडत असतात व प्रवाह निर्माण होत असतात ही गोष्ट फुसिएन, विझिओ, इत्यादींनी निदर्शनास आणून दिली होती. कोपल व्हार्निश किंवा सेल्युलाइड कागद लावून धातू अंधारात ठेवला, तर कॅमेऱ्याचे सहाय्याने त्याचे चित्र घेता येते असे रसेल यांनी रॉयल सोसायटीच्या सभेत सांगितले होते.

सजीव द्रव्याच्या भोवती तेजोमंडल (aura) असते हे दर्शवणारा अगदी पहिला फोटो १८९६ मध्ये डॉ. जूदिको नारकिएवाइझ (पोलंड) यांनी दाखविला होता. १९११ मध्ये डॉ वाल्टर जे. किलनर (लंडन) यांनी असे प्रसिद्ध केले की, मनुष्याच्या शरीरातून उर्जालहरी बाहेर पडत असतात व त्यांचे रंगीत चित्र, उष्णतेचे रूपांतर रंगीत प्रकाश लहरीमध्ये करण्याचे तंत्र (थर्मोग्राफी) द्वारा घेता येते डॉ. किलनर यांना असे आढळून आले की, नखे तसेच केस गार असल्यास त्या जागी निळे-काळे ठिपके दिसतात, नाकाचे जागी पिवळ्या रंगाचा प्रकाश दिसतो; गालाच्या बाबतीत नारिंगी व लाल रंग दिसतात. या रंगामध्ये मनुष्याच्या प्रकृती स्वास्थ्य-अस्वास्थ्यानुसार फरक पडतो असेही डॉ. किलनर यांना आढळले होते. ( डॉ किलनर . The Human Atmosphere ) मनुष्याच्या शरीराभोवतालचे तेजोमंडल पाहण्याचा प्रयत्न जीवशास्त्रज्ञ ऑस्कर बॅगनेल यांनीही केला होता त्यांनी असे प्रसिद्ध केले की, पायनासिनॉल, अथवा डायसायनाइन हा रंग मिसळून केलेले द्रावण नळीत किंवा वाटलीत भरून त्यातून पाहिले तर मनुष्याच्या देहाभोवती किरणमय तेजोवलय दिसते, नाकाभोवती तसेच बोटाभोवती ते अधिक विस्तृत असते; मधूनमधून त्यातील एखादा किरण प्रत्येक फूट लांबवर जातो; आणि ते तेजोवलय लोहचुंबक आकर्षून घेऊ शकतो.'

१९३९ मध्ये सेमिऑन डी. किर्लिअन ह्या रशिअन इंजिनिअरच्या मनात अशी कल्पना आली की, दोन इलेक्ट्रोडमध्ये विद्युत प्रवाह सोडला की, जी ठिणगी निर्माण होते तिचा उपयोग करून घ्यावा व त्या दोन इलेक्ट्रोडमध्ये ठेवलेल्या फिल्मवर वनस्पतीचे पान किंवा माणसाचे बोट ठेवून त्याचे

## •• KIRLIAN PHOTOGRAPHY






हाताचे किर्लिअन प्रकाश चित्र

□

प्रकाशचित्र घ्यावे म्हणून किर्लिअन यांनी एक उपकरण बनवले. त्या उपकरणात ८००० ( Volt ) व २०००० इतकी frequency असलेल्या alternating field च्या दोन कपॅसिटर प्लेट असतात. त्या दोहोंदरम्यान फिल्म ठेवतात व त्या फिल्मवर नाणे, झाडाचे पान, तळहात, हातापायाची बोटे, इ. जैव द्रव्य ठेवले व विद्युतप्रवाह सोडला, तर प्रकाशाचा आकृतिबंध चित्रित होतो. माणसाच्या बाबतीत त्याचे शरीरच दुसऱ्या इलेक्ट्रोडचे कार्य करते त्यामुळे दोन-ऐवजी एकच इलेक्ट्रोड वापरतात त्यावर कपॅसिटर त्याच्यावर फिल्म व तिच्यावर माणसाचे हाताचे किंवा पायाचे बोट ठेवतात. फिल्म आणि पान, तळहात किंवा बोट या मध्ये किंचितसे अंतर ठेवले असता, अर्थात हवेसाठी म्हणून थोडीशी जागा असली म्हणजे, प्रकाशाची आकृती अगदी स्पष्ट येते.

या तंत्रास किर्लिअन याचे नाव मिळाले आहे. हे प्रकाशचित्र का येते, त्या चित्राचा अर्थ काय करावयाचा, ते चित्र जैव उर्जेचे असते की वैद्युतचुंबकीय क्षेत्राचे असते, या विषयी मतभेद दिसून येतात व ते निरनिराळ्या संज्ञांच्या रूपाने व्यक्त झालेले आढळतात. काहीजण 'बायो एनर्जी फिल्ड' तर काही जण 'इलेक्ट्रो मॅग्नेटिक फिल्ड' असा शब्द प्रयोग करतात.

### आभासजनक पर्णचित्र

पाने, हाताची बोटे, वगैरे सजीव पदार्थातून वाहणाऱ्या जैविक उर्जेचे क्षेत्र त्या पदार्थाभोवतीदेखील असते व किर्लिअन फोटो हा त्याचा असतो या मताचे मूळ एका लक्षवेधक प्रकारामध्ये आहे. तो प्रकार असा- ताज्या व रसरशीत पानाच्या टोकाचा भाग तोडून टाकलेला असला तरी किर्लिअन प्रकाशचित्रात संपूर्ण पानाची आकृती येते Phantom Leaf या नावाने हे चित्र प्रसिद्ध आहे.

ऑक्सफोर्ड येथील देलावर प्रयोगशाळेमध्ये फुलाच्या कळीचे किर्लिअन चित्र घेतले तेव्हा संपूर्ण उमललेल्या फुलाचे चित्र आले.


पानाच्या बाबतीत आणखी दिसून येणाऱ्या गोष्टी अशा : ताज्या रसरशीत पानाच्या छिद्रांमधून प्रकाश बाहेर पडल्याचे दिसते. जसजसे पान सुकत जाते तसतसा एकएक प्रकाशकिरण कमी होत गेल्याचे दिसून येते. एकाच जातीच्या पानांभोवतालची तेजोवलये सारखीच असतात.

रोगट पानांच्या बाबतीत त्यांच्या तेजोवलयाचा रंग तसेच त्याचा आकार बदलतो. ह्या निरीक्षणांच्या आधारे इनिउसानसारख्या अभ्यासकांना असे वाटते की, पानामधून, प्राण्यांच्या शरीरातून, तसेच मानवी शरीरातून जैव उर्जेचे उत्सारण होत असते. तिचे म्हणजे प्राणशक्तीचे चित्र किर्लिअन फोटोत येत असते.

### किर्लिअन फोटोग्राफीचे उपयोग

सध्या ह्या फोटोग्राफीचे साहाय्य विविध क्षेत्रात घेतले जात आहे. व्यक्तीची जगण्याची शक्ती ( viability ) किती आहे याचा अंदाज घेण्यासाठी; रोगाचे निदान करण्यासाठी; मनोविकृतीचे निदान करण्यासाठी; व्यक्तीची भावनिक स्थिती अंदाजण्यासाठी; गुन्हेगार शोधण्यासाठी; तसेच भूमिगत पाणी किंवा अन्य द्रव्ये यांचा शोध करण्यासाठी ह्या तंत्राचा उपयोग रशिया, अमेरिका, ब्रिटन, पूर्व जर्मनी, रोमानिया, बल्गेरिआ, झेकोस्लोवाकिआ, हंगेरी या देशांमध्ये करण्यात येत आहे

वैद्यकीय मानस शास्त्रज्ञ श्रीमती डॉ. थेल्मा मॉस (अमेरिका), रशिअन जीवशास्त्रज्ञ डॉ. व्हिक्टर इन्युसिन, इत्यादींना काही महत्त्वाच्या गोष्टी आढळल्या आहेत. त्या अशा– किर्लिअन प्रभावलयामध्ये संमोहित अवस्था, ध्यानमग्न अवस्था, माणसाची मनःस्थिती (mood), इत्यादींनुसार परि-



ताज्या व रोगट पानांच्या किर्लिअन प्रकाशचित्रातील फरक

णाम घडून येत असतात माणूस जेव्हा ताण-रहित, शांत अशा मनःस्थितीत असतो त्यावेळी त्याच्या बोटाच्या किर्लिअन प्रकाश चित्रात रेषा दिसतात व त्यात हिरवट रंगाची छटा असते याउलट, सचिंत मनःस्थितीत असलेल्या व्यक्तीच्या बोटाचे प्रकाशचित्र बटबटीत आणि लालसर रंगाचे येते. जर माणसाने दारू, चरस यासारखे मादक द्रव्य सेवन केले असेल, किंवा त्याला गंभीर स्वरूपाची मनोविकृती—सायकोसिस—झालेली असेल तर त्याच्या किर्लिअन चित्रात अलग अलग प्रकाशरेषाऐवजी बटबटीतपणा व गिचमीड दिसून येते. श्रीमती मॉस यांची अशी कल्पना आहे की, किर्लिअन फोटोग्राफीच्या साहाय्याने व्यक्तीच्या अंतरंगातील चिंतेचे प्रमाण अदाजता येईल, तसेच एकाद्या व्यक्तीच्या ठिकाणी असलेली मानसिक विकृती कोणत्या भावनिक स्वरुपाची आहे व तिचे प्रमाण किती आहे हेही ठरवता येईल. कारण, छिन्नमानस (शिझोफ्रेनिआ), मतिदुर्भ्रम (पॅरानोइआ), इत्यादींच्या बाबतीत किर्लिअन चित्रामध्ये भिन्नता दिसून येते.

एकाच्या मनात दुसऱ्याविषयी प्रेमाऐवजी क्रोध निर्माण झाला असताना त्याच्या बोटाच्या प्रकाशवलयात बदल घडून येतो. पतिपत्नी 'प्रेमात आलेले' असते वेळी त्याच्या बोटाभोवतालचे प्रकाशचित्र आणि उभयतांचा कलह झाल्यावेळी घेतलेले चित्र या दोहोमध्ये फरक असतो. समागमाचे कल्पनाचित्र रंगवीत असतेवेळी पतिपत्नीच्या बोटाची टोके एकमेकाजवळ ठेवली तर त्यांची प्रकाशवलये एकमेकात मिसळतात. कधी कधी दोन व्यक्तीच्या बोटाची प्रकाशवलये एकमेकांना भिडत असल्याप्रमाणे दिसतात, तर काही वेळा ती परस्परांना दूर लोटत असल्यासारखी दिसतात श्रीमती मॉस यांचा तर्क असा आहे की, त्या दोन व्यक्ती एकमेकाना आवडत असणे किंवा आवडत नसणे यामुळे असे होत असावे.

## स्त्रियांच्या तक्रारी, शारीरिक रोग

श्री एल. डब्लू कोनिकिए विवज्ञ यांनी संततिप्रतिबंधक गोळ्या घेणाऱ्या स्त्रियांचा व न घेणाऱ्या स्त्रियांचा, तसेच मासिकपाळी येण्याचे थांबलेल्या व चाळिशीच्या आतील स्त्रियांचा किर्लिअन फोटोग्राफी वापरून तौलनिक अभ्यास केला आहे व त्या त्या दोन गटाच्या बाबतीत फरक आढळल्याचे म्हटले आहे या संशोधकास असेही वाटते की,वेदनायुक्त मासिकपाळी, बीजोत्सर्जन (ओव्ह्यूलेशन), इत्यादींचाही अभ्यास किर्लिअन फोटोग्राफीच्या साहाय्याने करता येईल.

शारीरिक दृष्ट्या निकोप व्यक्तीच्या किर्लिअन चित्रात विशिष्ट रंग तसेच (ionization streaks) दिसतात; याउलट आक्रमलेल्या तंतूच्या जलसंचित गुठळ्या ( systic fibrosis ) झालेल्या व्यक्तीच्या चित्रात तसे रंग दिसत नाहीत; unevenness, पिळवटलेपणा, आडवेतिडवेपणा व तुटकपणा दिसतो असे दर्शवणारी चित्रे अभ्यासकांनी प्रसिद्ध केली आहेत. (या प्रकाराशी स्वेदग्रंथीचे अव्यवस्थित कार्याचा संबंध त्यांनी लावला आहे ) सोबतची चित्रे पहा :

किर्लिअन फोटोद्वारे कावीळ, कर्करोग इत्यादींची पूर्वसूचना मिळू शकेल असेही काही अभ्यासकाना वाटते

## हस्तस्पर्शात्मक उपचार

रुग्णाच्या शरीरास स्पर्श करून अथवा शरीराजवळ हात नेऊन रोग निवारण करू शकणाऱ्या व्यक्ती तसेच रोगपरिहार करून घेणारे रुग्ण यांच्या बोटाचे किर्लिअन फोटो अभ्यासण्यात आलेले आहेत. श्रीमती थेल्मा मॉस व श्री डग्लस डीन याना असे आढळल्याचे त्यांनी म्हटले आहे की सामान्य माणसाच्या बाबतीत त्यांनी हस्तस्पर्श करण्यापूर्वीचा त्याच्या बोटाचे किर्लिअन चित्र आणि हस्तस्पर्शानंतरचे चित्र या दोहोमध्ये प्रकाशवलयाचे आकारमान तसेच चमक याबाबतीत फरक आढळून येत नाही. हस्तस्पर्श अथवा हस्तसान्निध्यात्मक उपचार करणाऱ्यांच्या बाबतीत मात्र उपचारपूर्व आणि उपचारोत्तर घेतलेल्या फोटोत फरक आढळतो. उपचार करून घेणाऱ्या व्यक्तीच्या बाबतीतही फरक आढळून येतो. उपचार करणाऱ्यांच्या बोटाभोवतालची प्रकाशवलये मोठ्या आकाराची आणि चमकदार असतात आणि उपचारानंतर ती आकाराने लहान व कमी चमकदार असतात उपचार करून घेणाऱ्या रुग्णाच्या बोटाची प्रकाशवलये उपचारापूर्वी लहान व कमी चमकदार असतात पण उपचारानंतर त्यांचा आकार व चमकदारपणा वाढतो.

## अॅक्युपंक्चर अथवा वेधनचिकित्सा

प्राचीन 'आयुर्वेद ग्रंथामध्ये १०७ मर्मस्थाने सांगितली आहेत व वेधनचिकित्सा ही भारतातून चीन देशात गेली व वेधनबिंदूंची संख्या ६९५ पर्यंत नेण्यात आली असे काही जण म्हणतात. शरीरातील सूक्ष्म उर्जा प्रवाहाच्या असमतोलामुळे प्रकृती बिघडते, शरीराच्या अमुक अमुक ठिकाणी सुई टोचून वाजवीपेक्षा अधिक झालेल्या उर्जा प्रवाहाचा निचरा करता येतो, ह्या कल्पनावर अॅक्युपंक्चर चिकित्सा आधारलेली आहे. असो. अॅक्युपंक्चर करण्याच्या स्थानांच्या जवळपास रोग्याच्या अवयवाच्या किर्लिअन फोटोमध्ये फरक आढळून येतात असे अभ्यासकांनी म्हटले आहे

विख्यात माध्यम ( medium ) श्रीमती आयलीन गॅरेट याना माणसाच्या मृत्यूक्षणी त्याच्या शरीरातून तेजोवलय बाहेर पडत असल्याचे दिसले, असे नमूद केले आहे (Adventures in the Supernormal, १९५९) रशियन वैज्ञानिक डॉ गेनादि सेरगेयेव यानी नुकत्याच मृत झालेल्या व्यक्तीच्या देहातून वैद्युत उर्जा बाहेर पडल्याची उपकरणाच्या साहाय्याने नोंद केली आहे. डॉ. नागेंद्रन ( मद्रास ) यानी केलेल्या निरीक्षणाच्या आधारे असे म्हटले आहे की, मनुष्याचा मृत्यू जवळ येतो तसतसे त्याचे प्रभावलय मंद वा क्षीण व अस्थिर होते व मृत्यूनंतर सहा-सात तासानंतर घेतलेले प्रकाशवलय चित्र अचेतन पदार्थाच्या प्रभावलयासारखे असते

मानसिक स्वरूपाची उर्जा बोटाच्या टोकामधून बाहेर गेल्यासारखे किंवा दुसऱ्या व्यक्तीची मानसिक उर्जा आपल्या शरीरात संक्रमित झाली असे जेव्हा एखाद्यास वाटते त्यावेळी त्या व्यक्तीचे किर्लिअन फोटो एरवीपेक्षा निराळे असतात' असे काही अभ्यासकानी प्रसिद्ध केले आहे अभ्यासकानी पुढील दोन प्रश्न नजरेसमोर ठेवूनही प्रयोग करून पाहिले आहेत. ज्या व्यक्ती दृष्टिक्षेपाने किंवा हलक्याशा हस्तस्पर्शाने वस्तूवर परिणाम घडवून आणू शकतात त्या व्यक्ती स्वतःच्या संकल्पानुसार स्वतःच्या

किर्लिअन चित्राना आकार देऊ शकतात काय ? आणि तसे करू शकत असल्यास त्यावेळी काय घडून येत असावे ? चमचे किंवा धातूच्या पट्ट्या दृष्टिक्षेपाने अथवा हलक्याशा स्पर्शाने वाकवण्याबद्दल ख्याती पावलेल्या (पण जादुगाराच्या टीकास्त्राचे लक्ष्य बनलेल्या) यूरी गेलरवर सॅनफ्रान्सिस्को येथे जे. एफ. हिकमन यानी १९७३ मध्ये प्रयोग करून पाहिले आहेत. बोटाच्या टोकाचे प्रकाशवलय वर्तुळाकार आणून दाखव असे सागितले तेव्हा तसे वलय आले आणि त्रिकोणाकृती आणून दाखवण्यास सागितल्यावेळी तसे प्रकाशचित्र आले. गेलरच्या बोटापासून काही सेंटिमीटर अतरावर घड्याळ ठेवले व बोट व घड्याळ याच्यामध्ये जैव उर्जात्मक –बायोएनर्जेटिक– अन्योन्यक्रिया घडवून आण व घड्याळाची आकृती असलेला प्रकाशचित्रे आणून दाखव असे त्याला सागितले. त्यावेळी तशी प्रकाश-चित्रे आली आणि बोटाच्या प्रकाशवल-याच्या मध्यभागातून एक रेषा गेली आहे असे प्रकाश–चित्र आणून दाखवण्यास सागितले असता, तसे चित्र आले, असा अहवाल हिकमन यानी प्रसिद्ध केला आहे. गेलरने बोटाच्या त्वचेखालील स्नायूच्या हालचाली केल्या असतील असे मानले तरी त्या प्रकाशवलयाना ते ते आकार कसे प्राप्त झाले ? भौतिक घटनावर परिणाम करणारी अशी काही एक जैविक यत्रणा असण्याची शक्यता आहे काय इ. प्रश्न हिकमन यानी उपस्थित केले आहेत.

## किर्लिअन फोटोग्राफी व परामानसशास्त्र

बाह्य इद्रियाच्या माध्यमावाचून दुसऱ्या व्यक्तीचे विचार, भावनात्मक अवस्था वगैरे जाणवणे ( टेलेपथी ), दूरवऱ्च्या वस्तू व घटना ' दिसणे ' ( क्लेअर व्हॉयन्स ) भावी घटनांचे ज्ञान ( प्रीकॉग्निशन ) मनाच्या वस्तूवर प्रभाव (सायकोकायनेसिस,) मरणो-त्तर अस्तित्वाची शक्याशक्यता, इत्यादी विषयाचा अभ्यास सामान्य मानसशास्त्रास समातर किंवा त्याच्या पलीकडचे असे जे परामानसशास्त्र ( पॅरासायकॉलॉजी ), त्यामध्ये होत असतो. आता परामानस-शास्त्राशी किर्लिअन फोटोग्राफीचा सबधच काय असा बऱ्याच परामानसशास्त्रज्ञानी प्रश्न केला आहे. प्रयोगनिष्ठ परामानसशास्त्राचे पुरस्कर्ते डॉ जे. बी. ऱ्हाईन यानी काहीशा रागाने हा प्रश्न विचारला होता काही परामानसशास्त्रज्ञाना मात्र किर्लिअन फोटो-ग्राफीचे परामानसशास्त्राच्या दृष्टीने साहाय्य घेता येईल असे वाटते. याचे कारण असे की अतीद्रिय सवेदनाच्या सदर्भात, विशिष्ट मादक द्रव्ये, समोहित अवस्था, विशिष्ट भावनात्मक स्थिती, ध्यान इत्यादी जे घटक अनुकूल असल्याचे दिसून आले आहे त्या घटकाच्या बाबतीत किर्लिअन प्रकाशवलयाचे आकृतिबधही वैशिष्ट्यपूर्ण असतात, असे साधारणपणे आढळले आहे. साहजिकच, किर्लिअन फोटोग्राफी परामानसिक स्वरुपाच्या प्रकाराची शरीरशास्त्रीय अथवा जैविक बाजू वर प्रकाश टाकू शकेल असे काही जणाना वाटते लॅरी वर्टन, विल्यम जोन्स ब्रॅड स्टीवन्स ( ड्यूक विद्यापीठ ) याना असे वाटते की अतीद्रिय सवेदनक्षम व्यक्ती– ' सेन्सिटिवस ' किंवा ' सायकिक्स ' शोधून काढण्यासाठी किर्लिअन फोटोग्राफी उपयोगी पडू शकेल.

डॉ. पी नागेंद्रन (मज्जा–शल्यकर्म विशा-रद, मद्रास ) यांनी १९७९ पासून अनेक रुग्णाची अगुली प्रकाशवलये अभ्यासली आहेत. १९८३ साली हॉंगकॉंग येथे भरलेल्या एशिअन–ऑस्ट्रेलिअन परिषदेपुढे सादर केलेल्या अहवालात त्यानी असे म्हटले आहे की, मेंदूतील गुल्म, मुखपक्षाघात, अपस्मार, यकृत काठिण्य इत्यादी विकृतींच्या बाबतीत येणाऱ्या किर्लिअन चित्रात आपापले वैशिष्ठ्य असते. उदा. मज्जाकीय विकृती असेल तर वलयामध्ये ठिपकेठिपके दिसतात. यकृत विकृतीच्या बाबतीत त्या भोवतालचे प्रकाश-वलय जणू शाखा फुटल्याप्रमाणे दिसते. ( डॉ. नागेंद्रन याचा मंत्रशक्तीवर विश्वास आहे त्यानी असा दावा केला आहे की ' यत्रावर ' ( – मत्र कोरलेल्या धातूच्या आकृतीवर) पाषाण ठेवून मंत्रोच्चारण केले तर त्या पाषाणाची प्रकाशवलये सजीव वस्तूच्या प्रकाशवलयाप्रमाणे येऊ लागतात. ( त्याच्या म्हणण्यास पुष्टी मिळते की नाही हे पहाण्यासाठी अनेकानी प्रयोग करून पहाणे आवश्यक आहे हे सांगावयास नकोच. ) मुबईस वकिलीचा व्यवसाय करणाऱ्या व झोरोॲस्ट्रिअन धर्माच्या अभ्यासक श्रीमती मेहेर मास्टर मूस ह्यानी १९७८ पासून ॲक्यु-पक्चरच्या सदर्भात रुग्णाच्या हातापायाच्या बोटाचे किर्लिअन फोटोचे साहाय्य घेण्यास सुरवात केली

पेनसिल्व्हा येथे १९८१ मध्ये IKRA पुढे सादर केलेल्या निबधात त्यानी म्हटले की किर्लिअन फोटोत दिसणाऱ्या प्रकाश Harcs वर चद्राच्या कलाचाही परिणाम असतो पूर्णिमेस खूप तर अमावास्येस फारच कमी Harcs दिसून येतात.

दोन व्यक्तीच्या उदा. पतीपत्नीच्या ठिकाणी परस्पराविषयी क्रोधाची किंवा प्रेमाची भावना निर्माण झाली असेल तर त्यानुसार त्या दोघाच्या बोटाची प्रकाशवलये एकमेकाना दूर लोटतात अथवा आकर्षित करतात ही डॉ श्रीमती मॉस याची निरीक्षणे वाचल्यावर माझ्या मनात विचार आला तो असा की, आपल्याकडे विवाहाच्या संदर्भात ज्या दोन समजुती रुढ आहेत त्यामध्ये काही तथ्य असेल काय हे पहाण्यासाठी किर्लिअन फोटोग्राफीच्या साहाय्याने शशोधन करण्यात यावे

(१) मगळ असलेल्या मुलामुलीची बोटे एकमेकाजवळ ठेवून घेतलेली प्रकाशवलये आणि ज्याच्यापैकी एकजणासच मगळ आहे अशा मुलामुलीच्या बोटाची प्रकाशवलये यामध्ये परस्पराच्या सबधात ( उदा. ती वलये भिडणे– न भिडणे ) काही भिन्नता आढळून येते काय हे अभ्यासून पहाता येईल. जर भिन्नता आढळून आली तर पत्रिकेतील मगळाचा जैविक उर्जा प्रवाहाशी काही सबध असू शकेल काय, असा प्रश्न उपस्थित करता येईल

(२) मुलाची व मुलीची ' एक नाड ' असल्यास त्याचा विवाह होणे अनिष्ट मान-तात आदिम प्रथम नाडी, किंवा मध्य नाडी, किंवा अत्य नाडी असलेल्या मुलामुलीची बोटे एकमेकासनिध ठेवल्यास त्याच्या किर्लिअन फोटोच्या बाबतीत काय आढळते व एकनाड नसलेल्या मुलामुलीच्या बाबतीत काय आढळते हेही पहावे

याच सदर्भात आणखी एक विचार सुचतो तो असा . अमेरिकेतील येल विद्यापीठातील प्रा ' हराल्ड सक्सन बर ( Burr ) यानी तीस वर्षे अभ्यास करून १९६८ मध्ये असे

म्हटले आहे की, प्रत्येक सजीव शरीराभोवती त्याचे विद्युत चुंबकीय क्षेत्र असते व त्याची कक्षा मोजता येते मंगळ असलेल्या व नसलेल्या, तसेच एकनाड असलेल्या व नसलेल्या स्त्रीपुरुषांच्या विद्युतचुंबकीय क्षेत्रांची अन्योन्य क्रिया हाही एक अभ्यासाचा विषय होऊ शकेल. या प्रकारचे संशोधन ज्योतिषी व ज्योतिषाचे टीकाकार या दोघांनीही करणे इष्ट ठरेल.

## किर्लिअन प्रकाशवलयांची मीमांसा

भावनात्मक मनःस्थितीतील व्यक्तीच्या बोटाचे प्रकाशवलय एरवीप्रमाणे निळसर रंगाऐवजी तांबूस रंगाचे येते याचा संबंध घामाशी असावा असे बर्टन, जोन्स व स्टीवन्स ( ड्यूक विद्यापीठ ) यांनी स्वतः केलेल्या प्रयोगांच्या आधारे म्हटले आहे. भावनात्मक अवस्थेमध्ये त्वचेवरील घामाचे प्रमाण वाढते, त्वचेकडून विद्युतप्रवाहास कमी अवरोध होतो, व त्वचेभोवतालच्या हवेत क्षाराचेही प्रमाण वाढत असते ह्या गोष्टीशी त्या तांबूसपणाचा संबंध असतो असे त्यांचे मत आहे.

भावनात्मक मनःस्थितीमुळे बोटांच्या किर्लिअन प्रकाशवलयांचा परिघ वाढतो व ते वलय धूसर असते याचा संबंध डॉ. मॉटेडन यांनीही घामाशी लावला आहे. त्यांनी शांत मनःस्थितीत असलेल्या स्त्री–पुरुषांच्या बोटांची प्रकाशचित्रे घेतली व नंतर ह्या स्त्री-पुरुषांनी त्यांच्या डाव्या हाताची बोटे २ अंश सेंटिग्रेड तपमान असलेल्या पाण्यात बुडवल्यावर जेव्हा त्यांना असह्य वाटू लागले त्यावेळी त्यांच्या उजव्या हाताच्या बोटांचे किर्लिअन फोटो घेतले व त्या बोटांवरील घामही मोजला. निम्म्या स्त्रीपुरुषांच्या बाबतीत या वेळची प्रकाशवलये आकाराने मोठी व धूसर होती. त्यांच्या बोटांना कोलोडिऑन लावून घाम बंद केला तेव्हा मात्र नेहमीसारखीच रेषामय वलये आली काही अभ्यासकांच्यामते मात्र साधारणपणे घामाचा (तसेच बोटांचे तपमान, तसेच रक्तपेशींचे प्रसरण यांचा) किर्लिअन प्रकाशवलयांशी संबंध नसतो.

काही शास्त्रज्ञांचे मते, प्रकाशवलयातील हिरवट व पिवळट वर्णाच्या छटा त्वचेतून बाहेर पडणाऱ्या काही मलद्रव्यांमुळे दिसत असाव्यात. पाने, तसेच बोटे यांच्या आतील घटक द्रव्ये सर्वत्र सारखी (homogeneous composition) नसतात. त्या द्रव्याची conductivity देखील सर्व भागांमध्ये एकसारखी नसते. volatility च्या बाबतीतही त्या भागाभागात फरक असतो. त्यामुळे, किर्लिअन फोटोतील आकृतिबंधाशी कोणत्या भौतिक प्रक्रियांचा संबंध असतो हे अजून स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे काहीजण असे म्हणतात की, किर्लिअन प्रकाशवलयाची मीमांसा करताना तेजोवलय (aura), चतुर्थ अवस्थेतील जैव द्रव्य (bio plasma), आकाशिक शरीर (astral body), प्राणशक्तीचे स्त्रोत, इत्यादी सारख्या कल्पनांचा वापर करणे हे उतावीळपणाचे होईल.

काही शास्त्रज्ञांचे मते सजीव द्रव्यातून जे वायू–गॅसेस बाहेर पडत असतात त्यातील इलेक्ट्रॉन्स किर्लिअन तंत्रामुळे निघून जातात व अशा रीतीने इलेक्ट्रॉनरहित (ionize) झालेल्या अणूंचे चित्र येत असते.

काही जणांचे मते (उदा. डॉ. व्ही. जी. अर्डेमेनको) किर्लिअन फोटो हे सजीव तसेच निर्जीव वस्तूतून बाहेर जाणारे इलेक्ट्रॉन्स आणि फिल्म त्यांच्या अन्योन्य क्रियेचा परिणाम म्हणून येत असावेत. काहींना वाटते की स्थिर (static) विद्युत–उत्सारित झाल्यामुळे ते फोटो येत असावेत.

□

### संदर्भ ग्रंथ

१. The Kirlian Aura, संपादक : स्टॅनले क्रिपनर व डो. रुबिन, १९७४ – Anchor Books.

२. IKRA, ( इंटरनॅशनल किर्लिअन रिसर्च असोसिएशन ) फेब्रुअरी आणि मे १९७८

३. Research In Parapsychology, १९७५; १९७६.

४. Blue Print for Immortality, ले. – H. S. Burr.

□



पुस्तके

# वि. शं. पारगावकर : माणसांच्या कथा

जयवंत दळवी

मराठी साहित्य विश्वात वि. शं. पारगावकर हे नाव गेली तीस-पस्तीस वर्षे तरी सातत्याने नावाजले जाते आहे. कथा, कादंबरी, ललित लेख, समीक्षात्मक लेख, राजकीय लेख अशा विविध स्वरूपाचे लेखन पारगावकर करीत आहेत आणि विशेष म्हणजे किमान विशिष्ट दर्जा सांभाळून करीत आहेत. अलीकडेच त्यांच्या पंचवीस उत्तमोत्तम कथांचा एक संग्रह 'आविष्कार' या नावाने प्रसिद्ध झाला आहे. पारगावकरांचा आविष्कार अशा अर्थाने या संग्रहास 'आविष्कार' नाव दिले गेले असेल, तर या संग्रहात पारगावकरांच्या सर्व लिखित वाङमय प्रकारातून— कथा, कादंबरी, समीक्षा, ललित लेख, वैचारिक लेख अशा प्रकारातून निवडक साहित्य घेतले असते तर ते अधिक शोभून दिसले असते. असो!) या संग्रहातल्या निवडक पंचवीस कथा कोणी निवडल्या आहेत, याचा पुस्तकात उल्लेख नाही. पुस्तकाला प्रस्तावना प्रा. स. शि. भावे यांची आहे; पण त्यांनीही कथांची निवड कोणी केली याचा उल्लेख केलेला नाही. त्यामुळे ही निवड खुद्द लेखकाचीच असावी.

'आविष्कार' हा संग्रह म्हणजे नुसता पंचवीस निवडक कथांचा संग्रह नाही. त्यात त्याहीपेक्षा काही अधिक गोष्टी आहेत. लेखक वि. शं. पारगावकर आणि त्यांच्या कथा, यासबंधी वाचकांना असलेले कुतुहल शमविणाऱ्या काही अन्य गोष्टी या संग्रहात समाविष्ट करण्यात आल्या आहेत. मराठीचे एक व्यासंगी समीक्षक प्रा. स. शि. भावे यांची विवेचक अशी प्रस्तावना आहे. खुद्द वि. शं. पारगावकर यांचे 'निमित्त' या नावाचे एक आत्मनिवेदन आहे. पुस्तकाच्या शेवटी 'मूल्यमापन' या नावाचा एक विभाग आहे. त्यात पारगावकरांचे साहित्य वाचून त्यांना आलेली पत्रे, त्यांच्या ग्रंथांवर वेळोवेळी आलेल्या परीक्षणातले महत्त्वाचे उतारे असेही उपयुक्त मूल्यमापनात्मक साहित्य देण्यात आलेले आहे. यात पत्रे किंवा परीक्षणे लिहिणारे जे ज्येष्ठ लेखक आहेत, त्यात वा. ल. कुलकर्णी, दि. के. बेडेकर, राम पटवर्धन, विद्याधर पुंडलिक, आनंद यादव, द. भि. कुलकर्णी, म. ना. अदवंत, गं. ना. जोगळेकर, मंगेश पदकी, गो. म. कुलकर्णी, श्री. ग. माजगावकर, मु. शं. किर्लोस्कर, भ. प्र. मोहरीर, दि. ग. कानिटकर, श्री. रं. कुलकर्णी आणि यशवंतराव चव्हाण यांचा समावेश आहे. ही पत्रे आणि परीक्षणे गेल्या पंचवीस-तीस वर्षातली — पारगावकरांचा लेखन—विकास चालू असतानाच्या काळातली आहेत आणि त्या सर्वांमध्ये टिमकी वाजवण्याचा प्रकार नसून प्रांजळ आणि प्रामाणिक सूर आहे. ती पुढे कधी तरी छापली जातील म्हणून लिहिलेली नाहीत.

निवडलेल्या प्रत्येक कथेच्या खाली त्या त्या कथेचा लेखनकाल किंवा प्रकाशनकाल दिला असता तर लेखकाच्या एकूण विकासाच्या आलेखाला थोडी अधिक अर्थपूर्णता आली असती! असो!

मुखपृष्ठ रविमुकुल यांचे आहे. मुखपृष्ठ देखणे आणि आकर्षक आहे. मुखपृष्ठावरील चित्रात एका प्रौढ बाईचे सोज्वळ असे रंगीत चित्र आहे. त्या पोर्ट्रेटमधून नेमके काय सूचित होते ते निश्चितपणे कळत नाही; परंतु पारगावकरांच्या या संग्रहातील सर्व कथात ज्या प्रौढ स्त्रिया आल्या आहेत, त्या सर्वांचे हे मिश्र रूप असावे. ते रूप मात्र उत्तम आहे. ती गहिऱ्या नजरेची मुग्ध प्रौढा किंचित वळून कुणाकडे तरी बघते आहे! (ती आपल्याकडेच बघते आहे असे पारगावकरांनाही या वयात वाटण्याची शक्यता आहे!)

या संग्रहाला ख्यातनाम समीक्षक प्रा. स. शि. भावे यांनी मर्मग्राही प्रस्तावना लिहिली आहे. या प्रस्तावनेचे शीर्षक आहे— 'समग्र लेखकाच्या अभ्यासाचे प्रश्न!' प्रस्तावनेच्या प्रारंभी प्रा. भावे यांनी 'व्यावहारिक अनुभवापासून मूळ कलानुभवबंध, आणि त्या मूळ बंधापासून प्रकट साहित्यबंध हा निर्मिती प्रक्रियेचा किंवा कवीव्यापाराचा प्रवास' कसा होतो हे स्पष्ट करण्यासाठी तीन तक्ते काढले आहेत आणि त्या तक्त्यानुसार संग्रहातली 'अस्थि' ही कथा वाचकांना समजावून देण्याचा प्रयत्न केला आहे. प्रत्यक्षात कथा समजते; पण तक्ते समजत नाहीत, अशी परिस्थिती आहे! (कदाचित हे तक्तेच समजावून देण्यासाठी पारगावकरांना एखादी नवीन कथा लिहावी लागेल!) सुदैवाची गोष्ट म्हणजे तक्त्यांच्या आधाराने 'अस्थि' कथा समजावून देता देता योग्य वेळी भावेंना योग्य ती जाणीव झाली आहे. कारण मध्येच त्यांनी वेगळ्या टायपात छापलेली माफी मागून खुलासा केला आहे. संबंध प्रस्तावनाभर हे तक्ते फिरले असते तर बहुधा वाचकांनाही आपल्या अस्थि आपल्याच खांद्यावर घेऊन कुठेतरी तोंड घेऊन जावे लागले असते! हा प्रारंभीचा भाग सोडला तर भावे यांची प्रस्तावना लेखकाचा समग्र अभ्यास कसा करावा या विचारांना उत्तम चालना देणारी आहे यात मुळीच शंका नाही. या दिशेने खुद्द पारगावकरांचाही भावे यांनी (किंवा अन्य कुणीतरी) वेगळा अभ्यास करणे उद्बोधक होईल. स्पष्ट उत्तरे न देता भावे यांनी प्रस्तावनेत पारगावकरांच्या कथा-कादंबऱ्यांच्या संदर्भात खूपसे प्रश्न उपस्थित केले आहेत- ते कोणत्याही लेखकाच्या संदर्भात अभ्यासाच्या दृष्टीने उपयुक्त ठरण्यासारखे आहेत. या संग्रहातच खुद्द पारगावकरांचे एक आत्मनिवेदन आहे. त्यात काही प्रश्नांची उत्तरे मिळतात. तरीही या सर्व प्रश्नांचा विचार करून खुद्द पारगावकरांनीही स्वतःचे असे 'एक स्वगत' लिहून ठेवावे. ते कुठल्यातरी अन्य संग्रहात किंवा 'आविष्कार' च्याच दुसऱ्या आवृत्तीत समाविष्ट करता येईल.

## आत्मनिवेदनातला प्रांजळपणा

पारगावकरांच्या कथांना भावे यांनी 'चिंतनकथा' असे नाव दिले आहे. ते निश्चितच अर्थपूर्ण आहे यात शंका नाही. त्या संदर्भात भावे यांनी जे प्रश्न उपस्थित केले आहेत, ते पहाण्यासारखे आहेत. त्यातल्या काही प्रश्नात उत्तरेही सूचित आहेत. भावे म्हणतात– 'पारगावकर हे मूळात स्वप्नदर्शी, आदर्शवादी. असा माणूस आत्मकेंद्रित आणि हळवा असतो. म्हणूनच, स्वतःला सहज मिळाव्यात अशा आकांक्षांसाठी झगडण्याची व्यावहारिक प्रेरणा अशा माणसात नसते. असा माणूस मग एकीकडे चिंतनात व दुसरीकडे स्मरणरमणीयतेत आसरा शोधतो. म्हणून पारगावकरांचे चिंतन व्याकूळ झाले आहे व ते शाश्वत, तात्त्विक हिंदू परंपरेचा आधार शोधते आहे, मायावादात मुक्ति शोधते आहे, असे निष्कर्ष काढल्याने आपले समाधान होईल काय ?'


आणखी काही महत्त्वाचे प्रश्न भावे यांनी उभे केले आहेत. ते विचारतात–

'पारगावकरांनी नाटक अथवा एकांकिका हे बंध का निवडले नाहीत ? विरोधाचे भान त्यांना आहे, आकर्षणही आहे. विरोध त्यांना चांगला उमजतो, भावतो, लेखनात चांगला रंगवता येतो. मग त्यातील ठसठशीत नाट्य लेखनात उभे करावे असे त्यांना का वाटले नाही ?

'चिंतनशीलततेमुळे असे झाले असेल का? विरोधातील ठसठशीत नाट्यापेक्षा त्यातील वंचना आणि अगतिकता त्यांच्या चिंतनशीलतेला अधिक महत्त्वाची वाटली असेल का ? की ही त्यांच्या मध्यमवर्गीय, ब्राह्मणी चिंतनशीलतेचीच अगतिकता आहे ? मग अशा अगतिकतेतून अनेकांच्या लेखनात जसा कुजका उपरोध येतो तसा पारगावकरांच्या लेखनात का येत नाही ? दि. बा. मोकाशींसारखी त्यांच्या चिंतनाला विनतक्रारीची शांत बैठक आहे. तशी ती का आहे ? त्यांचे चिंतन ग्रामीण, मागासलेल्या, सरंजामशाही परिस्थितीतून ? की एकत्र कुटुंबाच्या परिस्थितीतून ?'

या प्रश्नांतून भावे यांनी पारगावकरांच्या लेखनप्रकृतीचे पटणारे असे विवेचन केले आहे. अभ्यासू वाचकांनी ते मुळातून वाचण्यासारखे आहे. प्रस्तावनेतल्या अनेक प्रश्नात आणखी एक प्रश्न आवश्यक होता. तो असा– 'पारगावकर 'सत्यकथे'च्या सावलीत वाढल्यामुळे त्यांच्या लेखनावर कोणत्या स्वरूपाचे परिणाम झाले ?' या प्रश्नाचा बराच उहापोह 'सोबत'कार ग. वा. बेहेरे यांनी केला आहे. ('सोबत' १२ जाने. १९८६) परंतु तो एकूण 'सत्यकथे'ला फटकारण्यासाठीच खर्ची पडला आहे. भावे हे स्वतः 'सत्यकथे'चे कैवारी, किंबहुना तटस्थ कैवारी असल्यामुळे त्यांनी या प्रश्नाचे उत्तर देणे महत्त्वाचे ठरेल.

या संग्रहातले 'निमित्त' हे पारगावकरांचे आत्मनिवेदन त्यातली तळमळ आणि प्रांजळपणा यामुळे अतिशय वेधक आणि वाचनीय झाले आहे. या निवेदनातून पारगावकरांचे मराठवाड्यातले निजामशाहीतील बालपण आणि पुढे पुण्यातले वास्तव्य यामुळे त्यांची साहित्यिक प्रकृती कशी घडत गेली याचा अंदाज बांधता येतो. वर दिलेल्या प्रश्नांच्या संदर्भात त्यांच्या निवेदनाच्या आधाराने असे म्हणता येईल की पारगावकर 'सत्यकथे'च्या गोटातले असले तरी ते गटातले नव्हते ! 'सत्यकथे'त कथा येणे हे त्यांना अभिमानास्पद वाटत होते. पण तिथे येते तीच फक्त कथा असे त्यांनी कधी मानले नाही किंवा 'सत्यकथे'साठी म्हणून (काही लेखकांप्रमाणे) लेखनाची तिरकस बैठक त्यांनी कधी मारली नाही. आपल्या निवेदनात स्वतःबद्दल त्यांनी फार चांगले विवेचन केले आहे. ते म्हणतात–'माझी प्रतिभा एका विशिष्ट प्रकारच्याच जीवनाला किंवा त्या जीवनातील जातीला वाहिलेली नाही उदाहरणार्थ, गिरगावातील सुखवस्तू पांढरपेशांचे जीवन, सदाशिवपेठेतील क्षीण ऐतिहासिक धाग्याला चिकटून राहिलेले जीवन किंवा गावाबाहेर फेकल्या गेलेल्या दलितांचे जीवन, अथवा शहराबाहेरचे ग्रामीण जीवन अशा वेगवेगळ्या पताका (बॅनर्स) घेऊन लिहिणाऱ्या लेखकाची माझी जात नाही जीवनात कोणत्याही अनुभवांना मी माझ्या कलेसाठी वर्ज्य मानलेले नाही. माझ्या दृष्टीने कलेमध्ये अशा प्रकारची जातिपंथ व्यवस्था असत नाही. या बाबतीत हेमिंग्वे या श्रेष्ठ लेखकाला मी आदर्श मानतो. माझ्या प्रतिभेची जात ही अशी वेगळी असल्यामुळे मला वाटते माझ्या कलेची (कथेची, कादंबरीची किंवा ललितलेखनाची) कोंडी झालेली नाही. मी नागरी जीवनावरच्या कथा ज्या कलानिष्ठ भूमिकेतून लिहिल्या आहेत, तितक्याच ग्रामीण आणि दलित जीवनानुभवावरच्या कथा व कादंबऱ्याही लिहिल्या आहेत. या संग्रहातील 'खेळ' ही कथा किंवा 'माळावरचा आंबा' आणि 'भजन' यांचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. काही वर्षानुवर्षे लेखनप्रक्रियेत गुंतलेल्या आणि काही नव्याने उदयास आलेल्या ग्रामीण वा दलित लेखकांचे म्हणणे असे आहे की, अस्सल अनुभव, जीवन जगण्यातूनच निर्माण होतो आणि अशा अस्सल अनुभवांमधून जन्म पावलेली कला हीच खरी कला ! आणि अशा कलेच्या समीक्षेची मोजपट्टीही वेगळी. परंतु ही समजूत किती मोगळ आणि दिशाभूल करणारी आहे याची अशा लेखकांना जाणीव नाही, हे दुर्दैव!'



**शहरी, ग्रामीण आणि दलित**
**तिन्ही वातावरणातल्या कथा**

पारगावकरांचे हे विवेचन बिनतोड आहे यात शंका नाही. दलितातले काही लेखकही आता ते मान्य करू लागले आहेत. ग्रामीण साहित्याच्या संदर्भात डॉ. आनंद यादव यांना जेवढ्या लवकर ते पटेल तो सुदिन !

## 'माणूस' हेच लक्ष्य

पारगावकरांचे हे म्हणणे या संग्रहातल्या त्यांच्या पंचवीस कथा वाचल्यानंतर पटल्याशिवाय रहात नाही ! एकतर पारगावकरांनी शहरी, ग्रामीण आणि दलित अशा सर्व प्रकारच्या कथा लिहिल्या आहेत. ज्या काळी या भेदावरून मोठी आरडाओरड होत नव्हती,

आणि या भेदावर आधारलेली साहित्य संमेलनेही भरत नव्हती त्या काळात पारगावकर ह्या तिन्ही प्रकारच्या कथा लिहीत होते, हे महत्त्वाचे ! (अशा तिन्ही वातावरणातल्या कथा लिहिणारे पारगावकर हे आद्य आणि एकमेव कथाकार आहेत असेसुद्धा म्हणता येईल !) खरे पाहाता, साहित्यातले वर्गभेद आणि वर्णभेद अंतिम निरर्थक आहेत. कारण साहित्य म्हणजे माणसाचा कलात्मक शोध ! परिस्थितीचे वर्णन म्हणजे साहित्य नव्हे ! तसाच एखाद्या परिस्थितीत एखादा माणूस कसा जगतो हे जशाचे तसे सांगणे म्हणजेही साहित्य नव्हे ! (दलित लेखकांनी ह्याच गैरसमज करून घेतला आहे !) यापलिकडे साहित्य असते, आणि ते यापलिकडे असते याचे कारण लेखकाचे कलात्म मन ! हे कलात्म मन फक्त व्यावहारिक अनुभवातच रमत नाही. तिथेच थांबत नाही. पारगावकरांना या गोष्टीची लेखक म्हणून उत्तम जाणीव आहे.

त्या दृष्टीने 'पायाखालची जमीन', 'माळावरचा आंबा', 'इमारत', 'खळे' किंवा 'वीज' या कथा आवर्जून वाचण्यासारख्या आहेत. या कथांना ग्रामीण, दलित, श्रमजीवी माणसांची पार्श्वभूमी लाभली आहे; पण त्यांना तशी पार्श्वभूमी लाभली आहे हे या कथांचे मोठेपण नाही. त्या खोटया मोठेपणासाठीही पारगावकरांनी त्या लिहिल्या आहेत असे वाटत नाही. पारगावकरांचे लक्ष 'माणसा'वर असते. परिस्थितीपेक्षा, भोवतालापेक्षा परिस्थितीतला, भोवतालातला माणूस हे पारगावकरांचे लक्ष्य असते. ती माणसे पारगावकरांना उभी करायची असतात, जिवंत करायची असतात, ही माणसे आपल्याला कधी तरी भेटू शकतील, अशी ! पारगावकरानी या संग्रहातल्या पंचवीस निवडक कथात विविध अनुभव चित्रित केले आहेत... विविध अनुभव आणि तो तो अनुभव घेणारी माणसे. ही माणसेही विकृत किंवा मुलखावेगळी नाहीत. ती आपल्यातलीच आहेत आणि तरीही त्यांचे अनोखे माणूसपण आपले चित्र कोरत जाते. चित्तात ही माणसे ठसून जातात. मग तो 'मोर' कथेतला मुलाचा बाप असो, 'खळे' कथेतला रामू असो किंवा 'वीज' कथेतला तुका असो. परिस्थितीच्या संघर्षात ती माणसे पिचलेली असतात ! पण 'आता पाहा ही माणसे कशी पिचून गेली आहेत ती—' (क्रांति अटळ आहे !) अशा प्रतिज्ञेने किंवा आविर्भावाने पारगावकर चित्रण करीत नाहीत. दारिद्र्याचे चित्रण हाही त्यांचा हेतू नसतो. या दृष्टीने 'मोर' ही छोटी कथा मुद्दाम पाहण्यासारखी आहे. त्यात दारिद्र्यामुळेच नाही तर अन्य कारणांमुळेही मध्यम वर्गीय कुटुंबातल्या एका तरुण बापाची संवेदनाच कशी मरगळून जाते हे उत्तम प्रकारे दाखविले आहे. या बापाच्या मनःस्थितीचे वर्णन पाहा. हा बाप स्वतःशीच म्हणतो— 'माझ्या कपाळावर माझ्या नकळत आठ्यांचे जाळे विणले जाते. या सर्व गोष्टींचा तीव्र निषेध व्यक्त करण्याकरिता मनाची धडपड चाललेली असते; परंतु घरात चिरचिरेपणा दाखवणे कर्त्या पुरुषाला शोभत नाही. म्हणून मला सारा संताप आतल्या आतच गिळून टाकावा लागतो. हे एकच काम संवयीने माझ्या इतके अंगवळणी पडलेले आहे की, अशा प्रसंगी आपोआपच, कुणी तरी अज्ञात व्यक्तीने तोंडात बोळा कोंबल्यागत माझी वाचा बसते !'

या संग्रहातल्या सर्वच कथा मन लावून वाचण्यासारख्या आहे. वेगवेगळ्या कारणांसाठी ! पण त्यातही 'अस्थि' ही कथा चिरकाल स्मरणात राहील अशी आहे. ती नाट्यमय आहे. वेगवेगळ्या स्तरावर मन हेलावून टाकील अशी आहे. कथेचा नायक आता वयाने मोठा झाला आहे. वृद्धत्वाकडे वाटचाल करतो आहे. या क्षणी तो आजारी आहे आणि पंधरा वर्षापूर्वीचा एक प्रसंग त्याला व्याकुळ करतो आहे. पंधरा वर्षापूर्वी त्याचे वडील वारले. तेव्हा त्याच्या थोरल्या भावाने हजामत करून डोके 'हिरवे-निळे' करून घेतले होते; पण याने मात्र तसे करायला नकार दिला होता. सारे आटोपल्यावर तो नोकरीच्या गावी जायला निघाला तेव्हा थोरला भाऊ याला म्हणाला, 'नदीवर झाडाला टांगून वडिलांच्या अस्थि ठेवल्या आहेत, त्या जाताना घेऊन जा थोडासा वाकडा प्रवास पडेल; पण जाताना त्या अस्थि गंगेत नेऊन टाक !' अनिच्छेने तो अस्थि नेतो आणि वाकडा प्रवास टाळण्यासाठी आगगाडीतून एका नदीवरून जात असताना खिडकीतून अस्थि फेकतो. त्या नदीत न पडता एका दगडावर आपटल्याचा आवाज काळोखात येतो. 'माझ्या हातातल्या अस्थींची पुरचुडी उघड्या मैदानावरच नव्हे, तर चक्क एका दगडावर आपटल्याचा आवाज झाला आणि आपलं डोक खावाला आदळून झिणझिण्या यावयात तशा झिणझिण्या माझ्या मस्तकातून उठल्या.' पुढे तो हे सारे विसरून गेला. आता तो स्वतः मृत्यूच्या जवळ आला आहे. वय झाले आहे. आजारपण आले आहे. आणि सर्वात भीतीदायक म्हणजे त्याचा मुलगा सुधीर आणि त्याची सून शैला त्याला दुरावत आहेत... त्या दोघांनी घर सोडून जाण्याचे ठरवलेले आहे ! अशा परिस्थितीत त्याची मनःस्थिती पारगावकरांनी फारच समर्थपणे रंगवली आहे. ती वाचता वाचता आपले मन आरपार छेदले जाते— 'मी तक्क्याला टेकून बसलो होतो. समोरच्या खिडकीतून दृष्टी आरपार जात होती. क्षितिजाजवळचे डोंगर अस्पष्ट दिसत होते. वरचे आकाश आणि आकाशापर्यंत भिडलेली माडाची झाडं वाऱ्याने मारखी घुसळली जात होती. खिडकीवाटे मला सारं स्पष्ट दिसत होतं. आणि माझी प्रकृति विलक्षण बिघडली आहे असं वाटून बायको माझ्या सर्वांगावरून हात फिरवत होती.

'तिच्या हाताची हाडं माझ्या सर्वांगाला स्पर्श करीत होती; परंतु माझ्या अस्थींची


प्रतिकूल निसर्ग
जीवघेणी उपासमार
सहकाऱ्यांचे मृत्यू
भयाण एकाकीपणा, त्यावर
मात करून, चार हजार मैलांची
पायपीट करून ते कैदी
भारतात पोचले.
कसे ?
दुसऱ्या महायुद्धातील
एक चित्तथरारक पलायन कथा.

मला निसटलंच पाहिजे !

अनुवाद : श्रीकांत लागू
वीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

पुरचुंडी समोरच्या माडाच्या झाडाला अडकविलेली मला स्पष्ट दिसत होती तुफान वाऱ्याबरोबर ती एखाद्या लहान मुलाच्या झोळीसारखी हलत होती.

'आणि आत शैलाचा मुलगा अजून रडत होता शैला स्वतःच्या सामानाची आवराआवर करीत होती आणि सुधीर तर केव्हाच बाहेर पडला होता.

'मी मात्र पापणी न हलवता समोरच्या त्या माडाच्या झाडाकडे बघत होतो! माझे लक्ष त्या झाडावर अडकविलेल्या काल्पनिक अस्थीकडे होतं. (इथे हा 'काल्पनिक' शब्द उपरा आहे तिथे तो नको होता!) वाऱ्याने हलल्यामुळे अस्थीचा कडकड होणारा आवाज माझ्या कानात घुमत होता.'

अनेक स्तरावर ही कथा आपल्याला हालवते. वार्धक्य, आजार, मुलगा दुरावणं, वंशाचा सबंध तुटणे, मृत्यू, अस्थी, मोक्षाच्या कल्पना अशा अनेक संकल्पनांच्या मिश्र परिणामाने आपण मुळातून हालतो. अशा कथेच्या संदर्भात ही कथा शहरी आहे का? ग्रामीण आहे का? दलित का? असे प्रश्न कोणी (मग तो शहरी असो, ग्रामीण असो वा दलित असो–) कधी विचारील का? हेच या कथेचे श्रेष्ठत्व! ' □

'आविष्कार'
पचवीस निवडक कथा
ले: वि श. पारगावकर
प्रस्तावना. प्रा स. शि. भावे
प्रकाशक: प्रतिमा प्रकाशन, पुणे
पृष्ठे– २७६, मूल्य–७०रु.

# दूर गेलेले घर

घर हे नुसत्या दगडविटाचं बांधकाम कधीच नसत प्रत्येक दोन विटाच्यामध्ये भावना कालवल्या गेल्या असतात. श्रद्धेन ते लिंपलेलं असतं. आणि ते जर पिढ्यान् पिढ्या एखाद्या कुलदैवताचं अधिष्ठान असेल तर सगळ्या पिढ्या, त्यातील व्यक्ती त्या चिवट धाग्यानी बांधलेल्या असतात. ते घर, ते गाव हेच त्यांच्या अस्तित्वाची सीमा होऊन जात. पण एखाद्या पिढीत एखादा असा निपजतो की तो या सीमा भेदून बाहेरच विश्व धुंडाळतो. त्याच्या या बंडखोर वृत्तीनं घरात संघर्ष उभा राहतो.

या संघर्षाचं दमदार बीज असलेली लक्ष्मीकांत तांबोळी यांची 'दूर गेलेले घर' ही कादंबरी आणखी एका संघर्षाला वाचा फोडते. देवधर्म, परंपरा आणि श्रद्धा याना जपणारी सश्रद्ध माणसं आणि बुद्धिवादाचा आधार घेऊन या सर्वांना नाकारणारी माणसं असा हा सनातन संघर्ष. तो चालत आला आहे आणि चालत रहाणार आहे. या संघर्षाची कादंबरीतली पार्श्वभूमी अशी– मराठवाड्यातलं जिंतूर हे गाव. तिथल एक महाराज घराण, जुना मोठा वाडा तो म्हणजे एक धर्मपीठच. नृसिंह, नरहरी हे त्यांच कुलदैवत. घराण्याच्या सात पिढ्या त्या वाड्यात वावरल्या. मूळ पुरुषाचा मुखवटा आणि गादी तिथं आहे. त्याच नाव सतबुवा. पण आता काळाच्या ओघात हे धर्मपीठ, हे संस्थान पडझडीला आल होतं. एकेकाळी कथा–कीर्तन, प्रवचन, भजन, उत्सव, आरत्यांचा गजर यानी दणाणून गेलेला तो वाडा आता सुनसान झाला होता. पूर्वीची ती गजबज आणि वर्दळ थांबली होती. आता गादीला उत्पन्नही विशेष येत नव्हतं. त्यातून खर्च भागत नव्हता कोणाचा खर्च? तर त्या भल्या मोठ्या वाड्यात राहणाऱ्या सदाशिव आणि त्याच्या पत्नीचा, दोनच माणसांचा खर्च.

सदाशिवचा चुलत भाऊ प्रल्हाद महाराज घराण्यात जन्माला आल्याचा त्याला काहीही अभिमान नव्हता. सदाशिव मात्र अतिशय देवभोळा प्रल्हाद स्वतःला बुद्धिवादी समजणारा. 'समजणारा' अशासाठी म्हणायचं की त्याचा बुद्धिवाद पुरेसा प्रखर नाही त्याचं स्वतःचच मन दोलायमान आहे तरुणवयात मात्र सात पिढ्याचा इतिहास त्यान टराटरा फाडून टाकला. लक्तरं फेकून द्यावीत तसे सारे सबंध झुगारून दिले. परंपरेच्या जरतारी महावस्त्राच्या चिंध्या केल्या आणि तो गावाकडे, घराकडे पाठ फिरवून मुंबईला गेला. कॉलेजमध्ये कांट, मार्क्स, रसेल अभ्यासलेल्या प्रल्हादला घराच्या कोणत्याच कर्मात रस नव्हता. मुंबईला तो प्राध्यापक झाला. स्वतःच मुलगी शोधून लग्न केलं. गावाशी त्याला कसलाच संबंध नको होता.

या त्याच्या करणीनं वडील मात्र फार दुखावले. त्यांनी मरेपर्यंत, मरतानाही प्रल्हादचं तोंड पाहिलं नाही. सदाशिवनं त्यांना माडी दिली. पुढे सर्व कारभार, वारसाहक्क ओघानंच सदाशिवकडे आला. सदाशिवनं बारा वर्षं कसबसं रेटलं. पण आता त्याच्याहीकडून होत नव्हतं. खरा वारस प्रल्हाद, त्यानं येऊन सर्व बघावं असं सदाशिवला वाटत होतं. प्रल्हादच्या वैयक्तिक जीवनातही श्रद्धा आणि बुद्धीवादान आणखी एक संघर्ष उभा केलेला. त्याची पत्नी सुधा ही भाविक, श्रद्धाळू तिला त्या वाड्याची, गावाची ओढ वाटते. त्याचा मुलगा संजू अतिशय आजारी पडतो तेव्हा प्रल्हाद सुधाला नरसिंहाच्या फोटोसमोर उदबत्ती देखील लावू देत नाही. अखेर संजू मरतो. देवाचं केल असतं तर संजू वाचला असता अशी सुधाची भावना. संजूच्या मृत्यूमुळे मात्र प्रल्हाद हादरतो तशात सदाशिवची सारखी पत्रं. एकदा तरी येऊन जा! शेवटी तब्बल बारा वर्षांनी प्रल्हाद सुधासह जिंतूरला येतो.

गावात आणि वाड्यात आल्यापासून मात्र प्रल्हाच्या बुद्धिवादाला हादरे बसायला लागतात. तो एकटा आणि बाकी सगळी श्रद्धाळू माणस दुसऱ्या बाजूला, यात तो हेलपाटतो. त्याचा हेलावणारा बुद्धिवाद शेवटी नृसिंहाची प्रतिमा ओंजळीत घेण्याइतपत झुकतो. आपल्या झाडून साऱ्या पूर्वजाजवळ अशा कोणत्या निष्ठा होत्या, ज्या त्याना त्याच एका वाटेने नेत होत्या हे त्याला कळत नाही. पण शेवटी रक्त तेच. त्याच घराण्याचं. एखाद्या कमकुवत क्षणी तो दुबळा होतो. गादीसमोर मनाविरुद्ध का होईना, हात जोडताना तो गहिवरून जातो. प्रल्हादच्या मनातलं हे जीवघेण द्वंद्व लेखकान फार सुरेख टिपलं आहे त्याला सारख वाटत, लोकाची श्रद्धा भाबडी असेल, पण त्याना मिळणारा आनद तर खरा आहे ना? आपल्याला तर हा आनदही मिळणं शक्य नाही. आपल्या बुद्धिवादान तरी आनद मिळतो का आपल्याला? कशात ना कशात मन गुंतवून माणसं जीवन सुसह्य करतात. जीवनातले प्रश्न सोडवतात आपण हेच प्रश्न बुद्धीनं सोडवतो. सगळेच प्रश्न बुद्धीनं सुटतात का? भावनेनं एखादी अवघड समस्याही सहज सुटून जाते. सश्रद्ध राहून सुख मिळत असेल तर अश्रद्ध राहण्यात तरी काय अर्थ आहे? देव, देवपूजा या गोष्टी निरर्थक वाटतात

आपल्याला ? पण निरूपयोगी, निरर्थक अशा कितीतरी गोष्टी करत असतो आपण.

सदाशिव आणि वहिनी दोघंही आता थकलेत. महाराज घराण्याचा खरा वारस सदाशिव नसल्याने त्याला लोक तसे मानत नसत. घराण्याचा कोसळणारा डोलारा तो कसातरी सावरत होता. खरं तर हे सगळं प्रल्हादन करायच. सदाशिव प्रल्हादला सरळ सागतो तू इथं येऊन रहा, नोकरी सोडून दे आणि गादी चालव. प्रल्हाद या गोष्टीला अर्थातच नकार देतो. सदाशिव चिडतो. पण सदाशिवची व्यथा तितकीच खरी आहे. सस्थानाचा गाडा ओढताना त्याची दमछाक होते. लोकाची महाराज म्हणून त्याच्यावर भावना नाही पण त्याला करावं तर सगळं लागत. उत्सव, पूजा–अर्चा आपलं वागणं चुकतय् हे प्रल्हादला कळत, त्याला सदाशिवचे हाल कळतात. पण लोकांच्या बावळट श्रद्धेवर जगायची त्याला इच्छा नसते. काही दिवस वाड्यात राहून अखेर सपत्नीक तो मुबईचीच वाट धरतो. आता पुन्हा बारा वर्षांनीच काय, कधीच तो या गावात येणार नसतो ! जाताना मात्र श्रद्धेच बारीकस रोपट त्याच्या मनात रुजवण्यात वहिनी यशस्वी होते

## बदलत्या समाजाचं चित्र

अशा प्रकारचा विषय घेऊन लिहिलेली इतकी चागली कादबरी मराठीत तरी दुर्मिळ आहे अशा प्रकारची श्रद्धा, घराणं, कुलदैवत, मूळपुरुष हे महाराष्ट्रातल्या एका विशिष्ट काळाच चित्र आहे कोकणच्या पार्श्वभूमीवर आतापर्यंत यांच्या जोडीला थोडसं गूढ घेऊन कादबऱ्या लिहिल्या गेल्या. त्याना कोकणातील हिरवाई, राया, डोह सुरेख वातावरण पुरवायचे. पण या कादंबरीचं कथानक घडतं मराठवाड्यात. उजाड, बरड आणि वैराण असा तो प्रदेश पण श्री. लक्ष्मीकात तांबोळी हे मराठवाड्यातले. मराठवाड्यातल्या या सगळ्या गोष्टी त्यांनी जवळून अनुभवलेल्या. त्यामुळे वातावरणनिर्मितीला अतिशय सहजता आलेली. कुठेही भाषेचा फुलोरा नाही आणि व्यक्ती कशा जिवत वाटतात ! भक्तिमय श्रद्धा, धुपाचा दरवळ, नामाचा गजर आणि दिव्याचा मद प्रकाश हे वातावरणाचे अविभाज्य घटक.

या वातावरणातच एक बदलता समाज दडला आहे. एक काळ होता. लोकाची श्रद्धा होती देवधर्मावर. त्यामुळे कर्मकाडावर पोट भरणं सहज शक्य होत जमाना बदलला शिक्षण आणि नवविचाराचा वारा समाजाच्या सर्व थराना लागला. देवधर्मात इतका वेळ घालवता येऊ नये, इतकी जीवनाची गती वाढली. लोकाच्या श्रद्धेवर जगण अवघड व्हायला लागल. पण लहान गावामध्ये अजूनही काही घर अशी आहेत की ज्यानी परपरेला कवटाळून स्वत ला जखडून ठेवल आहे. खेडेगावातला, श्रद्धेच्या धाग्यानी बाधला गेलेला समाज आता विकीर्ण झाला आहे. तो बदललेला माणूस शहरात जाऊन उपजीविकेची नवीन साधनं शोधून त्यात रमला. आपण कल्पना करू या, प्रल्हाद मुबईला नसता गेला, आणि त्याच गावात गादी साभाळत राहिला असता तर, त्याचा प्रपच कसा चालला असता ? तेव्हा जे मोडकळीला आलय्, ते पडू देणच इष्ट. लोकाना तरी कुठे गरज उरली आहे अशा गोष्टीची ? त्याच्या गरजा बदलल्या आहेत. गावात, रिक्षा, ट्रान्झिस्टर्स, सिनेमा थिएटर्स सर्व येऊन पोहोचल आहे. त्याना नाचगाण, चमत्कार हवे आहेत एकीकडे श्रद्धेच्या कचाट्यातून सुटू बघणारा समाज बुवाबाजी, भोदूपणा, अधश्रद्धा याच्या चक्रात सापडतो आहे आणि शहरात हे सर्व व्यवस्थित पोसल जातय्. श्रद्धेची केंद्रं आणि स्वरूप बदलल एवढच त्यामुळे खेडी रिकामी होऊन शहर भरलीत !

ही कादबरी वाचून हे सगळे विचार मनात घोंघावतात. या कादंबरीच आणि एक वैशिष्टय म्हणजे सगळ्या व्यक्तिरेखा स्वाभाविक आहेत. एकेक व्यक्ती पीळदार आहे. घराण्यातला एक पुरुष माधवबुवा. वरुडला घराण्याच्या मूळपुरुषाची समाधी आणि कुलदैवत नृसिहाच मदिर होत इतर पुरुषाच्याही समाधी होत्या. माधवबुवा वारी कधी चुकवायचे नाहीत अशी वारी करीत असतानाच ते मरण पावले. अण्णाबुवा हे प्रल्हादचे पणजोबा–माधवबुवाचा मुलगा. अण्णाबुवाचा मुलगा रगाबुवा–म्हणजे प्रल्हादचे आजोबा. अण्णाबुवा रंगेल आणि बाहेरख्याली होते. गावानं, ब्रह्मवृंदानं त्याच्यावर बहिष्कार घातला. रगाबुवाना वडिलाच्या हट्टापायी दोन बायका कराव्या लागल्या. धाकटीनं त्याना विड्यातून विष घातलं. रगाबुवा निपुत्रिक गेले घराण्याला वारस उरला नाही. म्हणून प्रल्हादच्या वडिलाना दत्तक घेतल गेल. प्रल्हाद या घराण्यातला शेवटचा. असा हा घराण्याचा प्रदीर्घ इतिहास. पण लेखकानं प्रत्येक पुरुषाची वैशिष्टय थोडक्यात ठसवून तो सुटसुटीत करून सागितला आहे. इतके पुरुष, इतकी पात्र, पण वाचताना आपणही गोंधळत नाही. हे सगळेच पुरुष काही सत्पुरुष आणि गुणनिधी नव्हते. तरी लोक त्यांना मानत. त्याच्या पायावर डोक ठेवत, त्याची मरल्या नतर मनाण पूजा करत लोकाच्या भावड्या श्रद्धेच हे फार सुरेख चित्रण आहे नाही तरी महतकी आणि रगेलपणा याच नात किती तरी ठिकाणी जवळच असतच की !

या कादबरीत जो वाडा श्री. तांबोळी यानी उभा केला आहे, तो तर अगदी छायाचित्रित केलेला असावा, तसा उभा झालाय् त्यातही बदलत्या समाजाच प्रतिबिब हेलावतय् मूळ पुरुषान पाया न खणता हा वाडा उभा केला. लोक त्याला 'बिनपायाची माडी' म्हणायचे. आता एखाद्या सुदर शिल्पाचे भग्न अवशेष उरावेत तसा तो उरला होता एकेकाळी जेवणावळी झडणारा वाडा आज अन्नाला महाग झाला होता. जुनी पिढी, त्याच्या निष्ठा, त्याची श्रद्धास्थान नामशेष व्हायला लागली. नवी पिढी आली त्याच्या निष्ठा वेगळ्या होत्या. स्पर्धा वाढली त्यात हा वाडा टिकू शकला नाही घरात अडगळ असावी तसा हा वाडा गावची अडगळ झाला ! सतत सात पिढ्या गावावर सत्ता गाजवणारा तो वाडा आता उरला नाही, इतर सामान्य घरासारखच तेही एक घर होतं हा वाडा या कादबरीतलं सर्वात प्रभावी पात्र त्याला स्वतत्र व्यक्तिमत्त्व आहे. वाड्याचा प्रचड दिंडी दरवाजा, भव्य कमानी अजूनही आहेत पण त्यांची भव्यता आणि उची आता फार केविलवाणी वाटतेय् चादणीला लावलेल्या बिल्वरहड्या वाऱ्यान हेलकावे खाताहेत, आणि ती अद्भुत भुयारासारखी वाटणारी लादणी आत कोडलेला कुत्रट वास आणि मिट्ट काळोख, तिथ आता पाकोळ्यानी घर केल होतं. वाड्यातली सगळी अडगळ तिथ पडली होती रथाचा मोडकी चाक, दाड्या, फुटक्या बिल्वरहड्या, मोठमोठे पळे भाडी, पत्रे अशा अनेक निरुपयोगी वस्तू तिथ होत्या. काळानं नाकारलेल्या रिवाजाचे

आणि मागे ठेवलेल्या स्मृतींचे ते अवशेष होते. या सर्व भयाण वातावरणात प्रल्हादचा जीव घाबरा व्हायला लागला. प्रवाहाच्या विरुद्ध पोहूनही तो सुखी नव्हता आणि हा वाडा आणि परंपरा निरंतर टिकवून ठेवण्याचा अट्टाहास करणारा सदाशिवही सुखी नव्हता ! त्यामुळे एक प्रश्न कादंबरी वाचताना सतत भेडसावत राहतो, माणसाचं सुख आणि मन:शांती कशात साठवली आहे? देवधर्म करण्यात की न करण्यात ?

प्रल्हादची पत्नी सुधा आणि सदाशिवची पत्नी वहिनी या दोन स्त्रियांनी कादंबरीतल्या संघर्षाला मूक हातभार लावला आहे. दोघीही श्रद्धावान. फरक इतकाच की प्रल्हादच्या बुद्धिवादात सुधाच्या श्रद्धेची हेटाळणी होते आणि सदाशिवच्या श्रद्धेला वहिनीच्या श्रद्धेची भरीव जोड मिळते. तिच्या श्रद्धेचाही अखेर प्रल्हादला हेवा वाटतो. कारण प्रल्हादचा वाड्यात न राहण्याचा अंतिम निर्णय होतो, तेव्हा वहिनीच्या स्वप्नात मूळ पुरुष येतो आणि नृसिंहाची चांदीची प्रतिमा प्रल्हादला द्यायला सांगतो. प्रल्हादला वाटतं, त्याला काही सांगायचं होतं तर तो आपल्या स्वप्नात का नाही आला ? रंगाबुवांच्या दोन बायका लक्ष्मी आणि धाकटी या दोघींची चित्रणं लेखकानं अशीच आटोपशीर पण ठसठशीत केली आहेत. पतीव्रता लक्ष्मी रंगाबुवांबरोबर सती गेली पण धाकटी त्यांच्या पश्चात 'गुरुमाय' म्हणून मिरवू लागली आणि गादीच्या राजकारणात भांडू लागली. श्रद्धेची ही अशी वेगवेगळी रूपं. त्यांचा दृश्य आविष्कार वेगवेगळा.

माणसाच्या अस्तित्वाभोवती अगणित वर्तुळं असतात. श्रद्धा किंवा अश्रद्धा, नातलग घर, समाज, धर्म अशा अनेक गोष्टींनी हे अस्तित्व वेढलेलं असतं त्यांचा भेद करणाऱ्या व्यक्तीची जी अगतिक तडफड होईल, ती व्यक्त करण्यात लक्ष्मीकांत तांबोळी यशस्वी झाले आहेत.

—आशा कर्दळे

दूर गेलेले घर
लक्ष्मीकांत तांबोळी
प्रतिमा प्रकाशन
पृष्ठे : १३१, मूल्य : २५ रुपये



# शरियतके हुक्मपर

• सुनंदा वर्तक •

महंमदमिया सकाळी उशीरानेच जागा झाला. रात्री त्याला नीट झोप लागली नाही. अंथरूणावर पडल्यानंतर बराच वेळ तो जागाच होता. नंतर त्याला झोप लागली ती अस्वस्थच. त्याला बरीच स्वप्नं पडली. एका स्वप्नात तो तळपत्या उन्हात वैराण प्रदेशातून धावत होता. धावून धावून तो थकला. तोंडाला कोरड पडली. पण कुठेच पाणी दिसत नव्हतं, की विसाव्याचं ठिकाण दिसत नव्हतं. धावल्यामुळे त्याच्या तोंडाला फेस आला, आणि तो तापलेल्या वाळूत कोसळून पडला—

महंमद दचकून जागा झाला. तो त्याच्या घरात बिछान्यावर होता. मध्यरात्र उलटून गेलेली होती. बायकोचा बिछाना रिकामा होता. एकदोन मिनिटातच बायको बिछान्यावर येऊन पडली. पाच मिनिटांच्या आत ती झोपी गेली. पण महंमद जागाच होता. वेगवेगळे विचार त्याच्या मनात येत होते. पहाटे त्याला पुन्हा थोडीशी झोप लागली. तेव्हा आणखी एकदोन स्वप्नं पडून गेली. त्यातलं एकच त्याला आठवत होतं. कुणाला तरी फटक्यांची शिक्षा देण्यात आली होती. तो दुर्दैवी जीव चौथऱ्यावर उघडा होऊन बसला होता. क्रूरपणे सपासप मारले जाणारे फटके विव्हळत, किंचाळत सोसत होता. मध्येच कुणाचा तरी जनाजा चाललेला त्याने पाहिला. बरोबर जाणारे लोक ओळखीचे होते. महंमद हैराण होऊन मागे चालला होता. अचानक तो जागा झाला, तेव्हा घामाने डबडबलेला होता. बायको आणि मुलं शांत झोपली होती. पण महंमद कितीतरी वेळ जागाच होता. सकाळी त्याचा डोळा लागला. तरीही झोप अपुरी झाल्याने त्याला हुशारी वाटत नव्हती. डोळे लाल झाले होते. डोकं ठणकत होतं.

महंमद न्याहारीसाठी येऊन बसला, तेव्हा मुलांची भांडणं आणि आरडाओरड सुरू होती. सईदाने न्याहारी बनवून थाळ्या मांडल्या. मुलांना आणि महंमदला नाश्ता देताना ती एकीकडे मुलांची भांडणं सोडवीत होती. मुलांना शाळेची तयारी करायला सांगत होती. एकीकडे महंमदच्या तब्येतीची चौकशी करत होती.

सईदाचं वय तीस वर्षांपेक्षा नक्कीच जास्त असेल, पाच पोरं झाली. त्यातलं एक गेलं, चार आहेत. पण सईदा कशी रसरशीत, तरीही कोवळी भासते. आताही विस्तवाजवळ काम करून तिचा गोरा चेहरा लालसर झाला होता. त्यामुळे ती जास्तच सुंदर

भासत होती. हरामजादी–अजूनही पंधरा वर्षाच्या पोरीसारखी लचकते–मुरकते–हसते. नखरे करते. तरी बुरखा घेतल्याशिवाय बाहेर पडायला महमदने तिला बंदी केलीय. पण घरी येणाऱ्या–जाणाऱ्याशी खुशाल गप्पा मारते. हसते *त्याचीही बंदी करावी काय* तिला ?

महंमद नाश्ता करीत असताना ती मध्येच बाहेर गेली. संशयाने महंमदने डोकावून पाहिले. याकूब फळवाला आला होता. सईदा फळं घेत होती. तिने लगबगीने फळं घरात आणून ठेवली. पैसे मोजून दिले. हसतमुखाने ती घरात येऊन कामाला लागली.

महंमदच्या मनात संशय अजूनही होताच. ही त्या बुढ्या हुसेनकडून फळ का घेत नाही ? या नौजवान याकूबकडूनच का घेते? आणि सारखी हसते का ? काल रात्री मध्येच उठून कुठे गेली होती ?

महमदने नाश्ता अर्धवट टाकून दिला. कपडे करताना तो सईदावर उगीचच ओरडला· तो दुकानाकडे निघाला, तेव्हा बाहेर उन्ह नुसत रणरणत होतं. त्या उन्हाकडे बघून त्याचं डोकं आणखीनच तापलं.

सईदाने सारी आवराआवर केली. मुलं शाळेत गेली. सईदा आपला कमीज घेऊन कशिदाकाम करत बसली. शेजारची अमीना आली. गप्पा आणि हाताने काम जोरात सुरू झाल. अमिना बसलेली असतानाच फारूक आला. सईदाने त्याला ट्यूबलाईटची दुरुस्ती करण्यासाठी निरोप दिला होता. त्याने दहा मिनिटाच्या आत ठीक करून दिल. अमीनाबरोबरच फारूकलाही सईदाने खायला प्यायला दिलं. फारूक निघून गेला. पाठोपाठ अमीनाही घरी गेली.

दुपारी महमद जेवायला घरी आला. त्याच डोकं अजूनही गरम होत. सईदाने खाना परोसला. जेवता जेवता महमदच लक्ष ट्यूबलाईटकडे गेलं. 'काम हो गया लाइट का ?'

'हा. हो गया. फारूकभाईने कर दिया' तिने उत्तर दिल

महमदच डोकं आणखीच सणकल. मुलं शाळेत गेली असणार. घरामध्ये ही आणि फारूक. नक्कीच ही हरामजादी बदचलन असली पाहिजे. म्हणून इतक्या खुशीमध्ये आहे. *गाल लाल झाले आहेत. डोळ्यामध्ये* चमक आहे...

संशयाने महंमदचा पुरता ताबा घेतला. तो पिसाळला. त्याच्यातला माणूस संपला. आपण काय करतो आहोत, याचं भान त्याला राहिल नाही. ओटयाकडे तो धावला. सईदाचा नाजूक गळा त्याने आपल्या हाताच्या पकडीत धरला. *तिच्या डोळ्यात आश्चर्याचे* भाव उमटले, ती गोंधळली. घाबरली गुदमरली. तडफडली. महमदमधल्या सैतानाची ताकद तिच्यापेक्षा कितीतरी जास्त होती. तो जोर करून आवळत राहिला. तिची हालचाल, तडफड थांबल्यानंतर काही वेळाने त्याने आपले हात बाजूला घेतले.

चार दोन मिनिटं महमद शून्यपणे तसाच उभा राहिला. नंतर त्याच्यातला गुन्ह्याचा कैफ ओसरला तो भानावर आला. त्याने सईदाच्या प्राणहीन देहाकडे पाहिल आणि तो भांबावला. पुरेपूर भेदरला. आपल्या कृत्यामधला भयंकरपणा त्याच्या ध्यानात आला. त्या कृत्याचे भीषण परिणाम त्याच्यापुढे उभे राहिले. प्रखरपणे त्याच्या मेंदूत विचार घुसला, आपण सईदाची जान घेतली. आता आपल्याला फाशी होणार. हाथ के बदले हाथ ! जान के बदले जान !! हा तर आपला कायदा आहे. महंमदचं डोकं चालू लागलं. तो झेपावून सईदाच्या देहाजवळ गेला तिला उठवून त्याने ओटयाजवळ उभ केल. तिचा चेहरा वाकवून गॅसच्या शेगडीवर धरला. त्याने शेगडी पेटवली आणि सईदाचा सुंदर चेहरा जाळावर टेकवला. गोऱ्यापान ताबूस चेहऱ्याभोवती ज्वाळा विखुरल्या. त्वचा, केस जळाल्याची दुर्गंधी सुटली. तिचा देखणा चेहरा विद्रूप, भयाण होऊ लागला. हळूहळू मांस जळू लागल, महमद मागेच उभा होता– तिच्या अचेतन देहाला धरून. त्याला उसासे येऊ लागले. घाम फुटला. आणखी काही वेळाने महमदने गॅसच बटण बंद केल. दार उघडून तो आक्रोश करीत धावत सुटला. आजूबाजूच्या घराची दारं उघडली लोक आपआपल्या दरवाज्यामध्ये उभे राहून बघू लागले प्रथम अमीना आणि तिच्या घरातले लोक पुढे झाले. मागोमाग आणखीही माणस आली. महमद छाती पिटून लोळण घेऊ लागला. एक दोघानी महमदला धरून घरात आणल महमदच्या रडण्या-ओरडण्यावरून लोकाना साधारण अंदाज आलाच होता. अमीना धावतच स्वयपाकघरात गेली. ओटयाशी उभा असलेला सईदाचा देह गॅसच्या शेगडीवर कलंडला होता. जवळजवळ गळयापर्यंत संपूर्ण चेहरा जळून कोळसा झाला होता. अमीना ओक्साबोक्शी रडायला लागली.

कुणीतरी फोन केला, तेव्हा एका तासाने पोलीस आले. कॉन्स्टेबल रशीद आणि हेड-कॉन्स्टेबल मन्सूर. पोलिसाना बघितल्यावर महमदचा उमाळा वाढला तो स्वत.साठी रडू लागला. रडत रडत सागू लागला, 'खाना खाकर मैं आराम कर रहा था. जरासी नींद लगी थी. बहुतही बदबू आने लगी, इसलिए उसको पुकारा उसने जबाब नही दिया... मैं उठकर उसे बुलाने गया, तो ये देखा... दौडके गया गॅस बंद किया. उसके चेहरे की तरफ देखा, तो मुझसे देखा न गया...मेरे बच्चोपर आसमान टूट पडा... उसको कभी कभी बेहोश होने की बीमारी थी... बेवक्त बेहोश हो जाती थी... उसी के वजहसे ये हो गया...हाय–हाय...'

तेवढयात मुलं शाळेतून आली. स्फुंदत महमदला बिलगली. एकूण देखावा अतिशय करुण दिसू लागला. आणखी आणखी लोक येत होते. कुजबुजत होते. बायका हळहळत होत्या. अमीना अजूनही रडतच होती सईदाची मुलं मुसमुसत होती. सईदाचा देह अजून होता तसाच आणि तिथेच होता. डॉक्टर आणि इन्स्पेक्टर येण्याची वाट पोलीस बघत होते.

बऱ्याच वेळानंतर पोलीस गाडी येऊन थांबली. इन्स्पेक्टर अस्लम खान आणि डॉक्टर त्यातून उतरले आधी आलेल्या पोलिसानी सलाम ठोकले. अदबीने– काय घडल असाव, ते– पोलीस सागू लागले महमदचा चेहरा अधिकच दीनवाणा झाला मुले जास्तच भेदरली आणि जोरात रडू लागली. भेदक नजरेचा इन्स्पेक्टर अस्लमखान घरात आला इन्स्पेक्टरने नुसती महमदकडे नजर टाकली. त्याबरोबर महमद अडखळत मघाचीच कहाणी पुन्हा सागू लागला. डॉक्टरने आणि इन्स्पेक्टरने शब्दही न उच्चारता त्याच सागण ऐकून घेतल. नतर ते दोघे स्वयपाकघराकडे गेले

अस्लम खानने बारकाईने सईदाचा मृतदेह *न्याहाळला जळून काळा ठिक्कर* पडलेला तो चेहरा बघून तो पोलिसी व्यवसायातला

माणूसही हेलावून गेला. अस्लम खान बाजूला झाल्यानंतर डॉक्टरने मृतदेह उचलून पोस्ट-मार्टेमसाठी नेण्याचा हुकूम दिला.

अस्लमखानने सगळ घर हिंडून पाहिल. बारकाईने निरीक्षण केलं. बाहेर पडताना महमदच्या खांद्यावर सांत्वनपर थोपटून तो बाहेर पडला.

पाच–सहा दिवस निघून गेले. महंमदची बूढी अम्मी आली होती. पण पोरं अजूनही केविलवाणी वाटत होती. महमदची मनःस्थिती ठीक नव्हतीच. अजूनही त्याला तशीच वेडीवाकडी स्वप्नं पडत असत. एकदा मध्यरात्रीनंतर जाग आली की पुन्हा झोप लागणं मुष्कील व्हायच. तो सारखा सैरभैर झालेला असायचा. वाऱ्याने पडदा फडफडला की सईदाची ओढणी लहरतेय, असं त्याला वाटायचं. झुबर हळूच किणकिणलं की, सईदा हसल्याचा भास व्हायचा आणि त्याचं काळीज थरकायच त्याची अवस्था कोणाला कळायचीही नाही. अम्मीने तास दोन तास दु:ख झाल्याचा आव आणला. नंतर ती महंमदच्या दुसऱ्या शादीच्या ख्वाबमध्ये मश्गुल होऊन गेली. आखिर औरत की मौत पर कितने दिन दुख मनाते बैठे। औरतकी इतनी कीमत हरगीज नही होती है –

एक दिवस महंमदला पोलीस स्टेशनवरून बोलावण आल. महमद गेला. त्याला एका बाकावर बसायला सांगण्यात आलं. पुढे कोणीच त्याच्याकडे लक्ष दिलं नाही. किती तरी वेळ निघून गेला. महमदने आपल्याला कशासाठी बोलावलं, याची चौकशी करण्याचा प्रयत्न केला पण कुणीही त्याला धड उत्तर दिलं नाही. महमद चांगलाच घाबरला. तासामागून तास निघून गेले त्यानंतर केव्हा तरी त्याला आतल्या खोलीत बोलावल गेलं. टेबलाजवळच्या खुर्चीवर इन्स्पेक्टर अस्लमखान बसलेला होता त्याने महंमदकडे रोखून पाहिल महंमदने नजर खाली झुकवली. त्याचे हातपाय कापू लागले. फत्तरासारख्या कठीण आवाजात अस्लमखान बोलला,

'हमने सब तलाश की है। अल्ला का नाम लेकर असलियत बोल दे–'

महंमद रडूभेकू लागला. शपथा घेऊ लागला. अस्लमखानने थंडपणे कॉन्स्टेबलला हुकूम सोडला. 'रशीद, इसे जरा सीधा कर दे–'

काही मिनिटांतच महमदचा कबुलीजबाब मिळाला.

महंमदच्या घरी हलकल्लोळ उडाला. त्याची अम्मी तर ऊर बडवून शोक करू लागली. पोलिसाना दुषणे देऊ लागली. मेलेल्या सईदाला शिव्या घालू लागली. 'नाचीजको गला घोंटकर मारा भी तो क्या हुआ, बदचलन थी ही, इसी लिये मेरे बेटेने उसको मार दिया– अब मेरे महमदको कैसे छुडाऊ ? ये मासूम बच्चे अब किसका मूह देखेंगे ?

शेजारच्या अमीनाला मात्र दुःखातही समाधान वाटले. सईदाला बेवक्त बेहोश होनेकी बीमारी होती, यावर तिने कधीच विश्वास ठेवला नाही.

काही दिवसानी केस उभी राहिली. इन्स्पेक्टर अस्लमखानने मेहनत घेऊन पुरावा उभा केला. अमीनाची साक्ष झाली. सईदाला बेहोशीचे झटके आल्याचे आपण कधीही पाहिले नसल्याचे तिने सागितले इन्स्पेक्टरने महमदच्या जबाबातली विसंगती दाखवून दिली. आपण जेवून आराम करीत असताना सईदा बेहोष होऊन गॅसच्या शेगडीवर पडली असल्याच महमदने सागितल होतं. पण सईदा मेली, तेव्हा महमद जेवत असला पाहिजे कारण अर्धवट जेवलेली थाळी तशीच पडली होती. जर महमद जेवत होता, तर तो सईदाला वाचवायला लवकर धावला का नाही ? तिचा चेहरा, मान जळून जाईपर्यंत तो का थांबला ? महमदचा बिछाना अगदी व्यवस्थित होता. त्यावर सुरकुतीही नव्हती. महंमद बिछान्यावर काही वेळ झोपून नंतर सईदाला बघायला नक्कीच गेलेला नव्हता. सर्वात महत्त्वाचा पुरावा म्हणजे डॉक्टरचा रिपोर्ट सईदाचा गळा दाबल्याची चिन्हे स्पष्टपणे दिसत होती. त्यामुळे तिला मृत्यू आला असल्याचे डॉक्टरने निःसंदिग्धपणे लिहून दिले होते घरात महंमदशिवाय दुसरं कुणीही नव्हतं तेव्हा महंमदशिवाय दुसरी कुणी व्यक्ती सईदाचा खून करणंही शक्य नव्हत खून महंमदनेच केला असला पाहिजे, हे पुराव्यानुसार सिद्ध होत असल्याचं प्रतिपादन अस्लमखानने केल.

महंमदला कबूल करण्यावाचून गत्यंतर नव्हत. महंमदवर सईदाचा खून केल्याचा गुन्हा शाबीत झाला. इस्लामी न्यायालयाच्या कायद्यानुसार महंमदला फाशीची शिक्षा फर्मावण्यात आली.

महमद कोठडीत कोंडला गेला. सईदाची शेवटची नजर त्याचा सदोदित पाठलाग करीत राहिली. तिच्या गोऱ्यापान गळ्याभोवती त्याने हाताची पकड निष्ठुरपणे आवळली होती. आता फाशीचा दोर त्यालाही त्याच निष्ठुरपणे मृत्यूचं दार उघडून देणार होता. मेल्यानंतरही सईदा महमदला सजा देणार होती.

महमदच्या अम्मीचा एक नातेवाईक इमाम होता. मेहंदी लावून त्याची पांढरी दाढी लाल झाली होती. अंग सुरकुत्यांनी भरलं होतं. पण बारीक डोळ्यात धूर्तपणा, कावेबाजपणा होता. त्याच्याकडे अम्मीने धाव घेतली. टाहो फोडला. महमदसाठी काही तरी करण्याची गळ घातली इमामसाहेबानी दाढी खाजवून बराच वेळ विचार केला आणि अक्सीर इलाज शोधून काढला. अम्मीचा चेहरा उजळला.

अल–ऐन–शरिया न्यायालयात महंमदची केस पुन्हा विचारात घेण्यात आली. भव्य कमानी असलेल्या विस्तीर्ण न्यायालयात इन्स्पेक्टर खानही एक प्रेक्षक म्हणून हजर राहिला होता. वृद्ध दाढीधारी न्यायाधीश येऊन आसनावर बसले महंमदच्या केसची पुन्हा एकदा संपूर्ण सुनावणी झाली. सजा–ए–मौतचा उच्चार झाला. पुढे सगळंच वेगळं घडलं. महमदचा तेरा वर्षे वयाचा थोरला मुलगा पुढे आणला गेला. मुलाने न्यायालयाला आपल्या बापाला सोडविण्याची विनंती केली बुजुर्ग न्यायाधीशानी कायद्यातील तरतूद सांगितली. मुलाने–सईदा आणि महमदच्या वारसाने– इस्लामी कायद्यातील तरतुदीप्रमाणे आईच्या मृत्यूबद्दल बापाला क्षमा केली. महंमद मुक्त झाला.

सगळ काही कायद्याला धरून झालं. सईदा हकनाक मारली गेली. तरीही महमद मुक्त झाला. कोणत्याही शिक्षेपासून सुटला. अम्मीच्या चर्येवर हसू पसरल. तिने अल्लाची दुवा मागितली.

हात पसरून बापासाठी क्षमायाचना करणारा आणि स्वतःच क्षमा करणारा मुलगा भावावून गेला. बुढ्या इमामच्या बेरकी डोळ्यात खुशी लुकलुकली अमीनाला हे कळले, तेव्हा तिच्या डोळ्यात पाणी आले.

इन्स्पेक्टर अस्लमखान उदास झाला. स्वतंत्र विचाराच्या, न्याय या कल्पनेवर विश्वास ठेवणाऱ्या अस्लमखानला हा फैसला मानवला नाही. गुन्हेगाराला सजा मिळालीच पाहिजे, असा त्याचा आग्रह होता. स्त्रीला न्याय मिळण्यात आपल्या देशात नेहमीच कुचराई होते, असं मोकळेपणाने विचार करणाऱ्या अस्लमला वाटत होत. तो सहृदय होता. सईदासाठी त्याला अनुकंपा वाटत होती. न्याय हा साऱ्यासाठी समान असावा, असं अस्लमखानला वाटत होतं.

पण इस्लामी कायद्याविरुद्ध शब्द उच्चारण्याची त्याची ताकद नव्हती. शरियत न्यायालयाच्या निकालाला आव्हान देण्याचा विचार तो कल्पनेतही आणू शकत नव्हता.

महमद मोकळा होऊन घराकडे निघाला होता. □

## सांस्कृतिक डोंबिवली

पृष्ठ ७ वरून

नसतानाही प्रा. मनोहर ह्यानी 'श्री. इनामदाराच्या वयाकडे पाहून येण्याचे कबूल केले' प्रा. मनोहर ह्यानी काव्यसग्रहाचे प्रकाशन केले.

असे प्रकाशन समारंभ हे उत्सवी आणि उत्साह वाढविण्यासाठी असतात. अशा प्रसगी पुस्तकाच्या गुणदोषाची चिकित्सा करावयाची नसते हे प्रा. मनोहर ह्याना पुरते ठावे आहे. त्यानी श्री. इनामदार ह्याच्या 'गौतमबुद्ध' ह्या एकशे अकरा श्लोकाचे (म्हणजेच ४४४ ओळी) आख्यानकाव्य, चरितकाव्य लक्षात घेऊन, त्या रचनेचा पडिती घाट आणि बाज पाहून आपले सारे विवेचन त्या दृष्टीनेच केले. पंडिती काव्य आणि प्रा. मनोहर ह्याच्यासारखा वक्ता असा संगम झाल्यानतर श्रोत्यांना पंडिती काव्यावरचे एक रसाळ, माहितीपूर्ण आणि अधिकारवाणीने भरलेले व्याख्यान ऐकावयास मिळाले नसते तरच नवल ? त्यानी इग्रजीतील आणि प्राचीन व अर्वाचीन मराठीतील पंडिती काव्यांचा सोदाहरण परिचय करून दिला. त्याची अफाट स्मरणशक्ती, अवतरणक्षमता आणि विवेचक दृष्टी आता मराठी वाचक–श्रोत्याच्या परिचयाची झाली आहे. ज्या वामन पडितापासून प्राचीन मराठीतील पंडिती काव्याला सुरुवात झाली, त्यांच्या रचनावैशिष्ट्याचा सोदाहरण परिचय त्यानी करून दिला. एकदा श्लोकरचना, अक्षरगणवृत्त स्वीकारले की अपरिहार्यपणे काही गुण येतात तसे दोषही येतात. श्रुतिमधुरता हा गुण तर क्लिष्टता हा दोष येणे सहज शक्य आहे, हे त्यानी सागितले. अर्थात हे विवेचन करताना 'गौतमबुद्ध' ह्या श्री. इनामदाराच्या काव्याचाही परामर्श घेतला गेला, हे जाणकाराच्या लक्षात आले असावे. त्याचप्रमाणे अशा तऱ्हेच्या रचनेकडे कोणत्या अपेक्षेने, दृष्टीने पहावे ह्याचेही मार्गदर्शन त्याच्या व्याख्यानातून झाले. जमलेल्या निवडक पण जाणकार ( उदा. कविवर्य द. भा धामणस्कर, अशोक बागवे, इ. ) श्रोत्यानी ह्या व्याख्यानाला मनापासून दाद दिली असावी असे वाटते

श्री. ह रा. इनामदाराची काव्यभक्ती पाहिली, धडपड पाहिली की जुन्या पिढीतील रावसाहेब र. लु. जोशी या दीर्घकाल शारदेची उपासना करणाऱ्या काव्यभक्ताची आठवण आल्याशिवाय रहात नाही. हरीच्या भक्तीला पावला तो शंभूनाथ. श्री. शभूनाथ कहाळेकर ह्यानी आपल्या 'कविता प्रकाशन' तर्फे हे छोटेखानी पुस्तक प्रकाशित केले. ह्या संग्रहाला डॉ. प्रा. गो. पं. कुलकर्णी (प्रस्तावना, समीक्षा म्हटल्यानतर एखादे कुलकर्णीच हवेत. त्याना हे काम आवडतेही आणि सहजगत्या साधतेही ) ह्याची रसोद्ग्राही, विवेचक अशी पण कवीला जरा झुकते माप देणारी प्रस्तावना आहे.

असा हा पुस्तक प्रकाशन सोहळा प्रा. मनोहर ह्याच्या व्याख्यानामुळे आणि श्री. इनामदार ह्याच्या अकृत्रिम सौजन्यामुळे आणि आतिथ्यामुळे उपस्थितांच्या स्मरणात राहील

### □ कविता उमगते अशी

ज्याना काव्यात रस आहे असा कोणीही, दुसऱ्या समानधर्म्याला डोंबिवलीत कवी आहेत तरी किती असा प्रश्न विचारीत नाहीत. कारण हे विचारणारेच खुद्द कवी असण्याची जास्त शक्यता आहे. फार पूर्वीपासून डोंबिवली ही 'प्रेमनगरी' आहे असे अनेकाच्या–गावातील आणि गावाबाहेरील–तोंडून ऐकले आहे आज जर मला डोंबिवलीचे वर्णन करावयास सागितले तर मी तिचे वर्णन 'कवीनगरी' असेच करीन. नगरसेवक म्हणविणाऱ्यांनी, दीर्घकाळ नगरपालिकेत भुजंगासारखे ठाण माडून बसणाऱ्यानी डोंबिवलीचे डासीवलीत (डासेनगरीत) रूपातर केले आहे हा भाग वेगळा. काव्य आणि प्रेम ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. प्रेमात पडणे आणि काव्य करू लागणे ह्यात नेमकी कोणती गोष्ट प्रथम जन्माला येते हे सागणारा ज्योतिषी अजून जन्मालाच आलेला नाही पूर्वी असेही ऐकू येत असे की सिंह आणि कवी हे कळप करून राहणारे प्राणी नाहीत. पण हल्लीचे कवी सर्वच बाबतीत बदलू लागले आहेत. ते माणसाळू लागले आहेत असे म्हटले तर ही मडळी रागावणार नाहीत असे वाटते.

इ. स. १९६६ सालापासून काव्यरसिक मडळ स्थापून ही कवितांप्रेमी मंडळी एकत्र आली दर महिन्याच्या एका रविवारी एकेका सभासदाच्या घरी जमू लागली आपली नवी कोरी कविता ऐकविण्यासाठी आणि इतराची कविता ऐकण्यासाठी गर्दी करू लागली. धोक्याचे सोळावे वरीस टळून गेले आहे ही सस्था कामिनी आता ऐन पणात, वयात आली आहे. तिचा त्रिसावा वाढदिवस साजरा झाला आहे वार्षिक स्नेहसमेलनप्रसगी फक्त कवीलाच अध्यक्ष म्हणून बोलवावयाचे ही प्रतिज्ञा पहिला मान पटकाविला (कै.) श्री. सोपानदेव चौधरी ह्यानी. त्यानतर अनिल, अनत काणेकर, शंकर वैद्य, शाता शेळके, नारायण सुर्वे, केशव मेश्राम, व. आ डहाके, प्रभा गणोरकर इ अनेक नवे जुने ख्यातनाम कवी आत्तापर्यंत हजेरी लावून गेले आहेत. ह्या मडळाने आपल्या सभासदाच्या कवितांचे दोन सग्रहही 'तारागण' आणि 'मोकळे श्वास' ह्या नावाने प्रसिद्ध केले आहेत त्याशिवाय ह्या मडळाचे सदस्य असणारे श्री द. भा. धामणस्कर, सौ. अनुराधा साळवेकर, सौ. सुलोचना घोटीकर, श्री. ह. रा. इनामदार यानी आपले काव्यसग्रहही प्रसिद्ध केले आहेत. अशा ह्या मडळाचे वार्षिक स्नेहसमेलन ही कवीना आणि रसिकाना एक पर्वणीच असते.

शनिवारी रात्री सभासद कवीचे आणि अध्यक्ष असणाऱ्या कविवर्यांचे काव्यवाचन, काव्यगायन मध्यरात्र उलटली तरीही चालते ह्या वर्षीच्या कविसमेलनाचे संचालन व्यवसायाने इजिनियर असणाऱ्या तरुण कवीच्या,

श्री प्रसाद साळवेकराच्या हातात होते. ते काम त्यानी कुशलतेने केले, असाच निर्वाळा साऱ्यांनी दिला. ह्या संमेलनात सुमारे चाळीस कवींनी आपल्या कविता श्रोत्यासमोर ठेवल्या आणि सर्वात शेवटी प्रा. निकुंब ह्यानी आपल्या विविध अनुभवाच्या कविता वाचून दाखविल्या. मध्यरात्र उलटून गेली तरी हा काव्यसागर उत्साहाने चालूच राहिला

दुसऱ्या दिवशी सकाळी नुकत्याच दिवगत झालेल्या पण ज्याचे स्मरण दीर्घकाळ राहील अशा कविश्रेष्ठ यशवतांना काव्यदर्शनाच्या रूपाने श्रद्धाजली अर्पण केली गेली. अनेक यशवतप्रेमी कवींनी त्याच्या विविध भाववृत्तींच्या कविता गाऊन वा वाचून दाखविल्या. गेली अनेक वर्षे यशवंताची 'आई' ही कविता आईवेड्या, आईवेगळ्या हळव्या श्रोत्यांना हेलावून सोडते. आजही तसेच झाले होते. श्री. गजाननराव पिंगळे ह्यानी आपल्या परिणामकारक शैलीने वाचून अनेकाच्या डोळ्यात पाणी आणले ह्या यशवंत काव्यदर्शनाचे सचालन सौ. मालती देसाई ह्यानी यशस्वीपणे केले. त्यासाठी त्यानी पेललेली मेहनत स्पष्टपणे जाणवत होती. नतरचा कार्यक्रम होता 'कविता उमगते अशी'. नव्याजुन्या कवींची कविता आपल्याला कशी समजत जाते, कळत जाते, उलगडत जाते, ह्याचे स्वानुभवकथन, दर्शन अनेकानी घडविले ज्ञानेश्वर, केशवसुत, बोरकर, मर्ढेकर इ अनेक कवींच्या काव्यसौदर्याचे, कल्पनाचे, शब्दकलेचे आकलन आपल्याला कसे होत गेले, हे सोदाहरण दाखवून दिले. प्रा. निकुंबानीसुद्धा त्यात भाग घेतला. श्री. धामणस्कर ह्यानी ह्या कार्यक्रमाचे नेटके सचालन केले. ह्या दोन दिवस चाललेल्या काव्यवाचन काव्यविवेचन यज्ञात अनेकानी आपल्या समिधा टाकल्या. अनेकवेळा असे आढळून येते की, अशा तऱ्हेच्या साहित्यिक कार्यक्रमात तरुणपिढीचा सहभाग कमी असतो. ह्या मडळाचे सभासद विविध वयोगटाचे आहेत आणि ते उत्साहाने भागही घेतात. ज्यांना 'यंग मॅन–लेडी यू वील गो टू फार' म्हणावे असेही आहेत. त्यात प्रवीण दामलेचा समावेश करायला हरकत नाही. काही व्यवसाय फक्त पुरुषाचे समजले जातात. डोंबिवलीत त्यात बदल होत आहे. कार्यक्रमाचे क्षण टिपण्याचे, अमर करण्याचे कार्य छायाचित्रकार करीत असतात. आपले शिक्षण सांभाळून हे काम करणारी कु. वर्षा दामले *उद्या आघाडीवरची छायाचित्रकार होईल,* असे तिच्या आजच्या वाटचालीवरून वाटते आहे.

रविवारी संध्याकाळी संमेलनाध्यक्ष प्रा. निकुंब ह्याचे 'गोविंदाग्रज. कवितेच्या तीन परी' ह्या विषयावर भाषण झाले होते. त्यांनी आपल्या विवेचनात गोविंदाग्रजाच्या कवितेचे, काव्यातील गुणदोषानुसार आणि वाचकानी त्या कवितांना दिलेल्या प्रतिसादानुसार तीन प्रकारे केले. त्यानी अतिलक्षित लक्षणीय आणि अलक्षित कवितेची सोदाहरण मीमांसा केली. गोविंदाग्रजाच्या कवितांचा असा विचार करून श्रोत्यांना एक वेगळा विचार दिला. अशा तऱ्हेने मडळाचे हे संमेलन लक्षात राहील असेच झाले. मडळाच्या परंदरेनुसार जुन्या अध्यक्षाना, श्री. शशिकात पाळंदे याना निरोप दिला आणि नव्या अध्यक्षाची श्री. म. श. खानवेलकराची आणि इतर पदाधिकाऱ्याची निवड केली. हे संमेलन यशस्वी करण्यासाठी कमलाकर राऊत, शरद शुक्ल, राम अत्रे इ. सभासद झटले. पुढीलवर्षी नव्या कार्यक्रमाची आखणी आणि अंमलबजावणी पूर्वीसारखीच, परंपरेला धरून होईल असा विश्वास वाटतो.

¤

आजच्या डोंबिवलीचे सस्थाजीवन आणि सास्कृतिक विश्व बहरलेले दिसत आहे. ह्या नव्या सास्कृतिक नगरीची पायाभरणी ज्या अनेकानी केली त्यात श्री. मोहनराव प्रधान ह्याचा वाटा मोठा होता सयुक्त महाराष्ट्र प्रचार परिषद, मुंबई-उपनगर मराठी साहित्यसंमेलन, व्याख्यानमाला, नाट्यमहोत्सव, नाट्यस्पर्धा इ. कार्यक्रम आखण्यात, यशस्वी करण्यात त्यांचा मोठा हातभार होता. 'लोकसेवा मडळ' सारखी सस्था स्थापन करण्यात त्याचा पुढाकार होता जुन्या कॉंग्रेसचे, महात्मा गाधींचे ते निष्ठावान खादीधारी भक्त होते. स्वातत्र्यप्राप्तीसाठी झालेल्या चळवळीत त्याचा सक्रिय सहभाग होता त्याचे नुकतेच वयाच्या ७६ व्या वर्षी निधन झाले डोंबिवलीच्या सास्कृतिक जीवनाचा कर्णधार आणि शिल्पकार हरपला.

—चंद्रशेखर राजे

## रंगभूमी

# दामू केंकरे यांचे प्रकट नाट्यचिंतन

वि. भा. देशपांडे

रंगभूमीच्या क्षेत्रात कार्य करणारी कलावत मंडळी मुलाखतीच्या, व्याख्यानाच्या स्वरूपात अनेकदा बोलताना आपण ऐकतो. त्यातली अनेक मडळी मूळ घडले त्यापेक्षा अधिकही बोलत असतात, स्वत.ची कलाप्रतिमा जितकी उजळ करता येईल तितकी करीत असतात. पण अशीही काही कलावत मंडळी आहेत की जी सहसा जाहीरपणाने स्वत विषयी फारसे बोलत नाहीत. अशा अनुत्सुक मडळीमध्ये दामू केंकरे हे एक आहेत. आपण केलेल्या दिग्दर्शनाविषयी किंवा प्रयोगनिर्मितीविषयी ते जाहीरपणाने फार क्वचितच बोलतात. एकूणच त्याना जाहीर बोलण्याचा कटाळा पहिल्यापासूनच आहे. त्यात स्वत विषयी तर जास्तच !

तरीही २३ तारखेच्या रविवारी केंकरे स्वत. दिग्दर्शित केलेल्या काही नाट्यनिर्मितींविषयी सूत्रबद्ध रीतीने बोलले आणि त्यावर झालेल्या प्रश्नाना त्यानी विस्ताराने उत्तरेही दिली. तसे पाहिले तर तीस वर्षांहून अधिक काळ केंकरे रगभूमीच्या क्षेत्रात आहेत. दिग्दर्शन, अभिनय आणि नेपथ्य, प्रकाश आदी विभागात लक्षवेधी स्वरूपाची कामगिरी करीत आहेत. भारतीय विद्याभवनने आरभित केलेल्या एकाकिका स्पर्धांपासून आज रगभूमीवर जोरदार प्रयोग होत असलेल्या 'कार्टी प्रेमात पडली' नाटकापर्यंत. अर्थात या सगळ्याच प्रयोगनिर्मितीसबंधी ते बोलले नाहीत, वेळेच्या हिशेबात ते शक्यही नव्हते. म्हणून काही निवडक निर्मितीसबंधी त्यानी विचार माडले.

या भाषणात स्थूल मानाने दोन भाग होते. एक तर हौशी-प्रायोगिक स्तरावर केलेल्या नाटकाचा आणि दुसरा व्यावसायिक स्तरावर केलेल्या नाटकाचा पहिल्या भागात तीन निर्मितीचा विचार व्यक्त झाला.

गंगाधर गाडगीळ यांनी लिहिलेल्या एकांकिका 'रहस्य आणि तरुणी', 'दोन शून्य आणि दोन' यातूनच 'वेड्याचा चौकोन' हे नाटकही लिहिले गेले. हे प्रयोग केंकऱ्यांनी महाविद्यालयी स्तरावरच्या स्पर्धेत केले. इथे एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे की, ज्या काळात मराठी कथेत–कवितेत काही नवीन प्रयोग घडत होते, त्या काळात आणि त्यातल्याच एका महत्त्वाच्या कथालेखकाने नाटकाच्या क्षेत्रातही आपली लेखणी प्रयोगरूपात वापरलेली होती. पण केंकरे हे त्यावेळी रंगभूमीच्या प्राथमिक स्तरावरच्या शोधात होते. त्यातून त्यांनी जी महत्त्वाची प्रायोगिक नाटके केली आणि ज्याच्या त्यांनी व्याख्यानात आवर्जून उल्लेख केला त्यामध्ये विजय तेंडुलकराचे 'गृहस्थ' हे नाटक आणि दुसरे 'माणूस नावाचे बेट'. याच 'गृहस्थ'चे पुढे रंगायनने 'कावळ्याची शाळा' नावाने प्रयोग केले. एकूणच प्रायोगिक नाटकाच्या संदर्भात 'माणूस नावाचे बेट'चे महत्त्व विशेष मानले जाते. तेंडुलकराच्या नाट्यलेखनातही त्याचे लक्षवेधीपण आहेच ही दोन्ही नाटके दामूने केली याचा एक अर्थ असा होतो की, तेंडुलकराचे पहिले, नव्हाळीचे लेखन दिग्दर्शित करण्याची संधी त्यांना लाभली. दिग्दर्शक म्हणून स्थिर व्हायला मदत झाली.

या प्रायोगिक नाटकाच्या निर्मितीबाबत बोलताना केंकऱ्यांनी दोन गोष्टी तत्त्वतः सांगितल्या, त्या दर्शनी जरी साध्या वाटल्या तरी विचार करणीय अशाच होत्या. एक म्हणजे ज्या काळात केंकरे आदी मंडळींनी प्रयोग केले तेव्हा प्रायोगिक असा शब्दही नव्हता आणि तशा प्रकारची विशिष्ट आग्रही भूमिकाही नव्हती. दुसरे म्हणजे आपण जे काही करतो आहोत ते किती थोर आहे याचा काहीच अंदाज नव्हता, तो एक शोध होता. अशा शोधातून जे काही केले जाते, त्याचे बरेवाईट परिणाम दहा–पंधरा वर्षांनंतर दिसायला लागतात. तसे ते नंतर दिसलेही !

व्यावसायिक नाट्यनिर्मितीच्या संदर्भात बोलताना जयवंत दळवीचे 'सभ्य गृहस्थ हो', वसंत कानेटकराचे 'अखेरचा सवाल' आणि मनोहर काटदरे याचे 'आपलं बुवा असं आहे' या तीन नाट्यप्रयोगाचा आवश्यक तो तपशील त्यांनी सांगितला. 'सभ्य गृहस्थ हो'च्या वेळी दळवीचेच 'सध्याछाया' दिग्दर्शित करण्यासंबधी दामूला विचारण्यात आले होते, पण ते त्यांनी स्वीकारले नाही. याचे मागचे सांगितलेले कारण महत्त्वाचे होते ते असे म्हणाले की, 'सध्याछाया' हे नाटक प्राधान्याने नटांचे–अभिनेत्याचे आहे, त्यामध्ये दिग्दर्शकाला आव्हान कमी आहे. या उलट 'सभ्य गृहस्थ हो'चे प्रयोग मोठ्या प्रमाणात होणार नाहीत हे माहीत असूनही स्वीकारले कारण त्यामध्ये दिग्दर्शक म्हणून आव्हान अधिक होते, तो एक 'एक्सरसाईज' होता. हे विधान किंवा त्यामागचा दृष्टिकोन ऐकल्यावर असे जाणवले की, असा विचार करणारे दिग्दर्शक आणि त्यातही व्यावसायिक क्षेत्रात किती आहेत ?

'हॅम्लेट' हा तर दामू केंकरे याच्या कलाजीवनातला अर्थपूर्ण मानबिंदू आहे, महत्त्वाचा टप्पा आहे. त्यावर अर्थातच विस्ताराने बोलणे झाले. हॅम्लेट करण्याची इच्छा झाल्यावर नटवर्य नानासाहेब फाटक यांच्याशी झालेला संवाद, त्यांनी दाखवलेला निरुत्साह, त्यातून पु. ल. देशपांडे यांच्या मध्यस्थीने नाना जोगानी दिलेली हॅम्लेटची संहिता, जिद्दीने केलेली नाट्यनिर्मिती हा साराच तपशील दामूच्या तोंडूनच सविस्तर ऐकण्याजोगा आहे. या नाटकाच्या निर्मितीप्रक्रियेत अभिनयापेक्षा दिग्दर्शनात आपल्याला अधिक रस होता, पण हॅम्लेटच्या भूमिकेसाठी बारा कलाकाराची परीक्षा घेऊनही समाधान होईना, तेव्हा अपरिहार्यपणाने ती भूमिका करावी लागली. ती करतानाही आपल्या आवाजाची जात, पल्ला किती आणि कसा आहे, याच्या मर्यादाची जाण होतीच. तो सारा तपशील ऐकताना मला वाटून गेले की, सामान्यतः मोठा गद्य नट आयुष्याच्या उत्तरार्धात किंवा उतार वयाकडे झुकायला लागल्यावर (अभिनयाची परिपक्वता आली आहे असे गृहीत धरून) हॅम्लेटचे आव्हान स्वीकारतो. पण दामूच्या बाबतीत उलटे घडले, आयुष्याच्या तरुणपणात त्याने हॅम्लेट करण्याचा निश्चय केला, आणि तो स्मरणीय ठरला.

निरनिराळ्या कारणानी दामूला अभिनय करण्यापेक्षा दिग्दर्शन करणे अधिकतेने पसंत आहे नाट्यसंहितेच्या आधारे दिग्दर्शक जे दृश्यरूप पाहतो, ते प्रयोगाच्या हिशोबात महत्त्वाचे असते, पर्यायाने नाट्यप्रयोगाच्या निर्मितीत दिग्दर्शक केवळ महत्त्वाचा नसतो तर तो नवनिर्मित करण्याचा प्रयत्न करतो, अशा मुद्यांवर भर विशेष होता. दिग्दर्शनाच्या अनुषंगाने नेपथ्याची, रंगमंचीय दृश्यरूपाची, प्रयोग परिणामांची अन्य प्रयोगक्षम कलाची विषयाच्या अनुषंगाने चर्चा झाली.

खरे तर दीड–दोन तास केंकरे स्वतः दिग्दर्शित केलेल्या नाट्यप्रयोगाविषयी विस्ताराने बोलले हीच एक रंगभूमीमध्ये महत्त्वाची घटना ठरावी ! या सगळ्याला निमित्त होते कै. नारायण काळे यांचा स्मृतिदिन. महाराष्ट्रीय कलोपासकांच्यावतीने आयोजित केलेला हा कार्यक्रम काळे याच्या चिंतनशील, विचारप्रवण अशा वृत्तीला साजेलसा असा झाला.

¤

## वेगळा नाट्यप्रयोग

दोन महिन्यापूर्वी लंडन येथील डेव्हिड ग्रीव्हज यानी एक नाट्यप्रशिक्षण शिबिर घेतलेले होते. त्यातल्या काहींना आणि काही नवीन कलाकाराना घेऊन डेव्हिड हे एक अगदी वेगळा नाट्यप्रयोग ८ आणि ९ मार्चला सायंकाळी टिळक स्मारक मंदिरात करणार आहेत. नाटकाचे नाव आहे– 'द सिटी ऑफ द सेवन डेडली सिन्स.' हा प्रयोग नेहमीच्या पद्धतीने न होता नृत्य, नाट्य, संगीत आणि मूकाभिनय पद्धतीने होईल. यामध्ये पुण्यातील विविध हौशी–प्रायोगिक नाट्यसंस्थांतील पन्नास कलाकार सहभागी होत आहेत. मुंबईच्या आविष्कार संस्थेच्यावतीने या प्रयोगाचे आयोजन होत आहे. अशा प्रकारचा प्रयोग पुण्याच्या रंगभूमीच्या इतिहासात प्रथमच होत आहे ☐

### खुलासा

( मागील १ मार्च १९८६ माणूस अकातील 'अ. भा. वि. प. ची अंदमान सफर– निसर्ग, समाज आणि संस्कृतीची ओळख करून देणारा जिवंत अनुभव' या लेखाचे लेखक प्रा. दिलीप गोपाळ बेलगावकर ( नासिकरोड महाविद्यालय ) हे आहेत. लेखकाचे नाव लेखासोबत चुकून दिले गेले नाही. –स )

- **योद्धा शेतकरी** / विजय परुळकर / ३६ रुपये
- **डॉ. आयडा स्कडर** / वीणा गवाणकर / २२
- **एक होता कार्व्हर** / सौ. वीणा गवाणकर / ३०
- **श्रीग्रामायन** / श्री. ग. माजगावकर / २५
- **बलसागर** / श्री. ग. माजगावकर / ३०
- **निर्माणपर्व** / श्री. ग. माजगावकर / ४०
- **पूर्णत्वाचे प्रवासी** / प्रा. शरद कुलकर्णी / ५०
- **आंबेडकर भारत** / बाबुराव बागुल / २०
- **लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी** / पु. ल. इनामदार / २०
- **निलगिरीची शेती** / विनायक पाटील / १५
- **अब्राहम लिंकन, फाळणी टाळणारा महापुरुष** / वि. ग. कानिटकर / १५०
- **नाझी भस्मासुराचा उदयास्त** / वि. ग. कानिटकर / १४०
- **विज्ञानेश्वरी** / डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर / २०
- **तुम्हाला विज्ञानयुगात जगायचंय** / डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर / २०
- **मानसकन्या** / प्रा. मनोहर राईलकर / २०
- **सांगत्ये ऐका** / हंसा वाडकर / १४
- **शतपावली** / रवींद्र पिंगे / १६
- **रूपवती भार्या शत्रुः ?** / ॲड. माधव कानिटकर / २५
- **सबला** / माधव शिरवळकर / १२
- **काही दिवस श्यामचे काही दिवस राधाचे** / फिरोझ रानडे / २५
- **फिडेल ' चे आणि क्रांती** / अरुण साधू / २२
- **मला निसटलंच पाहिजे** / श्रीकांत लागू / २२
- **लेक वालेसा** / डॉ. श्रीकांत मुंदरगी / २२

राजहंस प्रकाशित

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
दूरध्वनी : ४४ ३४ ५९

C/o. श्री. वा. र. गोडे
४१ भवानीशंकर रोड
जोशी वाडी
चितळे पथ कॉर्नर, दादर (प.)
मुंबई ४०० ०२८
दूरध्वनी : ४२२ ५४ ५५
४२२ ३९ ०१

- **माध्यमिक शाळेतील विद्यार्थी** / श्री. ब. गोगटे, म. न. पलसाने / १०
- **कथा ही गणिताची** / ल. वा. गुर्जर / ६०
- **महाराष्ट्रातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे प्रश्न** / म. न. पलसाने, श्री. अ. पाटणकर, वि. मा. कुलकर्णी, सुमन करंदीकर / ३५
- **गुजरातेतील मराठी राजवट** / वि. गो. खोबरेकर / १५
- **तीर्थरूप आक्का** / शारदाबाई आपटे / ५
- **सहा साहसे** / दा. सी. देसाई / १६
- **परसूच्या पशुकथा** / वसंत सबनीस / १२
- **चार्ल्स डार्विन** / भा. रा. बापट / ३२
- **कुंपण आणि आकाश** / मंगला गोडबोले / २०
- **वयात येताना** / मंगला गोडबोले, डॉ. वैजयंती खानविलकर / २५
- **वाट चुकलेली माणसं** / शिरीष सहस्रबुद्धे / ४०
- **नाट्यपंढरी** / गो. रा. जोशी । २०
- **ऊर्जा प्रश्न : आशा उद्याच्या** / प्रि. खं. कुलकर्णी / २५
- **कल्पान्त** / प्रा. मनोहर राईलकर / ३५
- **या कॉम्प्युटरमध्ये दडलंय काय ?** / राजीव साने / ३०
- **लघुउद्योग मार्गदर्शक** / शिरीष सहस्रबुद्धे / ६५
- **राजहंस गीत संग्रह** / सौ. कमल प्रभुणे, सौ. विद्या बापट, डॉ. सौ. ललिता गुप्ते / १०
- **बखर काँग्रेसची** / शिरीष सहस्रबुद्धे / ९०
- **लांडगा आला रे ऽ आला** / जगदीश गोडबोले / ३०
- **झुळुक** / मंगला गोडबोले / २५
- **तेंडुलकरांची नाटके** / डॉ. चंद्रशेखर बर्वे / ३०
- **भ्रम आणि निरास** / डॉ. नरेंद्र दाभोळकर / ३०


MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage No-11 ) Regd. No. PNCW - 28